CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ९९ । पाने १२ । किंमत रु. ६/- | |RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे

### सलग आठव्या दिवशी बाजारात घसरगुंडी



**मुंबई :** जागतिक बाजारात वाढ असूनही देशांतर्गत शेअर बाजार शुक्रवारी सलग आठव्या दिवशी घसरणीसह बंद झाले. मुंबई बाजारातील निर्देशांकात २०० अंकांची घसरण झाली तर निफ्टी १०२ अंकांनी खाली आला. शुक्रवारी निफ्टीतील सर्वाधिक घसरण अदानी पोर्ट्‌सच्या शेअर्समध्ये झाली. दुसरीकडे, ब्रिटानियाचे शेअर्स सर्वाधिक वाढले होते. बाजारातील घसरणीमुळे भांडवल ४००.०७ लाख कोटींवर आले. ते आधीच्या सत्रात ४०७.२६ लाख कोटी होते.

### नवीन प्लॅटफॉर्म 'जिओ हॉटस्टार' लाँच

**मुंबई :** जिओ स्टारने 'जिओ हॉटस्टार' नवीन ओटीटी प्लॅटफॉर्म लाँच केला आहे. हा प्लॅटफॉर्म जिओ सिनेमा आणि डिस्ने प्लस हॉटस्टारच्या विलीनीकरणातून तयार झाला आहे. आता वापरकर्ते जिओ सिनेमा आणि डिस्ने प्लस हॉटस्टार प्लॅटफॉर्मवरील कंटेंट एकाच ठिकाणी पाहू शकतील. व्हायकॉम१८ आणि स्टार इंडियाने अलिकडेच जिओ स्टारसोबत हातमिळवणी केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. जिओ हॉटस्टारवर उपलब्ध कंटेंटमध्ये प्रवेश करण्यासाठी तीन महिन्यांचे आणि एक वर्षाचे सबस्क्रिप्शन प्लॅन सादर करण्यात आले.

### धनंजय मुंडेंसोबतची भेट अचानक घडली : आ. धस

मुंबई : गेल्या दोन महिन्यांपासून मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे अडचणीत आलेले धनंजय मुंडे आणि त्यांना अडचणीत आणणारे आमदार सुरेश धस यांच्यात समेट झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. या दोघांची गुप्तपणे भेट घडवून आणण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे तथापि, ज्या कार्यक्रमाला मी गेलो होतो, तिथे मुंडे अचानक आले. ते येणार असल्याची मला कुठलीही माहिती नव्हती, असे स्पष्टीकरण धस यांनी दिले. भाजपाच्या एका नेत्याने मला जेवणाचे निमंत्रण दिले होते. त्यासाठी मी तिथे गेलो असता, काही वेळानंतर धनंजय मुंडेदेखील आले. आम्ही थोडा वेळ एकमेकांशी बोललो, असे आ. धस यांनी स्पष्ट केले. आमच्यात मनभेद आहेत, मतभेद नाहीत, असेही त्यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वीच मुंडे यांच्यावर शस्त्रक्रिया झालेली आहे. त्या भेटीत मी त्यांच्या तब्येतीची चौकशी केली आणि यात काही गैर आहे, असे मला वाटत नाही, असे आ. धस म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हा तुरुंगात आहे. याचा आका हे मुंडे असल्याचा आरोप धस यांनी केला होता.



# भारत-अमेरिकेत ५०० अब्ज डॉलर्सचा द्विपक्षीय करार

## २०३० पर्यंतचे लक्ष्य निर्धारित, ट्रम्प यांची घोषणा



व्हाईट हाऊसमधील भेटीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी छायाचित्रकारांना अशी पोज दिली

**वॉशिंग्टन, १४ फेब्रुवारी**

भारत-अमेरिकेत ५०० अब्ज डॉलर्स अर्थात् ४३ लाख कोटींच्या द्विपक्षीय व्यापारी करारावर सहमती झाली. यासाठी २०३० पर्यंतचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले. व्यापारी अडथळे दूर करण्यावर दोन्ही देशात एकमत झाल्याची माहिती मेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दिली.

अमेरिकेच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी व्हाईट हाऊस येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय करारासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. संयुक्त पत्रपरिषदेत माहिती देताना ट्रम्प म्हणाले, २०२३ पर्यंत दोन्ही देशांत ५०० अब्ज डॉलर्सच्या द्विपक्षीय व्यापारासंदर्भात सहमती झाली. दोन्ही देशातील व्यापार दुप्पट करण्याचे आमचे लक्ष्य आहे. यासाठी नियमात सुधारणा करण्यात येईल. द्विपक्षीय व्यापाराच्या वृद्धिसाठी आणि दोन्ही देशातील बाजारपेठांमध्ये थेट प्रवेश करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर चर्चा करून तोडगा काढला जाईल.

**करशुल्काचे अडथळे दूर**

वस्तू आणि सेवा क्षेत्रातील करशुल्काचे अडथळे दूर करण्यावर आम्ही काम करणार आहोत. व्यापारी करारांतर्गत अमेरिकेतील दुचाकी, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित सेवा, धातू, खनिजे, वैद्यकीय उपकरणे, कृषी उत्पादनावरील करशुल्क भारताने कमी केले, याचे मी स्वागत करतो. उपरोक्त वस्तू व सेवांची निर्यात वाढविण्यावर सहमती झाली. भारतातून अमेरिकेत निर्यात करण्यात येणारा आंबा, डाळिंब, उत्पादित वस्तूंवरील करशुल्क कमी करण्यात येणार आहे.

**विकसित भारतासाठी करार मोठी उपलब्धी**

भारत विकासाच्या दिशेने अग्रेसर असून २०४७ पर्यंत विकसित भारत बनविण्याचा आमचा संकल्प आहे. यासाठी अमेरिकेच्या गुंतवणूकदारांकडून मेक इन इंडिया अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पात होणारी गुंतवणूक आणि द्विपक्षीय व्यापारासंदर्भात झालेला करार आमच्यासाठी मोठी उपलब्धी आहे. दोन्ही देशाने द्विपक्षीय व्यापाराला दुप्पटीने वाढविण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेकडून तेल आणि गॅसची आम्ही खरेदी करणार आहो, यामुळे भारताची ऊर्जेची समस्या दूर होऊल. संयुक्त विकास, संयुक्त उत्पादन आणि तंत्रज्ञानात भारताला अमेरिकेची साथ मिळेल. भारत आणि अमेरिकेने एकत्र काम केल्यास मागा आणि मिगा मिळून समृद्धीसाठी मेगा भागीदारी शक्य होईल.

राष्ट्रीय सुरक्षा, रोजगारनिर्मिती आणि व्यापारी संबंध दृढ करण्याचा संकल्प आम्ही घेतला आहे. बहुक्षेत्रीय द्विपक्षीय व्यापारी करार अर्थात् बीटीएला पुढे नेण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली, त्यावर दोन्ही देश सहमत आहे. (वृत्तसंस्था)

### संघाच्या कार्यक्रमाला हायकोर्टाची परवानगी

**कोलकाता, १४ फेब्रुवारी**

पश्चिम बंगाल सरकारच्या आक्षेपांना बाजूला सारत कोलकाता उच्च न्यायालयाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्धमान येथील कार्यक्रमाला सशर्त परवानगी दिली आहे. येत्या १६ फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम होणार आहे.

रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत या कार्यक्रमात मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी ध्वनिक्षेपकाचा वापर केला जाणार आहे तसेच सध्या राज्यात उच्च माध्यमिक परीक्षा सुरू आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना याचा त्रास संभवतो, अशी सबब पुढे करीत राज्य सरकारने या कार्यक्रमाला परवानगी नाकारली होती. यासंदर्भात आयोजकांनी हायकोर्टात धाव घेत कार्यक्रमासाठी परवानगी मागितली होती. (वृत्तसंस्था)



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात शुक्रवारी सहभागी होत त्रिवेणी संगमात पत्नी व मुलीसह पवित्र स्नान केले

# तीन जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण

### ३८ लाखांचे होते बक्षीस

**गडचिरोली, १४ फेब्रुवारी**

दोन महिलांसह तीन जहाल माओवाद्यांनी गुरुवारी गडचिरोली पोलिस व सीआरपीएफ दलासमोर आत्मसमर्पण केले आहे. त्यांच्या शिरावर एकूण ३८ लाखांचे बक्षीस होते. विक्रम, नीलाबाई उर्फ अनूसया व वसंती उर्फ सुरेखा असे आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांची नावे आहेत.

सीआरपीएफच्या १९१ बटालियनचे कमांडंट सत्य प्रकाश यांनी सांगितले की, विक्रम तुलावी हा सन २००४ मध्ये टिपागड दलममध्ये भरती झाला. २००६ मध्ये एसीएम पदावर त्याला पदोन्नती मिळाली. २०१५ ते २०१७ पर्यंत डीके झोन डॉक्टर टीममध्ये सीवायपीसी/डिव्हिसीएम पदावर त्याने काम केले. २०१७ ते २०२२ पर्यंत कंपनी क्र. ०१ मध्ये सीवायपीसी/कमांडर तसेच सचिव पदावर होता. नीलाबाई ही डिसेंबर १९८८ मध्ये भामरागड दलममध्ये भरती झाली. तिने १९९१ पर्यंत काम केले. यानंतर उत्तर बस्तर डिव्हीजनच्या कोहलीबेडा दलममध्ये बदली होऊन १९९६ पर्यंत सदस्य पदावर काम केले. आतापर्यंत नक्षल्यांच्या विविध पदावर ती कार्यरत होती.

२००८ मध्ये नक्षल्यांमध्ये सहभागी झालेली वसंती हिडामी २१४ पर्यंत टिपागड दलममध्ये कार्यरत होती. ऑक्टोबर २०२४ मध्ये ती सी-सेक्शन उपकमांडर बनली होती. शासनाने विक्रम तुलावी याच्यावर १६ लाख, नीलाबाई उईकेवर १६ लाख, तर वसंती हिडामीवर ६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. (तभा वृत्तसेवा)

# दहशतवादी तहव्वूर राणाला भारताकडे सोपविणार

### डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

**वॉशिंग्टन, १४ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील सूत्रधार तहव्वूर राणाचे भारताकडे प्रत्यार्पण करणार असल्याचे जाहीर केले. व्हाईट हाऊसमधील द्विपक्षीय बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रपरिषदेत ट्रम्प यांनी ही माहिती दिली.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील दोषी तहव्वूर राणाचे भारताकडे प्रत्यार्पण करण्यास अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच मंजुरी दिली होती. तहव्वूर हा मूळ पाकिस्तानचा असून, तो कॅनडाचा नागरिक आहे. मुंबईतील अनेक ठिकाणी झालेल्या हल्ल्यांत सहभाग असल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, प्रशासनाने २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार आणि जगातील अत्यंत वाईट लोकांपैकी एक असलेल्या तहव्वूर राणाच्या भारताकडे प्रत्यार्पणाला मंजुरी दिली आहे. तो आता न्यायालयीन खटल्याला सामोरे जाण्यासाठी भारतात परत जाईल. जगभरातील कट्टरपंथी इस्लामिक दहशतवादी धोक्याचा सामना करण्यासाठी भारत आणि अमेरिका यापूर्वी कधीही न पाहिलेल्या पद्धतीने एकत्रितपणे काम करतील, असे ट्रम्प म्हणाले.

२००८ च्या मुंबई हल्ल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या आणि सध्या लॉस एंजेलिसमधील तुरुंगात असलेल्या राणाच्या प्रत्यार्पणासाठी भारत सरकारने सातत्याने प्रयत्न केले. तो पाकिस्तानी-अमेरिकन दहतवादी डेव्हिड हेडलीशी संबंधित आहे, ज्याला दाऊद गिलानी म्हणूनही ओळखले जाते. तो दहशतवादी हल्ल्यांमधील एक प्रमुख सूत्रधार आहे. त्याच्यावर हेडली तसेच लष्कर-ए-तोयबा आणि पाकिस्तानमधील इतर दहशतवादी गटांना हल्ला घडवून आणण्यात मदत केल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# श्रीदत्त नामाच्या गजराने कारंजा नगरी दुमदुमली

### शैलगमन यात्रेने नृसिंह सरस्वती स्वामी महाराज जन्मोत्सवाची सांगता



श्रींची शहरातून निघालेली शोभायात्रा

**कारंजा लाड, १४ फेब्रुवारी**

कलियुगातील श्री दत्तप्रभूंचा दुसरा अवतार असलेल्या येथील श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या ७२५ व्या जन्मोत्सवास कारंजा येथील गुरू मंदिरात १ जानेवरीपासून प्रारंभ झाला होता. हा उत्सव ४५ दिवस सुरू असल्याने १३ फेब्रुवारीला महाप्रसाद व शैलगमन यात्रेने या जन्मोत्सवाची सांगता झाली. यावेळी शहरातून भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. त्यामुळे कारंजा नगरी श्री दत्तनामाने दुमदुमून गेली होती. १४ रोजी या शोभायात्रेची सांगता मंदिरात झाली.

गुरुवारी रात्री ७.३० वाजता गुरू मंदिर परिसरातून शैलगमन यात्रेस सुरुवात झाली. त्यांनतर शहरातील मुख्य मार्गासह अंतर्गत मार्गाने जवळपास १४ तास भ्रमण करीत शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता ही शैलगमन यात्रा गुरू मंदिरात पोहोचली. यावेळी या शोभायात्रेत संपूर्ण राज्यातील विविध भाागातील भाविक सहभागी झाले होते.

यावेळी भाविकांनी केलेल्या दत्त नामाच्या गजराने कारंजा नगरी दुमदुमून गेल्याचे देखील पाहावयास मिळाले. गेले ४५ दिवस हा जन्मोत्सव सुरू असल्याने या जन्मोत्सवात देश विदेशातील नामवंत कलाकारांनी आपली सेवा श्री गुरूचरणी अर्पण केली.

या जन्मोत्सवादरम्यान भजन, कीर्तन, गायन, वीणावादन यासह आरोग्य विषयक शिबिर देखील घेण्यात आले. ज्यातून भाविकांना आध्यात्मिक ज्ञानाबरोबरच आरोग्य विषयक मार्गदर्शनाचीही मेजवानीही मिळाली.

यादरम्यान गुरू मंदिराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. शिवाय आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली होती. या उत्सवादरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहर पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवल्याचेसुद्धा यावेळी दिसून आले. (तभा वृत्तसेवा)

# मराठी साहित्य संमेलनाची कार्यक्रम पत्रिका जाहीर

### तीन दिवस भरगच्च कार्यक्रम

**पुणे, १४ फेब्रुवारी**

नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची कार्यक्रम पत्रिका अखेर जाहीर झाली आहे. ग्रंथदिंडी, परिसंवाद, कवी कट्टा, मुलाखती अन्‌ सांस्कृतिक कार्यक्रमांनी साहित्य संमेलन रंगणार आहे. अभिजात मराठी भाषेचा जागरही संमेलनात होईल. तालकटोरा स्टेडियममध्ये २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान आयोजित या साहित्य संमेलनात दिग्गज साहित्यिकांसह नवोदित लेखकांचाही समावेश आहे.




शुक्रवारी २१ रोजी दुपारी साडेतीन वाजता दिल्लीतील विज्ञान भवन येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर उपस्थित राहतील. संमेलनस्थळी जोतिराव फुले सभामंडप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडप, यशवंतराव चव्हाण सभामंडप असतील.

**खुले अधिवेशन आणि समारोप**

२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभामंडपात खुले अधिवेशन होईल. त्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विजय दर्डा, मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती पी. डी. पाटील सहभागी होतील. त्यानंतर संमेलनाचा समारोप होईल. (वृत्तसंस्था)

# ५० कोटी भाविकांचे संगमात स्नान

### महाकुंभात नव्या जागतिक विक्रमाची नोंद



**लखनौ, १४ फेब्रुवारी**

महाकुंभमेळ्यात प्रयागराज येथे आतापर्यंत ५० कोटी भाविकांनी स्नान केले असून, आगामी काही दिवसांत हा आकडा ६० कोटींवर जाऊ शकतो. त्यामुळे उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.

महाकुंभमेळ्याच्या आयोजनासाठी १५०० कोटी रुपये खर्च झाले असून त्या बदल्यात ३ लाख कोटी रुपयांचा फायदा होत आहे, असेही योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे. सध्या सरकारी आकडेवारीनुसार, महाकुंभामध्ये पवित्र स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ५० कोटींपेक्षा जास्त झाली आहे. आतापर्यंत कोणत्याही कार्यक्रमात इतक्या मोठ्या संख्येने लोक सहभागी झाल्याचे पुरावे मिळालेले नाहीत, असे म्हटले जात आहे. दरम्यान, महाकुंभमेळा संपण्यास अजून बराच वेळ आहे. महाशिवरात्रीला महाकुंभमेळ्यातील शेवटचे अमृत स्नान होणार आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

ब्राझीलच्या रिओ कार्निव्हल किंवा जर्मनीच्या ऑक्टोबर फेस्टमध्ये जमणारी मोठी गर्दी देखील प्रयागराजमधील आयोजित महाकुंभमेळ्याच्या तुलनेत काहीच नाही. दरम्यान, रिओ कार्निव्हल हा ब्राझीलमधील रिओ डी जानेरो शहरात साजरा केला जाणारा एक मोठा उत्सव आहे. तर ऑक्टोबर फेस्ट हा जर्मनीतील म्युनिक येथे साजरा केला जाणारा वार्षिक उत्सव आहे. तो सप्टेंबरच्या शेवटी सुरू होतो आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात संपतो. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# रामपूरच्या कालव्याला आले १४ वर्षांनी पाणी

**अधीक्षक अभियंत्यांची संवेदनशिलता अन् शेतकऱ्यांच्या डोळ्यात तरळले आनंदाश्रू**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

पाणी सोडण्यासाठी येत असलेले सर्व अडथळे दूर करून लघु पाटबंधारे विभागाच्या रामपूर तलावाअंतर्गत असलेल्या रामपूर, कर्देहळ्ळी आणि तोगराळी हद्दीतील कालव्याला अखेर १४ वर्षांनी पाणी सोडल्याने तिन्ही गावांतील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, यासाठी शेतकऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता एस. एस. खांडेकर यांची संवेदनशीलता आणि त्यांच्या सहकार्यांनी दाखविलेली तत्परता कामी आली अन् बळीराजाच्या डोळ्यात अक्षरश: आनंदाश्रू तरळले. रामपूर तलावातून शेतीपिकांसाठी कालव्याला पाणी सोडा, जमत नसेल तर कालव्यासाठी संपादित केलेल्या आमच्या जमिनी आम्हाला परत करा, दोन्हीपैकी एकाही मागणीची पूर्तता होत नसेल तर शिवजयंतीदिवशी रामपूर तलावात सामूहिक जलसमाधी घेऊ, असा आक्रमक इशारा लाभधारक शेतकऱ्यांनी दिल्यानंतर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता खांडेकर यांनी तातडीने सर्व अडथळे दूर करून येत्या आठ दिवसांत पाणी सोडण्याची कार्यवाही करण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना देऊन तसे आदेश पाटबंधारे विभागाचे उपअभियंता पी.एम.बाबा व सहायक अभियंता अभियंता आर. एम. वाकचौरे यांना दिले होते.

त्यानुसार कार्यकारी अभियंता मो.ता. जाधवर व उपअभियंता बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक अभियंता वाकचौरे व कालवा निरीक्षक सिध्देश्वर नागणसुरे, राजेंद्र गायकवाड, अप्पाराव पवार, पंडित राजमाने यांनी पाणी सोडण्यासाठी असलेले अडथळे २४ तासांत दूर करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांना उपसरपंच अशोक माने, राम माने, गणेश माने, रोहित सावंत, रितेश जाधव, मलकारसिध्द शिंदीबंदे या लाभधारक शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले.गेल्या ५० वर्षांतील एक-दोन वेळेचे अपवाद वगळता आजतागायत या कालव्याला पाणी आले नाही. सततच्या दुष्काळामुळे तलावात पाणीसाठा होत नसल्याने बाधित शेतकर्यांच्या दोन पिढ्या पाण्याच्या प्रतीक्षेत गेल्या. परंतु पाणी काही मिळाले नाही. दरम्यान, आता उजनी धरणातून एकरुख उपसा सिंचन योजनेद्वारे तलावात पाणी आले आहे. त्यामुळे कालव्याला पाणी सोडण्याची मागणी लाभधारक शेतकऱ्यांतून करण्यात येत होती. परंतु, पाणी सोडण्यासाठी तांत्रिक अडचणी येत असल्याचे कारण सांगून पाणी सोडणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी सोमवारी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता खांडेकर यांची भेट घेऊन पाणी सोडण्याची आग्रही मागणी केली होती. अधीक्षक अभियंता खांडेकर यांनी हा विषय गांभीर्याने घेत सहकारी अधिकारी व लाभधारक शेतकऱ्यांशी चर्चा करून आठ दिवसांत पाणी सोडण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, दोनच दिवसात सर्व अडथळे दूर करून बुधवारी पाणी सोडल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.अधीक्षक अभियंता खांडेकर यांची शेतकऱ्यांविषयी असलेली संवेदनशीलता दिसून आली.

## संक्षिप्त वृत्त




### जिल्ह्यातील गोशाळा संचालकांच्या प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हयातील गोशाळा चालकांसाठी जुना जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र गोसेवा आयोगचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी, ॲड. सपना वळसंगे, मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. मुकेश गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. सोलापूर जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, ॲनिमल वेल्फेअरचे महेश भंडारी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील गोशाळा संचालकासाठी प्रशिक्षण शिबिरात गोशाळेचे व्यवस्थापन, गो संगोपन विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गो संरक्षण कायद्याविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली . प्रशिक्षण कार्यक्रमाचे सुरुवात दीप प्रज्वलन व ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर प्रतिमेस पुष्पहार घालून पूजा करून करण्यात आली. यावेळी श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ अध्यक्ष उमा बिराजदार यांनी आपल्या गोशाळेचे संपूर्ण माहिती देऊन मान्यवरांना गो उत्पादन भेट दिले. यावेळी जिल्ह्यातील गोशाळा संचालक, गोरक्षक उपस्थित होते.



### डब्ल्यूआयटी अल्ट्राटेक सेंटर ऑफ एक्सलेन्सचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरात शिक्षणसंस्था आणि उद्योग यांच्यामधील सहकार्य वाढविण्याच्या आणि त्यांच्यातील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने अल्ट्राटेक सेंटर ऑफ एक्सलेन्सची स्थापना करण्यात आली आहे. या सेंटरमध्ये नवीन तंत्रज्ञान, उत्पादनं, आधुनिक सामग्री आणि संशोधन यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, असे अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेडचे टेक्निकल सर्व्हिसेस झोनल हेड अरविंद महाजन यांनी सांगितले.वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर आणि अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या सहयोगाने विकसित केलेल्या 'सेंटर ऑफ एक्सलेन्स'चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते लाल फीत कापून अरविंद महाजन यांच्या भाषणाने पार पडले. यामध्ये सिमेंट, काँक्रीट आणि संबंधित उत्पादने आणि संशोधनावर आधारित विकास कार्ये केली जातील. उद्घाटन सोहळ्यात वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त भूषण शहा आणि वैभव गांधी, डब्ल्यूआयटीचे प्राचार्य डॉ. विजय आठवले, डॉ. महेश कल्याणशेट्टी, दीपक किंगर, शितलराज सिंदखेडे, प्रा. चेतन कोनापुरे, बाळकृष्ण कुलकर्णी उपस्थित होते. अरविंद महाजन यांनी सिमेंट उद्योगासमोरील आव्हाने, संशोधन आणि त्यातून विद्यार्थ्यांसाठी निर्माण होणाऱ्या रोजगार संधींविषयी माहिती दिली. डॉ. महेश कल्याणशेट्टी यांनी डब्ल्यू.आय.टी. आणि अल्ट्राटेक यांच्यातील सामंजस्य कराराची माहिती दिली, तर प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या. प्रास्ताविक प्रा. चेतन कोनापुरे यांनी केले. शितलराज सिंदखेडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अनिका वल्लाकट्टी आणि सोनिया भंडारी यांनी केले.



### रामवाडी येथे शिवजन्मोत्सव कब्बड्डी स्पर्धा क्रीडांगणाची पूजा

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सोलापूर शहर युवक काँग्रेस व गणेश डोंगरे मित्र परिवाराच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी रोजी महानगरपालिका शाळा मैदान, रामवाडी येथे सोलापूर जिल्हा कब्बड्डी खुला गट पुरुष, महिला व किशोर किशोरी मुले मुली ५५ किलो वजनी गट स्पर्धाचे क्रिडांगण पूजा नगरसेवक विनोद भोसले, गोपाळ मामा नंदुरकर, मदन गायकवाड, महेश पवार, सचिन गुंड, सचिन तिकटे, शाहू सलगर, गिरीष जाधव,अक्षय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

### भारत सरकार कॉपीराईट ऑफिसतर्फे डॉ. श्रीशैल घुरघुरे यांना पेटंट प्राप्त

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी , सोलापूर मधील प्राध्यापक डॉ. श्रीशैल मारुती घुरघरे यांना प्रतिलिप्याधिकार कार्यालय भारत सरकारकडून त्यांना त्यांच्या Development and charization of Nano crystallization Technique's of Ritonavir या विषयाकरता पेटंट प्राप्त झाले. Ritonavir हे औषध एच .आय. व्ही. एड्स वर उपचार करण्यासाठी वापरले जाते. हे औषध अँटी रेट्रो व्हायरल मध्ये अत्यंत सक्रिय थेरेपी म्हणून ओळखले जाते. वरील संशोधनातून डॉ. घुरघुरे यांनी या औषधाची विरघळण्याची क्षमता वरील क्लुप्त्या वापरून कशी वाढते आणि त्याची जैव उपलब्धतेची क्षमता दीर्घकाळ कशी टिकून राहते हे संशोधनातून सिद्ध केले आहे. त्यांच्या या संशोधनास १२ फेब्रुवारी रोजी कॉपीराईट कार्यालय भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले. त्यांच्या या संशोधन कार्यास महाविद्यालयातील विद्यार्थी अत्तार कैस व सुमित उंबरदंड या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. तसेच डॉक्टर घुरघुरे यांना राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजीतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म औषधे व कॅन्सर मॅनेजमेंटला पाच लाखाचे अनुदान प्राप्त झाले आहे. त्यांचे दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त प्रा. भीमाशंकर व्ही. शेटे, प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, प्राचार्य डॉ. कापसे यांनी अभिनंदन केले.





## ॲड. रमेश राठोड यांची सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट-अ पदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील ॲड. रमेश गोपाळ राठोड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट-अ पदी निवड झालेली आहे.

ॲड. राठोड हे बोरामणी मोहोळकर तांडा येथील मुळ रहिवाशी असून अत्यंत गरिबीतून व हालाखीच्या परिस्थितीतून दिव्यांगत्वावर मात करुन अतिशय जिद्दी व चिकाटीने अभ्यासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले आहे. ॲड. राठोड यांनी सन २००९ मध्ये येथील दयानंद विधी महाविद्यालय येथे विधीचे शिक्षण पूर्ण केले. सन २०१४ मध्ये पुणे विद्यापीठामधून सेट परिक्षा उत्तीर्ण झाले. सन २०१४ ते २०१७ पर्यंत ॲड. राठोड हे दयानंद महाविद्यालय येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. यांच्या या यशाबद्दल नेहरूनगर शासकीय मैदानावरील मॉर्निंग योगा ग्रुपतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी योगा ग्रुपचे भगवान देशमुख, सूर्यकांत पाटील, चंद्रकांत पुकाळे, विद्यासागर मुलगे, यशवंत पाथरूट, शांतकुमार काळे आदी उपस्थित होते.

## 'त्या' स्वच्छतागृहाची मनपा अतिरिक्त आयुक्तांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर मंदिराच्या विष्णू घाट परिसरातील प्रवेशद्वाराशेजारील वादग्रस्त स्वच्छतागृहाची अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी गुरुवारी पाहणी केली. पाहणीदरम्यान संबंधित ठेकेदार व पालिका अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

सोलापूर शहरातील अनेक सेवाभावी संस्था, संघटनानी हे स्वच्छतागृह याठिकाणावरुन हटवावे अशी मागणी केली होती. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या शेजारीच असे स्वच्छतागृह असणे हे चुकीचे आहे. तसेच या स्वच्छतागृहातून मैलामिश्रित सांडपाणी तलावामध्ये मुरते, त्यामुळे तलावाचे पावित्र्यही धोक्यात आले आहे, असा आरोप केला आहे. यासाठी हे स्वच्छतागृह त्वरित हटवावे अशी सांघिक सिद्धरामेश्वर भक्तांची भावना होती.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी दुपारी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष या वादग्रस्त स्वच्छतागृहाची पाहणी करत संबंधित ठेकेदारास स्वच्छता गृह आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा. या संदर्भामध्ये सूचना देत असे पत्र देण्यास अधिकाऱ्यांना सांगितले.



## नवकल्पना विकसित होणे काळाची गरज : चित्ते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

संशोधन आणि विज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांनी अधिक संधी शोधाव्यात या उद्देशाने ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मुंबईचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्रेयश चित्ते यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाची मूलतत्त्वे, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवकल्पना कशा विकसित करायच्या यावर मार्गदर्शन केले.

शिबिरात त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानातील नवनवीन संधी, संशोधन प्रक्रिया आणि त्याच्या व्यावहारिक उपयोगांविषयी सखोल माहिती दिली. विद्यार्थीदशेत असल्यापासूनच नवकल्पना विकसित होणे हि काळाची गरज असल्याचेही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

आजच्या डिजिटल युगात संशोधन हे फक्त प्रयोगशाळांपुरते मर्यादित नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि विविध तांत्रिक क्षेत्रांत प्रचंड संधी उपलब्ध आहेत आणि अशा कार्यक्रमांतून जास्तीत जास्त माहिती घेत आपणही त्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी, असे संस्थेचे विश्वस्त श्रीशैल चनशेट्टी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले. विद्यार्थ्यांनीही या सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि विज्ञान क्षेत्रातील आपले प्रश्न विचारून त्यांची उत्तरे जाणून घेतली. संशोधनाच्या दिशेने पहिली पावले कशी टाकावीत, कोणत्या शिष्यवृत्ती आणि संशोधन प्रकल्पांमध्ये सहभागी होता येईल, याबाबत मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह क्रांतिवीर महिंद्रकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या आस्मा नदाफ, गणिताच्या अध्यापिका निलोफर सय्यद, फिजिक्सच्या अध्यापिका प्रियांका माने, आप्पासाहेब घुगले, सुमित अंकलगी आदींनी परिश्रम घेतले.

## तळीरामांना मोठा फटका; मद्यपींच्या खिशावर भार?

**राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व प्रकारच्या लायसन्समध्ये १५ टक्क्यांनी वाढ**



**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

मद्यप्रेमींसाठी अतिशय महत्त्वाची बातमी समोर येत आहे. दिवाळीनंतर महाराष्ट्रात दारूच्या किमतीत तीन वेळा वाढ केल्यामुळे दारू महागली आहे. त्यानंतर आता मार्च २०२५ ते एप्रिल २०२६ या वर्षाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व प्रकारच्या लायसन्सच्या फी मध्ये सरकारने १५ टक्के वाढ केली असल्यामुळे मद्यांच्या किंमतीतदेखील ही १५ टक्के दरवाढ लागू होण्याशी शक्यता आहे. शासनाच्या या निर्णयाचा परिणाम आता दारू विक्रीवर होणार आहे. परिणामी, यामुळे दारूप्रेमींना मोठे नुकसान होणार आहे. शहरातील बिअर बार आणि हॉटेल्समध्ये मद्याच्या किंमतीमध्ये १५ टक्के रक्कम वाढणार आहे. याचा फटका तळीरामांना बसणार आहे.

दारू पिणाऱ्या आणि तळीरामांना महाराष्ट्र सरकार जोरदार झटका देण्याच्या तयारीत आहे. दिवाळीनंतर राज्यात दारूच्या किमतीत तीन वेळा वाढ झाली आहे. आता नवीन आर्थिक वर्षात म्हणजे एप्रिल २०२५ पासून शासनाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व प्रकाच्या लायसन्स फी मध्ये १५ टक्के दरवाढ लागू केली आहे. त्यामुळे एप्रिलपासून सर्वच प्रकारच्या दारूच्या दरांत वाढ होणार असल्याचे दिसून येत आहे. राज्य सरकारच्या उत्पादन शुल्क विभागाने सर्व प्रकारच्या लायसन्सच्या शुल्कात १५ टक्क्यांनी वाढ केल्याची माहिती सोलापूरचे उपअधिक्षक एस आर पाटील यांनी दिली.

राज्य सरकारने नवीन आर्थिक वर्षापासून म्हणजेच एप्रिल २०२५ पासून मद्य उत्पादन, विक्रिसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या लायसन्सच्या फीमध्ये १५ टक्के दरवाढ लागू केली आहे. त्यामुळे दारूच्या किंमतीतदेखील १५ टक्के वाढ झाल्यानंतर बार, हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांवर दरवर्षी ४१ हजार ३२६ रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. त्यामुळे ग्राहकांनाही जास्त किंमतीत दारू मिळेल. दिवाळीत सर्व प्रकारच्या दारूच्या किमती वाढल्या. गेल्या काही दिवसामध्ये विविध कंपन्यांनी त्यांच्या मद्याच्या किंमतीमध्ये वाढ केली आहे त्यामुळे मद्यपींना जादा किंमत देऊन मद्य प्राशन करावे लागत आहे. दारू पिणाऱ्या लोकांना कर्करोगाचा धोका असतो. लोक नशा करण्यासाठी किंवा मौजमजा करण्यासाठी मद्य पितात. न्यायालयाच्या आदेशानुसार दारूच्या किमती दरवर्षी फक्त १० टक्के वाढवता येतात. परंतु, सरकारने यावर्षी त्यात पाच टक्के वाढ केली आहे. त्यामुळे सरकारने न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले असल्याचे काही बार मालकांचे म्हणणे आहे. आरोग्य आणि सामाजिकदृष्ट्या हानिकारक अल्कोहोल पिणे हे कर्करोगाचा धोका आहे. दारू पिणाऱ्या लोकांना कर्करोगाचा धोका असतो. एक पेय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. दारू आरोग्यासाठी हानिकारक आहे. पण, ती प्यायल्याने नशा येते. त्यामुळे व्यक्तीकडून चुकीच्या कृती घडू शकतात. परिणामी, सामाजिक प्रतिमाच कलंकित होते. म्हणून दारू व्यक्तीसाठी हानिकारक आहे. राज्यातील एकीकडे लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर भार वाढत चालला आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अशातच आता दारू विक्रीचे दर वाढवण्यात आले आहे.



## जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांचा सोलापूर जिल्हा अपंग शाळा कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने गुरुवारी सत्कार करण्यात आला.

पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल सातपुते,व्हाईस चेअरमन अशोक उमाप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग कल्याण विभागाचे प्रभारी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे,पतसंस्थेचे सचिव नागेश बिराजदार, सुधीर खांडेकर, धनंजय काळे, पोपट घोडके यावेळी उपस्थित होते.

दिव्यांग शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या अर्थिक समस्या सोडविण्यासाठी त्यांना कर्जरुपात हातभार लागावा,या उद्देशाने या पतसंस्थेची स्थापना करण्यात आली असल्याचे यावेळी चेअरमन सातपुते यांनी सांगितले.

## जिल्ह्यातील एकाही लाडक्या बहिणींचे नाव वगळले नाही

### जिल्हाधिकारी आशीर्वाद यांची माहिती । आजतागायत शासनाकडून दुरूस्तीचा जीआरही नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र सरकारने जुलै २०२४ पासून सुरू केलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना महिलांमध्ये लोकप्रिय ठरली आहे. या योजनेमुळे राज्यातील २ कोटी ५२ लाख महिलांना आर्थिक लाभ मिळाला आहे. तर सोलापूर जिल्ह्यातील १० लाख २० हजाराच्या आसपास महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. मध्यंतरी जिल्ह्यातील हजारो महिलांची नावे लाभाच्या यादीतून कमी केल्याची अफवा वॉटस्‌ॲपवरून फिरू लागल्याने असंख्य महिला नाराज झाल्या होत्या.



मात्र खुद्द जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी हा मुद्दा खोडून काढत जिल्ह्यातील सर्व महिलांची नावे लाभार्थी यादीत आहेत; शासनस्तरावरून अद्याप कोणाचेही नाव कमी करण्याची सुचना (जीआर) अजून आली नाही; अशी स्पष्टोक्ती दिल्याने लाडक्या बहिणींनी समाधान व्यक्त केले. या योजनेतून अनेकांची नावे वगळण्यात आल्याची अफवा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती मात्र आजतागायत जिल्ह्यातील एकाही लाडक्या बहिणीचे नाव पात्र यादीतून कमी केले नाही. ज्यावेळी राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाकडून यादी दुरूस्तीच्या सुचना येतील त्यावेळीपासून या यादीत बदल होतील. आजतागायत तरी याबाबत राज्य शासनाकडून कसलीही सुचना आली नाही. सरकारने आतापर्यंत प्रत्येक लाडक्या बहिणीस १० हजार ५०० रुपये दिले आहेत. यामुळे शहर-जिल्ह्यातील महिला वर्गात सध्यातरी चैतन्याचे वातावरण आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना ही गेमचेंजर ठरली. यंदाच्या निवडणुकीत महायुती सरकारला लाडकी बहीण योजनेमुळे मोठे यश मिळाले. विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर काही दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजनेचे उर्वरित पैसे देण्यात आले. विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा सत्ता मिळाली तर लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवून २१०० रुपये करू, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले होते. मात्र अद्याप लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा वाढीव हफ्ता मिळालेला नाही. आता या लाडकी बहीण योजनेचा पुढील हफ्ता २१०० रूपयांनीच मिळणार का? याचीही उत्सुकता या महिला वर्गाला लागली आहे.

**आतापर्यंत किती महिलांना पैसे मिळाले?**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात जुलै ते डिसेंबर असे ७ महिन्यांचे पैसे जमा झाले आहे. यातील प्रत्येक महिन्याला १५०० असे मिळून एकत्रित १० हजार ५०० रुपये महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. राज्यभरातील सुमारे अडीच कोटी महिलांनी या योजेनचा लाभ घेतला आहे. तर जिल्ह्यातील १० लाख २० हजारापर्यंत महिलांना याचा लाभ मिळाला आहे. यातील काही महिलांना आधारलिंकिंग, ईकेवायसी अभावी पैसे मिळाले नाहीत. त्यांचेही खाते अपडेट होताच त्यांच्याही खात्यावरून पैसे काढता येत आहेत.

**- प्रसाद मिरकले**
महिला व बालकल्याण (जि. प.) चे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सोलापूर

## मराठा लाईट इन्फंट्री बटालियनचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

भारतीय सैन्यातील १२ मराठा लाईट इन्फंट्री बटालियनच्या सर्व माजी सैनिक, विधवा व अवलंबिताचा स्नेहमेळावा डंगे रेसिडेन्सी, विद्यानगर गणपती मंदिर, शेळगी, सोलापूर येथे संपन्न झाला.

या मेळाव्यास १२ मराठा लाईट इन्फंट्री बटालियनचे माजी सैनिक २०, विधवा २ व २ अवलंबित असे २४ जण उपस्थित होते. सदर स्नेहमेळाव्यामध्ये सोलापूर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (निवृत्त) हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मेळाव्यात केंद्रिय सैनिक बोर्ड, नवी दिल्ली व सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत देण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनेच्या लाभासाठी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व सेवारत सैनिकांनी सेवानित्तीपूर्वी एक वर्षे पहिले नोकरीसाठी अर्ज करावा, असे मार्गदर्शन केले.

# अमेरिका भारताला देणार एफ-३५ जेट फायटर

## ट्रम्प यांची घोषणा, वायुसेनेला मिळणार बळ

◆ **वॉशिंग्टन, १४ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची गुरुवारी व्हाईट हाऊसमध्ये भेट घेतली. यावेळी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत दोन्ही देशांमध्ये अनेक करार झाले. यात ट्रम्प यांनी भारताला एफ-३५ जेट फायटर विमाने देण्याची घोषणा केली. याशिवाय कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि लष्करी उपकरणांच्या खरेदीसंदर्भात दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली.

दोन्ही नेत्यांच्या चर्चेनंतर संयुक्त पत्रपरिषदेत ट्रम्प म्हणाले, अमेरिका भारताला अत्याधुनिक एफ-३५ जेट फायटर विमाने देणार आहे. ही विमाने जगातील सर्वांत घातक तसेच शत्रूकडून होणाऱ्या हल्ल्याचा अंदाज घेऊन प्रतिघात करण्यासाठी सक्षम आहेत. याशिवाय कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि लष्करी उपकरणांच्या खरेदीसंदर्भात दोन्ही देशांत करार करण्यावर सहमती झाली.



### वैशिष्ट्ये

- शत्रूच्या रडारला सहज चकवा देण्याची क्षमता
- ध्वनीच्या १.६ पट वेगाने उड्डाण करण्यास सक्षम
- चालक दलाच्या सदस्यांना ३६० डिग्री दृश्य दाखविणारी प्रणाली
- एअर-टू-एअर, एअर-टू-ग्राऊंड आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअरमध्ये कार्यक्षम
- हवेत आणि जमिनीवरून हल्ले करण्यासाठी उच्च दर्जाची क्षेपणास्त्रे

यापुढे भारत आणि अमेरिका जगभरातील कट्टरपंथी इस्लामिक अतिरेक्यांविरोधात एकत्र काम करणार आहे. यावेळी ट्रम्प यांनी २६/११ मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाचा संदर्भ देत सांगितले की, अमेरिकेने राणाच्या प्रत्यार्पणास मान्यता दिल्याचा मला आनंद आहे. अतिरेकी डेव्हिड कोलमन हेडलीशी त्याचा संबंध होता.

**अमेरिकन वस्तूंवर कर लादणे अन्यायकारक**

भारताकडून काही अमेरिकन वस्तूंवर लावण्यात येणारे करशुल्क अन्यायकारक आहे. परस्पर व्यवहाराचा भाग म्हणून भारत आमच्या वस्तूंवर जितका कर लावेल, तितकाच कर अमेरिकादेखील भारतीय वस्तूंवर लावणार आहे.

**वसुधैव कुटुंबकम् भारताची संस्कृती : मोदी**

पंतप्रधान मोदी म्हणाले, ट्रम्प ज्याप्रमाणे राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देतात तसेच मी सुद्धा भारताच्या हिताला प्राधान्य देतो. भारत वसुधैव कुटुंबकम्‌वर विश्वास ठेवणारा आहे, हीच आमची संस्कृती आहे. रशिया- युक्रेन युद्धावर बोलताना मोदी म्हणाले, भारत या युद्धावेळी कधीही तटस्थ नव्हता. शांततेने यावर तोडगा काढावा, हीच भूमिका भारताने घेतली. (वृत्तसंस्था)

## अलाहाबादियाची सुप्रीम कोर्टात धाव

◆ **नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी**

बीयर बाइसेप्स नावाने प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादियाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली. इंडिया गॉट लेटेंट शो दरम्यान दिलेल्या अश्लील विधानांविरोधात त्याच्यावर विविध राज्यांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अश्लीलतेच्या आरोपांवर दाखल झालेल्या एफआयआर विरोधात अलाहाबादियाने कोर्टाची पायरी चढली.

रणवीर अलाहबादिया कॉमेडी शो 'इंडियाज गॉट लॅटेंट'मध्ये गेस्ट म्हणून पोहोचला होता. तिथे त्याने एका कंटेस्टंटना पालकाबद्दल अश्लील प्रश्न विचारला. बघता बघता हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. यावरून रणवीरवर लोक खूप भडकले. प्रचंड टीकेनंतर रणवीरने व्हिडीओ पोस्ट करीत माफी मागितली. तो म्हणाला, मी येथे माफी मागायला आलो आहे. माझा निर्णय चुकीचा होता. पॉडकास्ट प्रत्येक वयातील लोक पाहतात. मी असा व्यक्ती बनू इच्छित नाही, जो ती जबाबदारी खूप हलक्यात घेतो. या संपूर्ण अनुभवातून माझी शिकवण हीच असेल की, मी या प्लॅटफॉर्मला उत्तम पद्धतीने चालवेन. मी वचन देतो की, मी उत्तम व्यक्ती बनेल. (वृत्तसंस्था)

# संरक्षणमंत्र्यांकडून गडकरी, योगींचा अनोखा सन्मान

## सर्वांनी उभे राहून एक मिनिटपर्यंत वाजविल्या टाळ्या

◆ **लखनौ, १४ फेब्रुवारी**

लखनौ आणि उत्तरप्रदेशात जे विकासाचे चित्र दिसत आहे, त्यासाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचेच योगदान आहे. त्यांच्यामुळेच आज लखनौसह संपूर्ण राज्याचा विकास वेगाने होत आहे. पायाभूत सुविधांचा विकास होत आहे. त्यांचे योगदान इतके मोठे आहे की, त्यासाठी उपस्थितांनी एक मिनिटपर्यंत उभे राहून त्यांच्यासाठी टाळ्या वाजवल्या पाहिजे, असे आवाहन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी कार्यकर्ते आणि उपस्थितांना केले.

लखनौ येथे एका कार्यक्रमात

**'योगींनी उत्तरप्रदेशात रामराज्य स्थापन केले'**

योगींनी उत्तरप्रदेशात रामराज्य स्थापन केले. देश बदलत आहे. सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे उत्तरप्रदेश बदलत आहे. देशात प्रामाणिक नेत्यांची कमतरता आहे. मला उत्तरप्रदेशात ५ लाख कोटी रुपयांचे रस्ते बांधणी पूर्ण करायची आहे. पैशाची कमतरता भासणार नाही. ते अगदी द्रौपदीच्या साडीसारखे आहेत, गरजेनुसार मिळेल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.



लखनौमध्ये अनेक विकासात्मक योजनांचा शिलान्यास करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात उपस्थित असलेले राजनाथसिंह आणि नितीन गडकरी

५८८ कोटी रुपयांच्या ११४ विकास योजनांचे लोकार्पण आणि शिलान्यास करण्यात आले. राजनाथसिंह यांनी दोन उड्डाणपुलांचे उद्घाटन केले. पहिला- मुन्शी पुलिया. दुसरा- खुर्रम नगर उड्डाणपूल. उड्डाणपुलांमुळे १५ लाख लोकांना वाहतूक कोंडीतून आराम मिळेल.

कार्यक्रमात बोलताना संरक्षणमंत्र्यांनी नितीन गडकरी आणि योगी आदित्यनाथ या दोन्ही नेत्यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. राजनाथसिंह म्हणाले, उत्तरप्रदेशसाठी सर्वेक्षण करण्यात आले. जगातील टॉप-१० शहरांमध्ये लखनौचे नाव सर्वांत महागड्या जमिनीत आहे. पहिल्यांदाच, अटलजींनी ग्रामीण आणि शहरी विकासाबद्दल चिंता व्यक्त केली होती. नितीन गडकरी यांनी भारतात पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवून आणली आहे. लखनौ मेट्रो प्रकल्पही लवकरच सुरू होईल. जूनपासून लखनौमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र बनवले जाईल. (वृत्तसंस्था)

# २६/११ तील पीडितांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा

## देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी**

मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेने मान्यता दिल्यामुळे पीडितांना न्याय मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

गृह मंत्रालयातील एका बैठकीसाठी दिल्लीत आल्यानंतर बैठकीनंतर नॉर्थ ब्लॉक बाहेर पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील कटू आठवणी आजही पीडितांच्या मनात जाग्या आहेत. मुंबईवरील या दहशतवादी हल्ल्यात मोठ्या संख्येत लोकांचा बळी गेला होता. तहव्वूर राणा या मागचा खरा सूत्रधार होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राणाच्या प्रत्यार्पणाला मान्यता दिल्यामुळे त्याला मुंबईत आणण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीमुळे हे शक्य झाले. याबद्दल मी मोदी यांचा आभारी आहे.



तहव्वूर राणाने ऑनलाईन साक्षीत मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याची कबुली दिली होती. राणा हा भारताचा गुन्हेगार आहे, त्यामुळे त्याला गुन्हेगार म्हणून भारतात खेचून आणण्याची आमची भूमिका होती. मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबतच्या भेटीत हा मुद्दा लावून धरला, त्यामुळे हे शक्य झाले, असे ते म्हणाले.

गृह मंत्रालयात गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. या तीन कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या उपाययोजनांचा माहिती फडणवीस यांनी या बैठकीत दिली.

नवीन कायद्याबाबत पोलिसांचे प्रशिक्षण करण्यात येत आहे. आतापर्यंत ९० टक्के पोलिसांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित सर्वांचे प्रशिक्षण ३१ मार्चपर्यंत पूर्ण झालेले असेल, असे फडणवीस म्हणाले.

न्यायालयातील गर्दी करण्याबाबतही उपाययोजना केल्या जात आहे त्याचप्रमाणे न्यायालयातील खटले कमीत कमी वेळात कसे निकालात काढता येतील, याबाबतही विचार केला जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुरक्षेत त्रुटी

## हेलिकॉप्टर लॅण्ड झाल्यावर उडाले ड्रोन

◆ **नाशिक, १४ फेब्रुवारी**

नाशिक येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा होता. यावेळी त्यांचे हेलिकॉप्टर लॅण्ड झाल्यानंतर तिथे एक ड्रोन उडल्याचे समोर आले. त्यानंतर हे ड्रोन ज्यांनी उडवले होते त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे.

या घटनेमुळे मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुरक्षेतील त्रुटी समोर आली आहे. या घटनेवर एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

या घटनेतील जे कोणी आहेत त्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची चौकशी केली जात आहे. पोलिस अधीक्षक स्वतः इथे उपस्थित आहेत. अज्ञाताला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी केली जाईल त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. यावर मला फारसे काही बोलता येणार नाही, असे शिंदे म्हणाले आहेत.

एकनाथ शिंदे हे नाशिकच्या दौऱ्यावर असून यावेळी त्यांनी जिल्हा परिषद शाळांना भेट दिल्याचे समजते. यावेळी त्यांच्यासोबत शिक्षणमंत्री दादा भुसे देखील होते. (वृत्तसंस्था)





## ११ लाख औषधी वनस्पतींचे वाटप

प्रयागराजच्या महाकुंभात वृक्ष महाकुंभाचा एक मोठा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. येथे सुमारे ११ लाख औषधी वनस्पतींचे वाटप करण्यात आले. या मोहिमेचे उद्दिष्ट एक अब्ज औषधी वनस्पतींचे वितरण करण्याचे आहे, त्यापैकी ११ लाख वनस्पती महाकुंभाच्या काळात भाविकांमध्ये वाटण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश निसर्गाचे संवर्धन करणे, जैवविविधता वाचवणे आणि पारंपरिक आयुर्वेदिक औषधांचे पुनरुज्जीवन करणे आहे.



वृक्ष कुंभाचे नेतृत्व स्वामी समिदानंद यांनी स्थापन केलेल्या हरिताश्रमाने केले. हरिताश्रम समाजात पर्यावरण संरक्षण, निसर्गोपचार आणि वृक्षारोपण यांना प्रोत्साहन देण्यासाठी बऱ्याच काळापासून काम करीत आहे.

राष्ट्रीय औषधी वृक्षारोपण मंडळ, भारत सरकार आणि एनआयव्ही कला आणि सांस्कृतिक संस्था या उपक्रमाचे प्रमुख भागीदार आहेत. राष्ट्रीय औषधी वृक्षारोपण मंडळाने त्यांच्या पर्यावरणीय कार्यक्रमांचा एक भाग म्हणून वृक्ष कुंभाला पाठिंबा दिला आहे, तर एनआयव्ही कला आणि सांस्कृतिक संस्था पारंपारिक औषधी ज्ञान आणि आयुर्वेदाचे जतन आणि प्रसार करण्यासाठी काम करीत आहे.

# महाकुंभात तीन विश्वविक्रम होणार!

## गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सची टीम पोहोचली

प्रयागराजमध्ये महाकुंभ सुरू आहे, महाकुंभासाठी जगभरातील कोट्यवधी भाविकांनी गर्दी केली आहे. भाविकांच्या संख्येचा जगातील सर्वांत मोठा विक्रम येथे रचला आहे. आता आणखी तीन नवीन विश्वविक्रम होणार आहेत. पवित्र त्रिवेणीच्या काठावर शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या तीन दिवसांसाठी दररोज जागतिक विक्रम रचले जाणार आहेत. गर्दीमुळे नंतर विक्रमी ई-रिक्षा चालवली जाईल. यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे पथक येथे आले आहे.

महाकुंभात तीन विश्वविक्रमांच्या माध्यमातून जगाला स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला जाणार आहे. नदीकाठ आणि पाण्याच्या प्रवाहात वेगवेगळ्या स्वच्छता मोहिमांची नोंद केली जाईल. यावेळी मेळावा प्राधिकरण स्वतःचाच एक विक्रम मोडेल. २०१९ च्या कुभमेळ्याने तीन विश्वविक्रम केले आहेत.



**३०० कर्मचारी नदी स्वच्छ करणार**

आज शुक्रवारी नदी स्वच्छतेचा विक्रम केला जाणार आहे. ३०० कर्मचारी एकाच वेळी गंगा नदीत प्रवेश करतील आणि ती स्वच्छ करतील. राम घाट, गंगेश्वर घाट आणि भारद्वाज घाट या तीन घाटांवर स्वच्छता केली जाईल. या विश्वविक्रमासाठी ८५.५३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

या अंतर्गत एकाच वेळी ५०० हून अधिक शटल बसेस चालवण्याचा विक्रम करण्यात आला. याशिवाय, १० हजार स्वच्छता कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे स्वच्छता मोहीम राबवली होती, जी एक विक्रम होती. त्याच क्रमाने आठ तासांत साडेसात हजार लोकांच्या हाताचे ठसे घेण्याचा विक्रम झाला.

### १५ हजार स्वच्छता कर्मचारी दुसऱ्या दिवशी विक्रम करणार

दुसऱ्या दिवशी, १५ फेब्रुवारी रोजी स्वच्छतेचा जागतिक विक्रम रचला जाईल. गंगा आणि यमुनेच्या काठावर १५ हजार कर्मचारी एकाच वेळी १० किमी स्वच्छता मोहीम राबवतील. सध्या एकाच वेळी १० हजार कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबवल्याचा विक्रम आहे. २०१९ च्या कुंभमेळ्यात मेळा प्राधिकरणाने एकाच वेळी साफसफाईचा विक्रम प्रस्थापित केला होता. हा विश्वविक्रम घडविण्यात २.१३ कोटी रुपये खर्च येणार आहेत.

### १० हजार हॅण्ड प्रिंटिंगचे होणार विक्रम

१६ फेब्रुवारी रोजी कॅनव्हासवर हाताने छापण्याचा विक्रम केला जाईल. ८ तासांत १० हजार लोकांच्या हाताचे ठसे घेण्याचा जागतिक विक्रम घडणार आहे. पाच प्रमुख ठिकाणी आणि गंगा पंडालवर कॅनव्हास बसवले जातील. सध्या मेळाव्याच्या अधिकाऱ्यांकडे ७,५०० लोकांच्या हाताचे ठसे घेण्याचा विक्रम आहे. हा विक्रम करण्यासाठी ९५.७६ लाख रुपये खर्च येणार आहेत.

# ममता कुलकर्णी पुन्हा बनली किन्नर आखाड्याची 'महामंडलेश्वर'

९० च्या दशकातील अभिनेत्री ममता कुलकर्णी सध्या चर्चेत असते. काही दिवसांपूर्वीच तिने महाकुंभात हजेरी लावली होती. इतकेच नाही तर, तिथे तिने साध्वी जीवनाचा स्वीकार केला. किन्नर आखाड्याने तिला 'महामंडलेश्वर' ही पदवी दिली. यानंतर साधू-महंतांनी याला विरोध केला. म्हणून ममताने या पदाचा राजीनामा दिला. पण आता ती पुन्हा 'महामंडलेश्वर' बनली आहे. व्हिडीओ शेअर करीत तिने माहिती दिली आहे.

ममता कुलकर्णी व्हिडीओ शेअर करीत म्हणाली, मी श्री यमाई ममतानंदगिरी... दोन दिवसांपूर्वी माझे पट्टगुरू नारायण त्रिपाठी यांच्यावर काहींनी चुकीचे आरोप लावले होते. यामुळे दुःखी होऊन मी राजीनामा दिला होता. मात्र, त्यांनी माझा राजीनामा स्वीकारला नाही आणि मी जी गुरू भेट आचार्य लक्ष्मी नारायण त्रिपाठींना दिली होती ती महामंडलेश्वर बनल्यानंतर जे छत्र, छडी आणि छवर असते त्यासाठी होती आणि राहिलेली भंडारासाठी समर्पित केली होती. मी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करते की, त्यांनी मला पुन्हा या पदावर आणले आहे. यापुढे मी माझे आयुष्य किन्नर आखाडा आणि सनातन धर्मासाठी समर्पित करेन.



ममता कुलकर्णीने २५ वर्षांची तपस्या केल्याचे याआधी सांगितले आहे. २०१३ मध्ये तिची 'ऑटोबायोग्राफी ऑफ अ योगिनी' हे पुस्तक आले होते. तिने तेव्हाच बॉलिवूड ग्लॅमरचे आयुष्य सोडले होते. आताही तिचा पुन्हा अभिनयात प्रवेश करण्याचा उद्देश नाही, असेही ती म्हणाली. ममता आजही महामंडलेश्वर पदावर कायम असल्याने आता यावर साधू-महंतांची काय प्रतिक्रिया येते, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## चित्रपट वार्ता

### वेगळ्या अवतारात भेटीला येणार प्राजक्ता माळी



**मुंबई :** अभिनय, नृत्य व निर्माती अशा विविध भूमिकेतून अभिनेत्री प्राजक्ता माळीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचा प्रयत्न प्राजक्ता नेहमीच करीत आली आहे. आगामी 'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटात ती रावी या मुलीची भूमिका साकारताना दिसणार आहे. रावी ही अतिशय चुलबुली आणि उत्साही आहे, पण त्याचवेळी ती गोंधळलेली सुद्धा आहे. विनोदाचा वेगळा बाज असलेली ही आव्हानात्मक भूमिका प्राजक्ता साकारत आहे. रियुनियनच्या सेलिब्रेशनसाठी एकत्र जमलेल्या पण काही विचित्र गोष्टींमुळे कचाट्यात सापडलेल्या मित्रांची धमाल गोष्ट म्हणजे 'चिकी चिकी बुबूम बुम' हा चित्रपट. धमाल, मस्ती, हास्याचे स्फोट उडवत २८ फेब्रुवारीला 'चिकी चिकी बुबूम बुम' प्रेक्षकांना विनोदाची मेजवानी देणार आहे.

### गायक कैलास खेरचे साहित्याच्या जगात पाऊल



**मुंबई :** गायनानंतर आता प्रसिद्ध गायक कैलाश खेर यांनी साहित्य जगात प्रवेश केला आहे. या गायकाने 'तेरी दीवानी: शब्दों के पार' नावाचे पुस्तक लिहिले आहे. काही दिवसांपूर्वी नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे झालेल्या जागतिक पुस्तक मेळ्यात, कैलास खेर यांनी पुस्तकात समाविष्ट असलेल्या ५० गाण्यांबद्दल सांगितले. कार्यक्रमादरम्यान, त्यांनी त्यांच्या चाहत्यांसाठी आणि प्रेक्षकांसाठी 'तेरी दिवानी' मधील काही गाणीही गायली. गाणी आणि कथा ऐकल्यानंतर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात गायकाचे मनोबल वाढवले. गायकाने 'तेरी दिवानी' या पुस्तकात ५० गाणी समाविष्ट केली आहेत. गाण्यासोबतच प्रत्येक पानावर त्याच्या कथेचा फोटोही समाविष्ट करण्यात आला आहे.

### व्हॅलेंटाईन डे ला सुरू झाला कंगनाचा कॅफे

**मंडी :** हिमाचल प्रदेशच्या मंडी येथील भाजपा खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतने व्हॅलेंटाईन डेला तिचा कॅफे सुरू केला आहे. उद्घाटनाआधी कंगनाने कार्तिक स्वामी मंदिरात विशेष पूजा केली. कंगनाने मनालीमध्ये 'द माऊंटन स्टोरी' नावाचे हे कॅफे (रेस्टॉरंट) उघडले आहे. रेस्टॉरंटमध्ये व्हेज आणि नॉनव्हेज दोन्ही प्रकारचे जेवण उपलब्ध असेल. व्हेज थाळी ६८० रुपयांना आणि नॉन-व्हेज थाळी ८५० रुपयांना मिळेल. तथापि, थाळी असलेल्या ग्राहकाने ती संपल्यावर अधिक अन्न मागितले तर त्याच्याकडून कोणतेही अतिरिक्त बिल आकारले जाणार नाही. ही थाळी ग्राहकांना पोटभर खाण्यासाठी बुफेसारखी असेल. कंगनाच्या कॅफेमध्ये ३० रुपयांना एक कप चहा मिळेल.



# महाकुंभात उरलेल्या अन्नावर जगत आहेत हजारो कुटुंबे

प्रयागराजमधील संगम नदीच्या काठावर स्थित श्रद्धेचा महाकुंभ. येथे येणाऱ्या भाविकांसाठी ५० हून अधिक भंडारे आयोजित केले जात आहेत. भाविकांनी जेवल्यानंतरही बरेच अन्न शिल्लक राहते. येथे आलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांसह १० हजार कुटुंबे हे उरलेले अन्न त्यांच्या पद्धतीने वापरत आहेत. ते केवळ स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबाचे पोट भरत नाहीत, तर उरलेले अन्नही सोबत घेऊन जातात.

आम्ही हे अन्न खात आहोत आणि गोळा करीत आहोत, जेणेकरून आम्ही निघताना ते आमच्यासोबत घेऊन जाऊ शकू. हे अन्न त्यांच्या गुरांना चारण्यासाठी वापरले जाईल. स्वच्छता कामगार म्हणतात की, त्यांना तीन महिने गुरांना पुरेल एवढे अन्न गोळा होण्याची आशा आहे.

**भंडाऱ्यातील भाकरी-तांदूळ वाळवून घरी नेतात**

त्रिवेणी तीरावर असलेल्या महाकुंभ परिसरात प्रवेश करताच संगमाच्या एका बाजूला बांधलेले विशाल आखाडे आणि विलोभनीय दृश्य पाहून आपण थक्क होऊ. प्रत्येक आखाडा तयार करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत. या झगमगाटाव्यतिरिक्त संगमच्या दुसऱ्या टोकाला शास्त्री पुलाखाली एक परिसर आहे, जिथे भव्य मंडप नाहीत, परंतु ४ बाय ४ फूट ताडपत्रीखाली राहणारी सुमारे १०,००० कुटुंबे निश्चितच जेवणाचा आस्वाद घेत आहेत.

जत्रेच्या स्वच्छतेची जबाबदारी असलेल्यांना मेळा प्रशासनाना संगमच्या एका कोपऱ्यात राहण्यासाठी खास जागा दिली आहे. हे सर्व लोक उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशातील वेगवेगळ्या शहरांमधून आले आहेत. गेल्या दीड महिन्यांपासून ही कुटुंबे सामुदायिक स्वयंपाकघर आणि आश्रमांमधून मिळणाऱ्या अन्नावर उदरनिर्वाह करीत आहेत.

उत्तरप्रदेशच्या फतेहपूर जिल्ह्यातून आलेले फूलचंद म्हणतात की, आम्ही गोदामातून चांगले अन्न खातो आणि जे थोडे खराब होते, ते आम्ही अनेक दिवस वाळवतो. वाळल्यानंतर हे अन्न जास्त काळ खराब होत नाही. बऱ्याचदा असे घडते की, आपल्याला गोदामातून उरलेले अन्न मिळत नाही. अशा परिस्थितीत आपण स्वतः अन्न शिजवतो.

## अग्रलेख...

# भारत-अमेरिका मैत्रीचे नवे पर्व

जगातील सर्वांत मोठी लोकशाही तसेच सर्वांत जुनी लोकशाही असलेल्या देशांच्या प्रमुखांची बहुचर्चित भेट नुकतीच झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीकडे या दोन देशांतील लोकांचेच नाही तर जगातील सगळ्या देशांचे लक्ष लागले होते. ही फक्त दोन देशांतील राष्ट्रप्रमुख वा सरकारप्रमुखांची भेट नव्हती, तर दोन सख्ख्या मित्रांची पण भेट होती. मोदी आणि ट्रम्प यांच्यात एक विशेष असा मैत्रिभाव आहे. त्यामुळे हे दोन नेते जेव्हा भेटतात, तेव्हा त्यात फक्त औपचारिकता आणि शिष्टाचार नसतो, तर आपुलकीची आणि आत्मीयतेची भावना असते. एक मित्र दुसऱ्या मित्राला भेटताना त्यांच्यात जो मनमोकळेपणा असतो, तसा मनमोकळेपणा या दोन नेत्यांच्या भेटीत असतो. त्यामुळे या दोन नेत्यांच्या भेटीत आणि बैठकीत फक्त चर्चा होत नाही तर गुजगोष्टी होतात, त्यामुळे दोन देशांतील अनेक मुद्यांवर अतिशय सहजतेने मार्ग निघून जातो.

नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, तर डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले. लोकप्रियतेत या दोन्ही नेत्यांचा हात जगात कोणी धरू शकत नाही. या दोन नेत्यांमधील आणखी एक साम्य म्हणजे दोन्ही नेत्यांनी आपल्या देशातील जनतेत राष्ट्रवादाची भावना जागवली. आधी देश, मग पक्ष आणि सर्वांत शेवटी मी म्हणजे व्यक्ती अशी मोदी यांची पर्यायाने भाजपाची भूमिका असताना ट्रम्पही अमेरिका फर्स्ट या धोरणाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत, हे त्यांच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीवरून स्पष्ट झाले. अमेरिकेत बेकायदेशीररीत्या घुसलेल्यांविरुद्ध ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर कारवाईही सुरू केली आहे. याच मालिकेत १०४ भारतीयांना अमेरिकेच्या लष्करी विमानाने अमृतसरला आणण्यात आले. हाताला बेड्या बांधलेल्या स्थितीत या भारतीयांना अमेरिकेने परत पाठवल्याच्या मुद्यावरून गदारोळही झाला होता. विरोधी पक्षांनी यावर आक्षेप घेतला होता. भारत सरकारनेही घुसखोरांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. आपल्या देशातील जनतेच्या भावनाही घुसखोरीच्या मुद्यावरून तीव्र आहेत. त्यामुळे अवैध मार्गाने घुसलेल्यांवर कारवाई करण्याचा अमेरिकेचा अधिकार कोणी नाकारणार नाही, अमेरिकेला तसा अधिकार आहे, पण भारतात परत पाठवणाऱ्या भारतीयांना यापुढे तरी बेड्या बांधून अमेरिकेने परत पाठवू नये, अशी सगळ्यांची स्वाभाविक अपेक्षा राहू शकते. या मुद्यावरही मोदी आणि ट्रम्प यांच्यात चर्चा झाली असू शकते.

मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीनंतर दोन देशांनी एक संयुक्त निवेदन जारी करत दोन देशांच्या दृढमैत्रीचा दाखला देताना दहशतवादाविरुद्ध एकत्र लढण्याचा निर्धारही व्यक्त केला. दहशतवादाच्या वैश्विक संकटाविरुद्ध लढण्याची तसेच जगाच्या कानाकोपऱ्यात दहशतवाद्यांचे लपण्याचे जे अड्डे आहेत, ते नष्ट करण्याची आवश्यकता यातून व्यक्त करण्यात आली. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांना दहशतवादाचे जेवढे चटके बसले तेवढे खचीत जगातील अन्य देशांना बसले असतील. दोन्ही देशांनी आपल्या संयुक्त निवेदनात पाकिस्तानचे स्पष्ट नाव घेतले नसले तरी त्यांचा निवेदनातून असलेला रोख लपून राहिलेला नाही. पाकिस्तान दहशतवादाचे समर्थन करतो, आपल्या भूमीचा वापर दहशतवादी संघटनांना दुसऱ्या देशाविरुद्ध दहशतवादी कारवायासाठी करू देतो, असा आरोप करत पाकिस्तानविरुद्ध कारवाई करण्याचा इशाराही संयुक्त निवेदनातून देण्यात आला. २६/११ तसेच पठाणकोटच्या दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना पाकिस्तानने न्यायालयासमोर खेचून आणले पाहिजे, असे या निवेदनात म्हटले आहे. याचा अर्थ २६/११ तसेच पठाणकोटवरील दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगार पाकिस्तानला माहिती आहे, पाकिस्तान त्यांना पाठीशी घालत आहे, असा अप्रत्यक्ष आरोप या निवेदनातून करण्यात आला. अल कायदा, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि इसिस यांच्यासह जगातील सर्व दहशतवादी संघटनांविरुद्ध एकत्रित लढवण्याचे आवाहन या निवेदनातून करण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानला मिरची लागणे स्वाभाविक होते. चोराच्या उलट्या बोंबा याप्रमाणे पाकिस्तानने भारतावरव आरोप केला. दहशतवादी घटनांना भारताचा छुपा पाठिंबा असल्याचा कोणाचाही विश्वास बसणार नाही, असा आरोप करत त्या देशाने आपलेच हसे करून घेतले. पाकिस्तानने या निवेदनावरून आपल्या सवयीप्रमाणे आगपाखड केली असली तरी यातून फारसे काही साध्य होणार नाही. दहशतवादी संघटनांशी आपले लागेबांधे असल्याचे पाकिस्तान नाकारू शकणार नाही, तसेच आपले निरपराधित्वही सिद्ध करू शकणार नाही. पाकिस्तान आणि दहशतवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वा दोन्ही समानार्थी शब्द आहेत, असे म्हटले तरी ते चूक ठरू नये.

भारत आणि चीन यांचे संबंध काहीसे तणावपूर्ण आहे. सीमावाद हा दोन देशांतील तणावाचे कारण आहे. चीनचे सैनिक नेहमीच भारताच्या हद्दीत घुसखोरी करत असतात. त्यामुळे भारत-चीन सीमावादात मध्यस्थी करण्याचा प्रस्तावही या भेटीत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासमोर ठेवला होता. पण द्विपक्षीय चर्चेवर विश्वास दाखवत भारताने तो सविनय फेटाळून लावला आहे. भारत आणि चीन यांच्यातील तणावाच्या मुद्यावर आम्ही द्विपक्षीय चर्चेतून मार्ग काढू, असा जो विश्वास भारताने व्यक्त केला, तो भारताच्या आतापर्यंतच्या भूमिकेशी सुसंगत असाच आहे. अमेरिकेने भारतासमोर असा प्रस्ताव ठेवण्याची ही पहिलीच वेळ नाही. आपल्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळातही ट्रम्प यांनी भारतासमोर असा प्रस्ताव ठेवला होता. यामागचा ट्रप यांचा छुपा हेतू काय असू शकतो, याची आपल्याला कल्पना नसली तरी त्यांची भूमिका प्रामाणिकपणाची आणि भारताच्या हिताची असावी, असे आपण समजू शकतो.

चीनशी मैत्रीचे संबंध कायम ठेवण्याची ग्वाही ट्रम्प यांनी दिली आहे. चीन हा आमच्यासाठी महत्त्वपूर्ण देश आहे. त्या देशासोबतचे संबंध पुन्हा सुरळीत झालेले असतील, असे ट्रम्प यांनी सांगितले. कोरोना आधीपर्यंत चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्याशी आपली चांगली मैत्री होती, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले. याचाच अर्थ कोरोना काळानंतर चीनचे अमेरिकेसोबत वा ट्रम्प यांच्यासोबत जे संबंध होते, ते तसे राहिले नाहीत, त्यात तणाव आला, हे स्पष्ट होते. याची कारणमीमांसा त्यांनी केली नसली तरी भारत आणि चीन यांचे संबंध आता जसे होते वा आहे, तसेच ते अमेरिकेसोबतही आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध संपवण्यात चीनची भूमिका महत्त्वपूर्ण राहू शकते, असा विश्वासही ट्रम्प यांनी व्यक्त केला तो अनाठायी म्हणता येणार नाही. अध्यक्षपदाच्या लढतीत असताना ट्रम्प यांनी, मी अमेरिकेचा अध्यक्ष झाल्यावर लगेच रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवतो, असे म्हटले होते. ट्रम्प यांचे ताजे विधान पाहिले तर रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आपण थांबवू शकत नसल्याची एकप्रकारची असहायता त्यांनी व्यक्त केली असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्री स्वीकारल्यानंतर निवडणूक प्रचारात दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने त्यांनी पावले उचलली आहेत, असे दिसते. पण ट्रम्प यांचे अनेक निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. ट्रम्प यांच्या कोणत्याही निर्णयाचा बरावाईट परिणाम हा फक्त अमेरिकेपुरता मर्यादित राहात नाही, तर साऱ्या जगावर त्याचा परिणाम होत असतो. मात्र काहीही असले तरी भारत आणि अमेरिका यांची मैत्री जगाच्या इतिहासात मैलाचा नवा टप्पा ठरणार यात शंका नाही. कारण ही मैत्री फक्त दोन देशांची नाही तर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या जगातील दोन प्रमुख देशांची आहे. अमेरिका हा आधीपासून महाशक्ती असला तरी भारताची वाटचालही आता विश्वगुरूच्या दिशेने सुरू झाली आहे. जगातील अनेक देशांना भारताकडून मोठ्या अपेक्षा आहे. त्यामुळे त्याच भूमिकेतून आपण याकडे पाहिले पाहिजे. ▮

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# इंडियाज गॉट पेशन्स?

इंडियाज गॉट लेटेंट या कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला विचारलेल्या अश्लील प्रश्नावरून खूप मोठा वाद निर्माण झाला आहे. मुळात हा प्रश्न अश्लीलही नव्हता. सध्याच्या युगात अश्लील कशाला म्हणायचं हा एक मोठा प्रश्न आहे. जसजसं जग बदलतं तसतशा गोष्टी, भाषाशैली, जीवनशैली बदलते. त्यामुळे एखादी गोष्ट २० वर्षांपूर्वी वर्ज्य मानली गेली असेल तर ती आता स्वीकार्य होऊ शकते. कारण काळ बदलतो आणि त्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोनही बदलतो. मात्र रणवीरने केलेली टिप्पणी ही अश्लीलतेच्याही पलीकडची आहे. केवळ अश्लील म्हणत या प्रश्नावर पडदा टाकता येत नाही. पहिली गोष्ट रणवीर आणि त्याच्या सहकाऱ्यांवर कारवाई होत आहे आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने नोटीस पाठवल्यानंतर कार्यक्रमाचा तो भाग काढून टाकला आहे. तसेच रणवीर आणि समय रैनाने याबाबत माफी देखील मागितली आहे. ज्यांच्यावर जी कायदेशीर कारवाई व्हायची ती होईल. त्यांचे अनेक फॉलोवर्स त्यांना अनफॉलो करून जातील. पण हा विषय या सर्व कारवाईच्या पलीकडचा आहे. हा विषय चिंतेचा आहे, भारताच्या भविष्याचा आहे.

रणवीरची बाजू घेणाऱ्या लोकांनी असं म्हटलं की जे लोक रणवीरवर टीका करतात ते आई-वडिलांवरून शिव्या नाही का देत? किंवा टीका करणाऱ्या लोकांची ब्राऊजर हिस्ट्री तपासायला हवी. मला या महाभागांना प्रश्न विचारायचा आहे की तुम्हाला लोकांच्या बेडरुममध्ये शिरायचंच का आहे? अनेक लोक शिव्या देत असतील, पण शिव्या देणं वाईट असतं हे समाजाने स्वीकारलं आहे ना? कुणीही घरात शिव्या देतं का? आणि जे देत असतील ते सगळीकडेच शिव्या देत बसतील का? सोशल मीडियावर काही गाढवं असतात. जे शिव्या दिल्याशिवाय बोलतंच नाहीत. तुमचे विचार पटले नाहीत तर लगेच घाणेरड्या शिव्या द्यायला सुरुवात करतात. म्हणे आम्ही असेच आहोत रांगडे. मग तुम्ही जिथे नोकरी करता, तिथे सहकाऱ्यांशी, बॉसशी अशाच भाषेत बोलता का? नाही ना? म्हणजे कुठे कोणती भाषा वापरायची याचं भान असावं लागतं. तुमच्या वाह्यात बोलण्यावरून तुम्ही स्वतःला कूल असल्याचे दाखवत असलात तरी समाजाच्या दृष्टिकोनातून तुम्ही वाह्यातच असता. दुसरी गोष्ट लोकांचे ब्राऊजर का तपासायचे आहेत. समजा लोक अश्लील चित्रपट पाहत असतील. पण अश्लील चित्रपट पाहणं वाईट असतं हे समाजाने मान्य केलेलं आहे ना? घरात सर्वांसमोर लोक असे चित्रपट पाहतात का? नाही ना? मग रणवीरच्या वक्तव्याचा आणि कुणाच्या वैयक्तिक आयुष्याचा संबंध जोडता कामा नये. रणवीरने जे म्हटलं ते अत्यंत घृणास्पद होतं हे मान्य करूनच चर्चा पुढे जायला हवी. रणवीर जे म्हणाला ते अश्लीलतेच्या पलीकडचं आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे.



रणवीरचे वैयक्तिक पॉडकास्ट तुम्ही पाहिले असतील तर त्याने अनेकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. काही आध्यात्मिक साधक व गुरूंच्या मुलाखती देखील त्याने घेतल्या आहेत आणि या पॉडकास्टमधून तो स्वतः साधना करत असल्याचे त्याने कबूल केले आहे. जी भाषा त्याने इंडियाज गॉट लेटेंटमध्ये वापरली, तशी भाषा त्याने स्वतःच्या पॉडकास्टवर कधीच वापरली नव्हती. पण तो कार्यक्रमच इतका वाह्यात आहे की त्याच्यातला वाह्यातपणा बाहेर आला. मला प्रश्न पडतो की रणवीरच्या आई-वडिलांना काय वाटलं असेल? त्याच्या घरच्यांची यावर काय प्रतिक्रिया असेल? असो, तर या विषयावर अनेकांनी आपलं मत व्यक्त केलं आहे. रणवीर किंवा आणखी अनेक इन्फ्युएंसर यांचे अनेक फॉलोवर्स असतील, पण आपल्या देशात असे अनेक लोक आहेत ज्यांना हे इन्फ्युएंसर कोण आहेत, हे माहितीच नसेल. दुसरी गोष्ट हा कंटेंट किंवा ही चर्चा वयात न आलेली किंवा नुकतीच वयात आलेली मुलं ऐकत व पाहत असतील. कारण त्यांच्या हातात मोबाईल आलेला आहे. मग त्यांना काय वाटत असेल? आपण कितीही आधुनिक झालो, कितीही मोकळ्या गप्पा मारल्या तरी आपण भारतीय आहोत हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. आपल्याला अत्यंत आधुनिकीकरण स्वीकारायचं आहे आणि हे करत असताना आपल्याला आपलं भारतीयत्व, आपलं हिंदुत्व सोडायचं नाही. कारण धर्मवेड्या ख्रिस्ती आणि इस्लामी शक्तीने अर्ध जग पादाक्रांत केलं असलं तरी हिंदू संस्कृती अजूनही तग धरून आहे. नव्हे आज जगात हिंदुत्वाचा डंका वाजत आहे. कुंभमेळ्यात इथल्या इन्फ्युएंसर्सना मोनालिसाचे डोळे आवडले असले तरी विदेशातील लोकांना इथल्या संस्कृतीचं आकर्षण वाटत आहे. कारण ज्या उपभोगाच्या गोष्टी इथले इन्फ्युएंसर्स करतात, त्या उपभोगाची परिसीमा पाश्चात्त्य जगाने गाठलेली आहे आणि त्यामुळे त्यांच्या संस्कृतीची प्रचंड हानी सुद्धा झालेली आहे. म्हणूनच त्यांना आता भोगऐवजी भारतातला योग खुणावत आहे.

भारतीय हिंदू संस्कृतीचं आणखी एक वैशिष्ट्य असं की इथल्या साधू-संतांनी जगाने हिंदू व्हावं म्हणजेच धर्मांतरण करावं अशी इच्छा न ठेवता जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितलेलं आहे. जगातल्या दोन मोठ्या धार्मिक सत्ता यासाठी परवानगी देत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून तुमचं कल्याण करून घ्यायचं असेल तर तुम्हाला त्यांचा धर्म स्वीकारावा लागतो. तुम्ही त्यांच्या धर्माचे नसाल तर तुमचं कल्याण व्हावं अशी इच्छा बाळगणे ही त्यांच्या धर्माची शिकवण नाही. इतकंच काय तर सर्व जगाने त्यांचा धर्म स्वीकारावा असा त्यांचा हिंसक अट्टहास देखील असतो. सांगायचे तात्पर्य मूळ हिंदू संस्कृती जगाच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. एकीकडे जगभरातील दिग्गज कुंभमेळ्याला हजेरी लावत आहेत आणि दुसरीकडे आपल्या देशातील तरुण आई-वडिलांच्या लैंगिक जीवनावर टिप्पणी करत आहेत, खिल्ली उडवत आहेत. तर कुणी सारंग साठे नावाची व्यक्ती मंदिर वही बनाएंगे स्टॅण्ड अप कॉमेडीचा विषय म्हणून फालतू विनोद करत आहे. ज्या मंदिराच्या निर्माणासाठी अनेकांनी प्रणांची आहुती दिली, आपलाच हक्क आपल्याच देशात मिळवण्यासाठी सनदशीर मार्गाने, लोकशाही मार्गाने प्रतिकार करून मंदिर निर्माण केलं. अशा विषयावर विनोद करता येत नाही हे पुण्यातल्या साठेला का कळत नसावं? भारताचं प्रतिनिधित्व आजही ज्ञानेश्वर माउली करतात, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज करतात, हिंदुसंघटक स्वा. सावरकर करतात, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात आणि या महापुरुषांच्या मार्गावर चालणारे नमस्ते सदा वत्सले मातृभूमी ही प्रार्थना म्हणणारे प्रत्येक जण करतात...

कला, मनोरंजन अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याचा जीवनाचा हा भाग आहे. नव्हे ही तर आपली संस्कृती आहे. कला आणि हिंदुत्व हातात हात घालून अनादी काळापासून सुखाने नांदत आहेत. आता काळाला अनुसरून त्यात बऱ्याचदा खट्याळपणा, खोडकरपणा येतोच. ज्यास वर्ज्य म्हणले जाते तेही कधीकधी डोकावते. पण प्रत्येक कलाकाराने आपली सीमा आखली पाहिजे. इंडियाज गॉट लेटेंट हा केवळ एक कार्यक्रम नाही तर ही संस्कृती (खरे तर विकृती) आहे. हे केवळ या एका कार्यक्रमापुरती मर्यादित नाही. तर हा वोक कल्चरचा एक छोटासा भाग आहे. तर या विकृत संस्कृतीच्या पाठीराख्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की 'इंडियाज गॉट पेशन्स'... पण पेशन्सलाही मर्यादा आहेत बरं का!

*आंगिकम भुवनम यस्य, वाचिकं सर्व वाङ्मयम*
*आहार्यं चन्द्र ताराधि, तं नुमः सात्विकं शिवम्* ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ऑलिम्पिकचा पाया

उत्तरप्रदेशात महाकुंभ सुरू असतानाच त्याच्या शेजारी राज्यात उत्तराखंडमध्ये २८ जानेवारीपासून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा सुरू आहे. यात भारतातील सर्वच राज्यांनी भाग घेत आपली छाप सोडली आहे. सुमारे १८ दिवस चाललेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा समारोप १४ फेब्रुवारी रोजी झाला. यात क्रीडा नियंत्रण मंडळाने सर्वाधिक सुवर्ण पदके जिंकली असली तरी महाराष्ट्राने वेगळीच छाप या सोडली आहे. महाराष्ट्राने एकूण २०० पेक्षा जास्त पदके जिंकली आणि स्पर्धा संपेल तेव्हा महाराष्ट्राच्या आसपास कोणू पोहोचू शकणार नाही. इतकी पदकांची संख्या मोठी आहे. स्पर्धेच्या समारोपाला सुमारे दोन हजार व्हीआयपी आणि अडीच हजार व्हीव्हीआयपी उपस्थित होते. स्पर्धेचा यजमान उत्तराखंडने शेवटच्या दिवशी पदकांची शंभरी पूर्ण केली.

पूर्वीच्या काळात फक्त अभ्यास केल्याने आणि त्या आधारावर चांगली नोकरी मिळाली की मुलांचे आई-वडील धन्यता मानत होते. आमचा मुलगा बँकेत कॅशियर आहे, डॉक्टर, अभियंता आहे हे सांगताना पालकांची छाती फुगून जायची. त्यावेळी क्रीडा क्षेत्र नगण्य होते. पण मागील काही वर्षांत क्रीडाला अच्छे दिन आले आहेत. केंद्रातील भाजपा प्रणीत रालोआ सरकारने क्रीडाकडे विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली आणि मुलांसह पालकांचाही क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. मागील काही वर्षांत अगदी ग्रामपंचायत स्तरापासून, तालुका, नगर, विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना जणू उधाण आले आहे. त्यात गावपातळीवरील खेळाडू चमकू लागले आहेत. पण यासाठी पालकांची मानसिकता बदलणे गरजेचे होते. ते काम केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी मागील दहा वर्षांत केले. गावखेड्यातील मुलगा किंवा मुलगी यांच्यातील कलाकौशल्य हेरून त्याला पैलू पाडण्याचे काम सुरू आहे. यातून खेळाडू चांगले कौशल्य दाखवत आहे. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी खासदार क्रीडा महोत्सव सुरू आहेत. नागपुरात तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संयोजनात असा महोत्सव मागील काही वर्षांपासून नियमित सुरू आहे. त्यात खेळाडू आपले कौशल्य दाखवतात. त्यांना मोठे बक्षीस देऊन प्रोत्साहन देण्यात येते. यामुळे खेळाडूंमध्ये क्रीडाविषयी सकारात्मक भावना निर्माण होऊन तो अजून परिश्रम करतो.

पूर्वी क्रीडा म्हणजे फक्त क्रिकेट हा समज होता. पण त्या खेळात खेळाडूंना सामावून घेण्याच्या मर्यादा होत्या. मग इतर खेळांकडे मुलांना वळवण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जाऊ लागल्या. त्यात विजयी खेळाडूंना घसघशीत पारतोषिक देण्यात येऊ लागले. यामुळे विद्यार्थ्यांना खेळाबद्दल आवड निर्माण झाली. सरकारनेही गल्ली ते दिल्लीपर्यंतच्या होतकरू खेळाडूंना हेरून त्यांना प्रोत्साहन देणे सुरू केले. आता तर कबड्डी, खो-खो च्या स्पर्धा मोठ्या प्रमाणात होत आहेत. यातून खेळाडूंचे आर्थिक उत्पन्न वाढल्याने त्यांच्या जीवनशैलीतही आमूलाग्र बदल झाला आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन इतरही विद्यार्थी खेळाकडे वळत आहेत. पालकांचाही पाठिंबा मुलांना मिळत आहे. यात फक्त शहरीच नव्हे तर अगदी वनवासी मुलांनाही प्रोत्साहन देण्यात येत आहे. धनुर्विद्या क्रीडा प्रकारात त्यांची जास्त रुची असल्याने किंवा त्यांचे शरीर काटक असल्याने त्यांचे गुण विकसित करण्यात येऊन त्यांना तशा प्रकारच्या क्रीडा प्रकारात घेतले जात आहे. त्यांना मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी करून त्यांचा आर्थिक विकास करण्यात येत आहे. यामुळे त्यांची आणि त्याच्या कुटुंबाची आर्थिक उन्नती साधली जात आहे. फक्त राजकारण करण्यापेक्षा इतरही क्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण केंद्र सरकारने आखले असल्याने अनेक जण क्रीडाकडे वळत आहेत. त्यासाठी लहानपापासून विद्यार्थ्यांना घडविण्यात येते. परंपरागत शिक्षणासोबतच कौशल्ययुक्त शिक्षणही देण्यात येत असल्याचे विद्यार्थी मानसिकरीत्या सुदृढ होत आहे. यातूनच काही वर्षांनी होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत हेच खेळाडू भारताचा तिरंगा मानाने फडकवतील. पण यासाठी आतापासूनच त्याचा भक्कम पाया रचला जात आहे, ही चांगली गोष्ट आहे. आता तर भारताने २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी यजमान म्हणून दावा केला आहे. त्यासाठी केंद्र सरकार, क्रीडा मंत्रालयाचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. यासाठी तेथे येणाऱ्या खेळाडूंना भौतिक सुविधा देता येतीलही, पण स्पर्धेत यजमान देश म्हणून भारताने पदकतालिकेत सन्मानजनक स्थान मिळवणे आवश्यक राहणार आहे. त्याचा मजबूत पाया राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांतून रचला जात आहे. अशा स्पर्धांतून अनेक मुले समोर येतील आणि ऑलिम्पिकमध्ये आपला, आपल्या गावाचा, शहराचा आणि देशाचा नावलौकिक करतील. ▮

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# बुडत्याचा पाय खोलात!

शरद पवारांच्या नादी संजय राऊत लागले आणि संजय राऊतांच्या नादी उद्धव ठाकरे लागले. ना संजय राऊतांना शरद पवार कळले, ना उद्धव ठाकरेंना संजय राऊत... एकमेकांच्या नादी लागून, वैयक्तिक स्वार्थापोटी निष्ठा, श्रद्धा आणि दैवतं बदलून ही मंडळी होत्याचं नव्हतं करून बसली. तेलही गेलं आणि तूपही... अशी यांची आजची अवस्था आहे. महाराष्ट्र आणि देशातील मोठमोठे पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना अफूची गोळी देत महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडी करणारे महामहिम शरदचंद्र पवार साहेब होते. यांच्या नादी लागून काही लोकांनी अर्थात दिल्लीत अरविंद केजरीवाल, राहुल गांधी, उत्तर प्रदेशात अखिलेश यादव, बिहारमध्ये लालू प्रसाद यादव, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी अशा सगळ्या मंडळींनी आणि महाराष्ट्राचंच सांगायचं झालं तर, उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीने केंद्र सरकार, पंतप्रधान, मोदी-शाह यांच्या नावानं शिमगा केला, प्रचंड अकांडतांडव केला. पण अफूची गोळी देणारे 'वशीकरण बाबा'ने मात्र, आपली 'बॅकडोअर डिप्लोमसी' व्यवस्थित सुरू ठेवली.

'वशीकरण बाबा'च्या गोळीचा प्रभाव उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीवर थोडा जास्त झाला. त्यांनी भाजपा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्याविषयी पातळी तर सोडलीच मात्र, आता तर ज्यांनी २०१४ मध्ये यांची लाज वाचविली त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी वाळवीसारखा शब्दप्रयोग करून सीमाच ओलांडली. पक्ष गेला, चिन्ह गेलं, महाराष्ट्राने नाकारलं अशी परिस्थिती असताना, 'सुंभ जळला तरी पीळ' मात्र कायम असल्यागत यांचं झालं आहे. प्रत्यक्षात भाजपाने फाट्यावर मारले असले तरी, थोड्याअधिक प्रमाणात पुनर्वसन होण्यासाठी चुंचू प्रवेशाची शक्यता संघाच्या मध्यस्थीने कायम होती. पण काहीही बरळून स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेणाऱ्या ठाकरे ॲण्ड कंपनीची 'बुडत्याचे पाय खोलात' अशी अवस्था आजघडीला झाली आहे.

मुळात राज्यात एकमेव प्रादेशिक पक्ष आपलाच असला पाहिजे यासाठी गेली ३४ वर्षे प्रयत्नात असणाऱ्या शरद पवारांनी २०१९ मध्ये खेळी खेळली आणि शिवसेनेला मुख्यमंत्रिपदाचं हाडूक दाखवून, त्यांच्या अधःपतनाची पक्की व्यवस्था केली. शिवसेना संपली तर, केवळ महाराष्ट्रात एकमेव आपलाच पक्ष असेल, असा त्यामागचा पवारांचा कुटिल डाव होता. या सापळ्यात शिवसेना अर्थात उद्धव ठाकरे अलगद अडकले. त्यासाठी शरद पवारांनी संजय राऊत नावाच्या प्याद्याचा योग्य प्रकारे वापर केला. सगळे फासे व्यवस्थितच पडत होते. मात्र, पवारांनी पडद्यामागे भाजपालाही खेळवत ठेवून, ऐनवेळी दगा दिल्यानं सारा खेळ फसला. आता काय शिवसेना संपविण्याच्या नादात साहेब आपलाही पक्ष, चिन्ह, नेते, कार्यकर्ते गमावून बसले आणि राष्ट्रीय पक्षाची मान्यता देखील हातची गेली. असे असले तरी, साहेब मात्र, मुत्सद्दी राजकारणी आहेत. त्यांनी पुन्हा कमबॅक करण्याच्या हालचाली सुरू ठेवल्या आहेत. त्यांचे दरवाजे उघडे आहेत. पण त्याचवेळी साहेबांनी ठाकरेंसाठी सर्व दरवाजे आणि मार्ग बंद होण्याची पुरेपूर व्यवस्था करून ठेवली आहे.

आता जुन्या घडामोडींचा ऊहापोह आज का? तर, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दिल्लीत मराठा पातशाहीचे धुरंधर नेतृत्व महादजी शिंदे यांच्या नावाने राष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. आणि महत्त्वाची, काही लोकांना मिरची झोंबणारी घटना म्हणजे, शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर ठाकरे ॲण्ड कंपनीचा झालेला जळफळाट अवघ्या महाराष्ट्राने बघितला. ज्यांच्या जिवावर मुख्यमंत्रिपद उपभोगले आता त्यांच्यावरही विश्वासघातकीसारखे शब्द वापरून तोंडसुख घेण्यात जगातील बेस्ट सीएमचा घरगडी असलेल्या विश्वप्रवक्त्याने तसूभरही वेळ घालवला नाही. त्यामुळे ठाकरे ॲण्ड कंपनी 'ज्याचं खाईल, त्याचंच गाईल...' हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

काहीही असले तरी, एकनाथ शिंदेंच्या या सत्काराच्या निमित्ताने राज्यातील राजकारण तापले. विशेष म्हणजे महाविकास आघाडीत ठिणगी पडली. आणि त्यावरून पुन्हा शाब्दिक युद्ध रंगले. मग काय बोलघेवडे केवळ राऊतच आहेत अशातला भाग थोडी आहे. त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे असलेले बोलघेवडे शरद पवारांकडेदेखील आहेत. मग त्यातल्या एका, अर्थात जितेंद्र आव्हाड नावाच्या बोलघेवड्याने संजय राऊतांना खडेबोल सुनावले. शब्द जरा जपून वापरा... विश्वासघातकी वगैरे खपवून घेणार नाही, अशा शब्दांत खडसावले. बरं पवारांच्या शिलेदाराने राऊतांचा समाचार घेतला तो घेतलाच. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे ठाकरे गटाचे माजी आमदार वैभव नाईकांनी देखील राऊतांचा क्लास घेतला. शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री झाले. कसे झाले, काय झाले, हे अवघ्या महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांचा राजकीय प्रवास, पृष्ठभूमी, राजकीय खेळ्या सर्वश्रुत आहेत. हे काय महाविकास आघाडी तयार करण्याआधी माहिती नव्हतं? आता थयथयाट करून काय उपयोग आहे? अशा शब्दांत नाईकांनी संजय राऊतांना घरचा आहेर दिला. आता 'ना घर का ना घाटका' अशी अवस्था असणाऱ्या उद्धव ठाकरेंना भाजपाशी फारकत घेण्याची वेळ आणणाऱ्या शरद पवारांशी वाकडं घेऊन राजकारणात एकटे पडण्याची वेळ राऊतांमुळे आली आहे. भाजपाशी तुटलं, संघाशी स्वतःहून खाजवलं, पवारांना खिजवलं आणि काँग्रेससोबत वाजलं, ही जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याला कारणीभूत उद्धव ठाकरे स्वतः असून, त्यांना खतपाणी घालणारे राऊत आहेत.

कोण, कोण कोणाला टोप्या घालत आहे आणि टोप्या उडवत आहे, हेच काही कळेनासं झालं आहे. कोण गुगली टाकत आहे, हेदेखील कळत नाही आहे. हे उद्विग्न विधान आहे विश्वप्रवक्ते राऊत साहेबांचे... यांच्या खुर्चीला सुरुंग लावून, लंका पेटविणाऱ्याचा सन्मान करून, उलट महाराष्ट्राला समोर नेण्याचं उत्तम कार्य केल्याचे गौरवोद्गार काढल्यानंतर, २०१९ मध्ये टाकलेली टोपी, गुगली आदींचं स्मरण आता झालेलं दिसत आहे. मात्र, राऊतांच्या टोप्या घालण्याच्या विधानाला उद्धव ठाकरेंनी गंभीरतेने घेतल्यास पुढील प्रवास सुखाचा होईल. ▮

९२७०३३३८८६

### ध्वनिप्रदूषणाचे भान असावे!

सध्या स्टेट, सीबीएसई आणि तत्सम बोर्डाच्या दहावी आणि बारावीच्या काही परीक्षा सुरू झाल्यात व काही परीक्षा सुरू होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या करीअरमध्ये या परीक्षा अत्यंत महत्त्वाच्या असतात. जीवनात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी मदत करतात. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी दोन तीन वर्षे सातत्याने मेहनत घेतलेली असते. या दृष्टीने अशा संवेदनशील काळात व्यवस्थित अभ्यासासाठी वातावरण निर्मिती सुद्धा आवश्यक आहे. घरात अशी परिस्थिती नियंत्रणात ठेवता येते परंतु बाहेरील नियंत्रणासाठी प्रशासन आणि समाजाचीही गरज आहे. विशेषकरून ध्वनिप्रदूषण होणार नाही, कार्यक्रमांत आवाजाची तसेच वेळेची मर्यादा राखण्यासाठी काळजी घेतली गेली पाहिजे. संबंधित प्रशासन खासकरून स्थानिक पोलिस विभागास नम्र विनंती आहे की त्यांनी ध्वनिप्रदूषणावर नियंत्रणासाठी आवश्यक ते जाहीर प्रगटन करावे आणि याबाबत कडक सूचना द्याव्यात. समाजातील घटकांनी सुद्धा यास सकारात्मक प्रतिसाद द्यावा ही विनंती. परीक्षेपुरतेच नव्हे तर नेहमीसाठीच आवाजाची तीव्रता मर्यादित असल्यास उत्तमच, याचा सर्वांनाच फायदा होईल.



**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

## वाचक पत्रे

### अतिक्रमणाच्या विळख्यात नागनदी

नाग नदीच्या दोन्ही बाजूंनी मागील दहा वर्षांत दुप्पट प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. नदीच्या प्रवाहात अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. नाग नदीवरील सर्वच अतिक्रमणांचा तातडीने निपटारा करण्यात यावा, असा न्यायालयाचा स्पष्ट निर्देश असताना याकडे सातत्याने कानाडोळा होत आहे.

नदीच्या पात्रात सिमेंट कॉलम टाकून अनधिकृत बांधकाम व काठावर बेकायदेशीर झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत त्यामुळे नाग नदीचा प्रवाह अरुंद झाला आहे. या कारणांमुळे पावसाळ्यात पूरस्थिती कायम राहून पुरामुळे रहिवाशांचे नुकसान होऊ शकते. नदीपात्रातील बेकायदेशीर झोपडपट्ट्या हटविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येतो. उच्च न्यायालय तत्काळ कारवाईचा आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देते, परंतु काही दिवसांत जैसे थे स्थिती निर्माण होते. ७ फेब्रुवारीपासून नाग नदी, पिवळी नदी व पोहरा नदी स्वच्छ करण्याच्या कामांना सुरुवात होणार होती. या नदी स्वच्छता कार्यक्रमांतर्गत नदीतील केवळ गाळ काढणे एवढेच काम करण्याचे ठरलेले असते असे वाटते. पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे हे गाळ काढण्याचे काम वाया गेलेले आपल्याला दरवर्षी दिसते. पावसाळ्यात येणारे पुराचे पाणी नदीतून योग्यरीत्या वाहून जाण्याकरिता नदीला आवश्यक तो आकार देणे गरजेचे आहे, पण याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे असे दिसते. अतिक्रमणाचा प्रश्न केवळ नदीपात्राचा नसून पदपथांवर सुद्धा अतिक्रमण झालेले आहे. या दोन्ही ठिकाणी होणाऱ्या अतिक्रमणाबाबत, अतिक्रमण होण्यापूर्वीच मनपा का काळजी घेत नाही, हा मोठा प्रश्न आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

●● ●●

### विविध ओळखपत्रांमधील चुका आणि ज्येष्ठांची गैरसोय

आज भारतात प्रत्येक कार्यालयीन कामासाठी ओळखीचा पुरावा आवश्यक आहे आणि त्यासाठी आपण रेशन कार्ड, आधार, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, पासपोर्ट, जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता, अधिवास, जन्म प्रमाणपत्र इत्यादींचा वापर करतो. साधारणपणे नाव, वडिलांचे नाव, आडनाव, पत्ता, फोन, ईमेल यामध्ये चुका आढळतात. आयडी इ. प्रत्येक कागदपत्र एकमेकांशी संबंधित गोष्टींशी जुळले पाहिजे. परंतु चुका झाल्यामुळे कोणत्याही गोष्टीत विसंगती आढळून आल्याने नागरिकांना समस्या भेडसावत आहे. ते त्यांचे अधिकृत काम त्वरित करू शकत नाहीत, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना समस्या आणि आव्हानांना सामोरे जावे लागते कारण त्यांचे वय, आजारपण, अशक्त पणा यामुळे ते सहन करू शकत नाहीत. कारण त्यांच्यासाठी दस्तावेज आवश्यक असल्याने त्यांना धावपळ करावी लागते. त्यामुळे दस्तावेजात अचूकता आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने यावर काम करणे आवश्यक आहे. आणि प्रथम ठिकाणी चुका टाळण्यासाठी उपाय आणणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांचा आणि सरकारी अधिकाऱ्यांचाही वेळ वाचणार आहे.

विशेषतः केंद्र आणि राज्य सरकारला विनंती आहे की चुका होऊ नयेत जेणेकरून नंतर नागरिकांना बदलासाठी धावपळ करण्याची गरज पडणार नाही. कृपया ज्यांना याबाबत अधिकार आहेत त्यांनी त्याची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी. ▮

**गणेश शेवते**/९०९६१५२९४९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शाश्वत विकासाठी कृषी संकटावर उपाययोजना आवश्यक : डॉ. गोयारी

## विकसित भारत २०४७ राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

स्वातंत्र्यानंतर भारताला विकासाच्या मार्गावर कृषी क्षेत्रातील हरित क्रांतीने अन्नधान्यात स्वयंपूर्ण होण्यास मदत केली. आजही भारतीय अर्थव्यवस्थेच्या जीडीपी मध्ये कृषी क्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे भारताच्या शाश्वत विकासाठी कृषी क्षेत्रातील संकटावर उपाय योजना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन हैद्राबाद येथील केंद्रीय विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विषयाचे प्रा. डॉ. फनिंद्र गोयारी यांनी केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि पीएम उषा अंतर्गत विकसित भारत २०४७ शाश्वत विकासाचे मार्ग या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्धाटन प्रसंगी डॉ. गोयारी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर, सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, प्राचिन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, प्रा. राम भोसले, प्रा. अश्वीनी पांढरे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण आणि दिप प्रज्वलन करुन उद्धाटन करण्यात आले.

यावेळी पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. निलम यादवा, डॉ. भक्ती महिंद्रकर यांनी विकसित भारत २०४७ : सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकास आणि आव्हाने या विषयावर मांडणी केली. प्रस्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार प्रा. राम भोसले यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी इम्रान शेख, भैरवनाथ भुसारे, बालाजी सग्गम, बसवकुमार लंगोटे, राजेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त



### सेवासदन प्रशालेत मातीकाम, पॉटरी मेकिंग वर्गाचे उद्घाटन

**सोलापूर दि. १४ फेब्रुवारी-**

येथील सेवासदन प्रशालेत सेवासदन संस्था आणि अक्षरगाथा कलावर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने मृदगंध हा विद्यार्थ्यांसाठी मतिकाम पॉटरी मेकिंग वर्गाचे उद्घाटन पुणे सेवासदन संस्थेचे उपाध्यक्ष नितीन लेले, यांच्या हस्ते करण्यात आले. माती कामाचा अभ्यास हा सध्या बाल वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा असून त्यामध्ये मुलांच्या हस्त कौशल्य विकास बरोबरच मातीशी नाळ जुळणे व अनेक मूलभूत नैसर्गिक क्षमतांचे विकसन होण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतील. या वर्गासाठी कलाध्यापक शैलेश कुडगुंटे, विनायक घाटगे यांचे सहकार्य लाभणार आहे. त्याचबरोबर संस्थेत बालआविष्कार संध्या वर्गालाही सुरुवात झाली असून यामध्ये वय वर्षे ४ ते १२ या वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. त्यांना विविध बौद्धिक, शारीरिक खेळ, श्लोक पठण, उच्चार शुद्धी कथाकथन या प्रकारचे सायंकालीन वर्ग ६ ते ७ या वेळेत चालणार आहेत. या वर्गासाठी कलाध्यापक मतिकाम पॉटरी मेकिंग वर्गाच्या या कार्यक्रमासाठी शाळेतील श्रावणी डोंगरे, श्रेया भुसे, ज्ञानेश्वरी पवार, अंजली बेद्रे, राधा शिंदे, श्रेया वराडे, अंकिता राजगुरू या विद्यार्थिनींचे सहकार्य लाभले. शाळेतील या उपक्रमाबद्दल पुण्याच्या संस्थेने कौतुक केले आहे. याप्रसंगी सेवासदन संस्था पुणेचे सदस्य श्रीनिवास इनामती, सहसचिव अर्चना शहाणे, संस्थेच्या अध्यक्षा शीलाताई मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ राजीव प्रधान, सचिव वीणा पतकी, सदस्य डॉ.श्रीकांत येळेगावकर, राजेंद्र गांधी, अमोल चाफळकर, विद्या लिमये, अर्चना कुलकर्णी, मंजिरी कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी उपस्थित होते.

### सांगोला महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ

**सांगोला, दि.१४ फेब्रुवारी-**



सांगोला महाविद्यालयामध्ये दि.१७ व १८ फेबुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ होत आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कवी अनंत राऊत उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सां. ता. उ. शि. मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड भूषविणार आहेत अशी माहिती प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. संतोष लोंढे यांनी दिली. दोन दिवस चालणाऱ्या या विद्यार्थी स्नेहसंमेलनामध्ये सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी शेलापागोटे, रांगोळी प्रदर्शन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. गजानन भाकरे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्था सचिव ॲड. उदय घोंगडे हे आहेत. विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक बी. एस. खंणदाळे यांच्या हस्ते होणार आहे. मंगळवार दि.१८ फेबुवारी रोजी होणाऱ्या संगीत शेलापागोटे व प्रेरणा आणि गॅलक्सी भितीपत्रकाचे उद्घाटन संस्था उपाध्यक्ष प्रा. पी. सी. झपके यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी क्रीडा, रांगोळी, कथाकथन, काव्यवाचन, निबंध व वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## गणित विषयक कार्यक्रमांमध्ये १८३ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र राज्य आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने गणित विभाग, संगणकशास्त्र संकुलामध्ये दि. ६ आणि ७ फेब्रुवारी दरम्यान गणित विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करून राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून १८३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. उद्घाटन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने प्रथम व तृतीय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठने द्वितीय क्रमांक पटकाविला. भास्कराचार्य भित्तीपत्रक प्रदर्शनात पदवी विभागामध्ये नातू विश्वजीत तानाजी, व कदम श्रद्धा शिवाजी, यांनी प्रथम, प्राप्ती नागेश निकम, वालचंद कॉलेज, सोलापूर व प्राजक्ता शिवाजी गायकवाड, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज यांनी द्वितीय तसेच वाघमारे प्रथमेश बंडू, डी.एस.जी. कॉलेज, मोहोळ याने तृतीय, पंचांगे अंजली संतोश, डी.एस.जी. कॉलेज, मोहोळ उत्तेजनार्थ, भास्कराचार्य भित्तीपत्रक प्रदर्शन पदव्युत्तर विभागामध्ये कदम आकांक्षा हरीषचंद्र, एसआरटी एम. विद्यापीठ, नांदेड या विद्यार्थीनीने प्रथम, पवार अंजली महादेव, पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ हिने द्वितीय, बिराजदार अमृता वैजनाथ व राठोड विद्या विलास, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ या विद्यार्थीनींनी तृतीय क्रमांक तर पाटील अर्शिया फैयाज, के. बी. पी. कॉलेज, पंढरपूर हिने उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी लोणावळा येथील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीरिंगचे दयानंद व्यवहारे, व MIT कॉलेज ऑफ रेलवे इंजिनीरिंग अँड रिसर्च, बार्शीचे चेतन अध्ये यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. अभियोग्यता चाचणी पदवी विभागामध्ये ऋषीकेश विष्णू फुगे, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूरने प्रथम, नातू विश्वजीत तानाजी, दयानंद सायन्स कॉलेज, लातूर व डोंगरे तेजस्विनी केशव, के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर या विद्यार्थ्यांनी द्वितीय, मंगेश मनोज घोडके, श्री शिवाजी कॉलेज, बार्शी व हिरोळी विजयालक्ष्मी सूर्यकांत, सी.बी. खेडगी कॉलेज, अक्कलकोट यांनी तृतीय तर विनायक आदिनाथ चिवडे, महात्मा गांधी कॉलेज, अहमदपूरने उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. अभियोग्यता चाचणी पदव्युत्तर विभागामध्ये साठे निखिल सतीश, दयानंद कॉलेज, सोलापूर, कदम आदित्य अरविंद, एस.आर.टी.एम., नांदेड यांनी प्रथम, लक्ष्मी हिंगणगावकर पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ हीने द्वितीय, राठोड विद्या विलास, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ या विद्यार्थीनींने तृतीय तर पाटील अर्शिया फैयाज, के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर हीने उत्तेजनार्थ पटकाविला. समारोपप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची प्रमुख उपस्थिती होती. महिमा जगले यांनी सूत्रसंचालन विशाल कोळी यांनी आभार मानले.

## दक्षिण तालुक्यातील गाव पर्यटन मंद्रुपमधून सुरु करणार : आ. सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

> मंदिरात सच्चिदानंद स्वरुप भगवंतांची प्रतिष्ठापना झालेली असते. त्याच देवाच्या समिधा कळसामध्ये असतात, त्यामुळे मंदिरात देवाचे दर्शन झाल्यास त्यावरील कळस दर्शनाने देखील पुण्य लाभते. सुर्यांतर्गत असणारा नारायण, वासुदेवासह अनंत समिधा भगवंतांच्या कळसामध्ये असतात, असे आशीर्वचन उत्तराधीमठाचे पीठाधीश श्रीश्रीश्री सत्यात्मतीर्थ महास्वामीजी यांनी केले. त्यानंतर उपस्थित भाविकांना त्यांनी आशीर्वचन दिले.

श्री विठ्ठलासह राही व रुक्मिणी मातेची एकत्रित मूर्ती सहसा कुठेही आढळत नाही, असे दुर्मिळ क्षेत्र मंद्रूपमध्ये आहे. श्री विठ्ठल भक्तांची प्रतिपंढरपूर असलेल्या मंद्रूपच्या श्री विठ्ठल मंदिराचे धार्मिक दृष्ट्या महत्व सर्वांपर्यंत पोहोचवण्यात येईल. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातून पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी 'पर्यटन परिक्रमा' सुरु करणार आहे. त्याची सुरवात मंद्रूप येथून करण्यात येणार असल्याचे, आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले. धार्मिक पर्यटनाद्वारे गावाच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळते. स्थानिकांना रोजगार मिळतो, त्यामुळे मतदारसंघातील प्रत्येक गावांचे वैशिष्ट्य सर्वांसमोर मांडून त्या गावविकासाला चालना मिळाले, असेही देशमुख यांनी सांगितले. आमदार सुभाष देशमुख यांनी शुक्रवारी कळसारोहण निमित्ताने श्री विठ्ठल मंदिराचे दर्शन घेतले. श्री विठ्ठल मंदिर येथे भाविकांसाठी भक्त निवास, मंदिरावर सौर उर्जा-संच बसवण्यासाठी निधी देण्याची मागणी पांडुरंग देवस्थान समितीचे सचिव अनंत देशपांडे यांनी केली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, सरपंच अनिता कोरे, माजी सभापती अप्पाराव कोरे, गुरुसिद्ध म्हेत्रे, ॲड. राजेश देशमुख, मळसिद्ध मुगळे, प्रभाकर कोरे उपस्थित होते.

मंद्रूप येथील श्री विठ्ठल, राही, रुक्मिणी मंदिराचा कळसारोहण शुक्रवारी सकाळी सत्यात्मतीर्थ स्वामींच्या हस्ते झाले. सकाळी नऊ वाजता स्वामीजींचे मंद्रूपमध्ये आगमन झाले. मधला मारुती मंदिर ते विठ्ठल मंदिर मार्गावर त्यांची पदयात्रा मार्गावर फुलांच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. मंदिरामध्ये स्वामीजींचे आगमन झाल्यानंतर त्यांच्या हस्ते कळसाची पूजा करण्यात आली. त्यानंतर नवीन शिखरावर स्वामीच्या हस्ते कळस बसविण्यात आला. पुंडलिका वरदे, हरी विठ्ठल.. असा भाविकांनी केलेल्या जयघोषाने मंद्रूप नगरी दुमदुमली.



कळसारोहण सोहळयाच्या निमित्ताने मागील सहा महिन्यांपासून मंदिर समिती व तीर्थराज युवक मंडळाचे प्रयत्न सुरु होते. अन्नदान, शिखर बांधकामासाठी भाविकांनी उस्फुर्त सहभाग दिल्याबद्दल देवस्थान समितीचे अध्यक्ष सुधीर देशपांडे, विठ्ठल गंभिरे, विजय देशपांडे, भालचंद्र देशपांडे, गिरीधर देशपांडे यांनी गावकरी, भाविकांचे आभार मानले. कळसारोहण सोहळ्यासाठी आलेल्या भाविकांना पांडुरंग देवस्थान तर्फे देवाची प्रतिमा, उत्सव परंपरेची पुस्तिका, बुंदीचा लाडू, बुक्का प्रसाद म्हणून देण्यात आला. दोन हजारांपेक्षा जास्त भाविकांनी मंदिराचे दर्शन, महाप्रसादाचा लाभ घेतला.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये नवगतांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ फेब्रुवारी-**

सह्याद्री फार्मसी कॉलेज, मेथवडे येथे नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

उद्घाटन डॉ. मैत्रेयी केसकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, विश्वजित इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील, प्रा. एस. एस. काळे यांच्या हस्ते करण्यात आले. नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्यकला, नाटक, वेशभूषा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एन.ए.तांबोळी, प्रा.एस.पी. जोकार यांनी तर सुत्रसंचलन आदित्य कम्बीरे, मयुरी लोकरे, प्रीती कारंडे, दिपाली पारेकर, ओंकार हत्तीगोटे, रोहन कोडग, नियती काटकर, अस्मिता बिले यांनी केले. आभार डॉ. भारत गरंडे यांनी मानले.

मनोरमा परिवार अंतर्गत

**अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे, व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)
प्राची अनिल गोसावी, व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)

**मध्य रेल्वे**
विद्युत विभाग
ई-निविदा सूचना

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, सेंट्रल रेलवे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून Rallways e-procurement वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करतात.

निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/46.

कामाचे नाव:- सोलापूर विभागातील सर्व ॲक्सेसरीजसह विविध क्षमतेच्या पंपांच्या ऊर्जा कार्यक्षमतेच्या तरतुदीच्या संदर्भात विद्युत सामान्य सेवा भागाचे काम. अंदाजे किंमत :- रू. **1,60,74,494.89/-**, Bid सुरक्षा :- रू. **2,30,400.00/-** पूर्ण होण्याचा कालावधी :-12 महिने, ऑफरची वैधता :- 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:-10/03/2025 15:00 वाजता. Bid सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरावा लागेल.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)

SUN 60

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
ई-निविदा सूचना
**निविदा सूचना क्रमांक** GEM/2025/B/5913795
**दिनांक १३.०२.२०२५**

DRM(M) कार्यालय, सेंट्रल रेल्वे, सोलापूर यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी नामांकित फर्म/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा आमंत्रित केल्या आहेत.:-**त्याच्या परिसरासह कामाचे नाव:** प्लॅटफॉर्म रिटर्न आरबीपीसी ट्रेनची यांत्रिकी साफसफाई आणि पाणी भरण्याचे कंत्राट काम आणि ड्राय स्वीपिंग, टोलेट साफ करणे आणि ट्रेनच्या टर्म्स ट्रेनिंग टर्म्स सोलापूर विभाग तीन वर्षांच्या कालावधीसाठी GeM मार्फत मनुष्यबळ आधारावर. टेंडरिंगची सिस्टीम सिंगल पॅकेट सिस्टीम., कामाची अंदाजे किंमत रु.3627467.38/-, टेंडर फॉर्म ची किंमत, - Nil ज्या कार्यालयातून टेंडर फॉर्म खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता, DRM(M) चे कार्यालय, सेंट्रल रेल्वे, सोलापूर, जमा करावयाची बयाणा रक्कम - रु. 72,550/-, काम पूर्ण होण्याचा कालावधी काम सुरू झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षे. निविदा सादर करण्याची तारीख व वेळ- 07.03.2025 रोजी 09.00 वाजता आणि निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ- 07.03.2025 रोजी 09.30 वाजता. वेबसाईट तपशील आणि सूचना फलक स्थान जेथे निविदांचे संपूर्ण तपशील पाहता येईल.- www.gem.gov.in

Sr. DME/सोलापूर

SUN 61

तिकिटांसाठी UTS n डाउनलोड करा

**जाहीर प्रसिध्दीकरण**

आर.टी.एस. अपील नं.७९/२०२३

**सोलापूर येथील मा. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र.२ यांचे कोर्टात**

(१) **सलिम खासिम कोतवाल**
उ.व.६०, धंदा सेवानिवृत्त,
(२) **जाविद खासिम कोतवाल** — अपिलकार
उ.व.५०, धंदा शेती, दोघे राहणार कोरबु प्लॉट,
अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**विरुध्द**

रजिया अब्दुल रफिक शेख
रा.एखतपुर रोड, मस्के कॉलनी, — उत्तरवादी
सांगोला, ता. सांगोला

ज्या अर्थी यातील अपिलकार यांनी मौजे अक्कलकोट, ता. अक्कलकोट येथील गट नं.१४९, २६३/१, २६३/२ या शेतजमिनीबाबत मंडल अधिकारी अक्कलकोट यांनी प्रमाणित केलेल्या फेरफार क्र.२५०४७ ही फेरफार नोंद आव्हानित केलेली आहे. सदरची नोंद ही खासिम मौला कोतवाल यांनी उत्तरवादी रजिया शेख हिस लिहून दिलेल्या बक्षीसपत्रान्वये घेण्यात आलेली नोंद रद्द करण्याबाबतचे अपील या न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी सदर उत्तरवादी रजिया अब्दुल रफिक शेख हिस इकडील न्यायालयाने अपिलाप्रकरणी नोटीस पाठविली. परंतु सदर उत्तरवादी नमूद पत्त्यावर आढळून न आल्याने सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण. सदर अपिलात अपिलकार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे फेरफार क्र.२५०४७ रद्द करणेबाबत आपली काही तक्रार/ हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा सदर अर्जाची पुढील नेमलेली तारीख १२/०३/२०२५ अधिकृत प्रतिनिधीमार्फत या मे. कोर्टात हजर राहून तक्रार/ हरकत नोंदवावी. वेळेत कोणाची कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास मे. कोर्ट अपिलकारांचे अपील ऐकून त्यावर योग्य तो न्यायनिर्णय देईल. त्यानंतर आपली कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही.

ही जाहीर नोटीस आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्कयानिशी आज वार दि. १३ माहे ०२ इसवी सन २०२५ रोजी प्रसिध्द केली.

लिपीक — शिक्का

सही/-
हुकूमावरुन
मा. उपविभागीय अधिकारी, सोलापूर
उपविभाग क्र.२. सोलापूर

**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**

IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) । सीआयएन: L65110TN2014PLC097792 नोंदणीकृत कार्यालय: केआरएम टॉवर्स, ८ वा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई-६०००३१. दूरध्वनी: +९१ ४४ ४५६४ ४००० फॅक्स: +९१ ४४ ४५६४ ४०२२

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अंमलबजावणीच्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सहकर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited (पूर्वीचे Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत एकत्रित केलेले आणि सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदारांची आणि सहकर्जदारांची कर्जे त्यांच्या मानधनाच्या मालमत्तेद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी ठरले आणि ते अनियमित झाले असल्याने, त्यांच्या कर्जाचे RBI मार्गदर्शक तत्त्वांनुसार NP म्हणून वर्गीकरण करण्यात आले. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत विलीन झालेली आणि सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या जारी केलेल्या संबंधित नोटिसांनुसार नमूद केली आहे आणि त्या रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि त्यांच्या कराराच्या तारखेनुसार संबंधित दरानुसार आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांचे नाव | कलम १३ (२) सूचना तारीख) | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३७९४४६०७ | मालमत्तेवर कर्ज | १.बालाजी शहाजी पाटील<br>२.शहाजी विठ्ठल पाटील | ११/११/२०२४ | रु.१०,७८,२७५.७३/- |

मालमत्तेचा पत्ता: मालमत्ता क्रमांक ३२७ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्र ४५७४.८३ चौ. Ft., दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = १२८०.०० चौ. फूट. एकूण बिल्ट अप एरिया = १२८०.०० चौ. फूट., गावात स्थित: म्हैसगाव, ता. माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२५० आणि सीमा: पूर्व: कुलकर्णी फार्म, पश्चिम: एम. एन. पाटील, उत्तर: रस्ता, दक्षिण: टॉवर

तुम्हाला याद्वारे IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत विलीन झालेली आणि सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) वरील तपशिलात वरील तपशिलानुसार त्यांच्या संबंधित तारखा आणि इतर खर्च, शुल्क, त्यांच्या संबंधित तारखांमध्ये त्यांच्या संबंधित तारखा आणि इतर खर्च, शुल्क, त्यांच्या ०० दिवसांच्या आत सार्वजनिक व्याजदरासह देण्याचे आवाहन केले जात आहे. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत विलीन झालेली आणि सध्या IDFC बँक लिमिटेड या नावाने ओळखली जाणारी फर्स्ट बँक लिमिटेड) देय रक्कम वसूल करण्यासाठी SRFESI कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, येथे उल्लेख केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास प्रतिबंधित केले जाईल. पुढे तुम्हाला उक्त अधिनियमाच्या कलम १३ (१३) अंतर्गत सांगितलेल्या सुरक्षित मालमत्तेचे विक्री/लीज किंवा अन्यथा हस्तांतरण करण्यास मनाई आहे.

दिनांक: १४/०२/२०२५
स्थळ: सोलापूर, महाराष्ट्र.

नियुक्त/-
अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

**मे. सहाय्यक निषधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापुर, सोलापूर यांचे समोर मार्कंडेय मंदीर, पहिला मजला लक्ष्मी मार्केट, सोलापुर**

जा.क्र./१८१/२०२५ — दि.१४/०२/२०२५
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर — अर्जदार
विरुध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) — जाब देणार

| अ. क्र. | दावा क | दावा रक्कम | प्रतिवादी नवरं | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५५/२०२४ | १,१८,०३४/- | २<br>३ | २. श्री. जोजन संतोष तिप्पण्णा रा. आदर्श कन्नड शाळेजवळ २४४/३ मजरेवाडी निलम नगर सोलापुर<br>३. श्री. चव्हाण विश्वनाथ राजू रा.२५ लक्ष्मी अंबिका नगर नक्का वस्ती एम.आय.डी.सी सोलापूर |
| २ | ५७/२०२४ | ८४,५४२/- | ३ | ३. श्री. कोंडा विनायक पांडूरंग रा. १८/११२ माधव नगर एम.आय.डी.सी रोड कुरहिनशेटटी शाळे समोर सोलापूर जि. सोलापूर |
| ३ | ५८/२०२४ | १,५०,९२२/- | १<br>२ | १. श्री. कुलकर्णी मंजुळा कुशुमाकर रा.३१२ कमला नगर विजापूर रोड नियर हनुमान मंदिर सोलापूर जि. सोलापूर<br>२. श्री. शिंगवी सुनिलकुमार कस्तुरचंद रा. मारूती मंदिर माशाळ वस्ती विजापूर रोड सोलापूर जि. सोलापूर |
| ४ | ६०/२०२४ | १,२७,७६५/- | ३ | ३. श्री. कुंभार गीता भिमराव रा. कल्लप्पा म्हेत्रे वस्ती कुमठा नाका सोलापूर जि. सोलापूर |
| ५ | ६२/२०२४ | १,०७,५०८/- | ३ | ३. श्री. शेख सोहेल बशीर रा.मु.पो. भंडारकवठे ता.द. सोलापूर जि. सोलापुर |
| ६ | ६३/२०२४ | २,९८,१८३/- | २ | २. श्री. वाघमोडे सतिश अमृत रा.मु.पो. औराद ता.द. सोलापूर जि. सोलापुर |
| ७ | ६५/२०२४ | ९४७७५/- | २ | २. श्री. सुर्यन सुभम शशिकांत रा. हंचाटे विद्यालय शेजारी १९ नितीन नगर सोलापूर जि. सोलापूर ४१३००५ |
| ८ | ६७/२०२४ | १,३०,६८२/- | १<br>२<br>३ | १. श्री. नदाफ नजीर तुराब रा. निवर राजराजेश्वरी शाळा २१ निवारा नगर एम.आय.डी. सी रोड सोलापूर<br>२. श्री. नागेळी माईनाथ यल्लादास रा.६/१ विजयलक्ष्मी नगर नेताजी शाळे जवळ मोलापूर जि. सोलापूर<br>३. श्री. खानापुरे अमसिध्द काशप्पा रा. कुंभारी ता.द. मोलापूर जि. सोलापूर |
| ९ | ६८/२०२४ | ५१,२८४/- | १ | १. श्री. सातपुते जोतिराम शिवाजी रा. आडम प्लॉट १२८ इंगळे वस्ती मजरेवाडी जि. सोलापूर |
| १० | ६९/२०२४ | ६१,१२३/- | १<br>३ | १. श्री. सुतार यशवंत कलाप्पा व सुतार शोभा यशवंत रा.मु.पो.मंद्रूप कुंभार गल्ली ता.द. सोलापूर जि. सोलापुर<br>३. श्री. रजपूत सरदारसिंग नारायणसिंग रा.मु.पो. मंद्रूप माळी गल्ली ता.द. सोलापूर जि. सोलापुर |
| ११ | ७१/२०२४ | १,६७,८३५/- | १<br>२<br>३ | १. श्री.जवळकर छाया आदित्य रा. नेताजी सुभाष हौसिंग सोसायटी भारती विद्यापीठ सोलापुर जि. सोलापूर<br>२. श्री. रूपनुरे विठ्ठल अशोक रा.मु-औज (आ) पो. शिंगडगाव ता. द. सोलापूर, जि. सोलापूर<br>३. श्री. पाटील राकेश मल्लिकार्जुन रा. ८३ सुशिल नगर विजापूर रोड सोलापूर जि. सोलापूर |
| १२ | ७२/२०२४ | ८४,२६२/- | २<br>३ | २. श्री. राठोड प्रविण धर्मा रा.मु. पो. मंद्रूप सेवालाल नगर ता.द. सोलापूर जि. सोलापुर<br>३. श्री. नारायणे विलास मदार रा.मु. पो. मंद्रूप देशमुख नगर ता.द. सोलापूर जि. सोलापुर |

यात वादी पतसंस्था यांनी दाल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अधवा वकिलामार्फत दिनांक २१/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारणीस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. १४/०२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्म दिले आहे.

स्थळ - सोलापुर
दि. १४/०२/२०२५

शिक्का

सही/-
(अ. गो. झालटे)
सहाय्यकनिबंधक
सहकारी संस्था, दक्षिण सोलापुर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भारतीय कुस्तीपटू दुसऱ्या रँकिंग स्पर्धेला मुकणार

**नवी दिल्ली** : अल्बेनियामध्ये होणाऱ्या वर्षाच्या दुसऱ्या रँकिंग कुस्ती मालिकेत भारतीय कुस्तीपटू सहभागी होऊ शकणार नाहीत. भारतीय कुस्तीगीर महासंघ (डब्ल्यूएफआय) वेळेवर आवश्यक शिफारसी सादर करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप क्रीडा मंत्रालयाने केला आहे. क्रीडा मंत्रालय आणि निलंबित कुस्ती महासंघ यांच्यातील वादामुळे कुस्तीपटू आधीच क्रोएशियाच्या झाग्रेबमध्ये झालेल्या पहिल्या रँकिंग कुस्ती मालिकेला मुकले होते. डिसेंबर २०२३ मध्ये मंत्रालयाने निलंबित केलेल्या परंतु आंतरराष्ट्रीय संस्थेने मान्यता दिलेल्या भारतीय कुस्ती महासंघाने भारतीय क्रीडा प्राधिकरणला शेवटच्या क्षणी प्रस्ताव पाठवला होता. डब्ल्यूएफआयने शेवटच्या क्षणी प्रस्ताव पाठवला आणि प्रस्तावित नावे एसएआयकडे पाठवण्यास विलंब झाला. त्यामुळे, त्यावर प्रक्रिया करून मंजुरी देता येत नाही, असे या घडामोडींशी संबंधित एका सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले.आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंना मंजुरी देण्याबाबत आम्हाला नेहमीच सांगितले जाते, परंतु त्यासाठी एक निश्चित प्रक्रिया आहे जी आम्हाला पाळावी लागते. डब्ल्यूएफआयने कोणत्याही चाचण्या घेतल्या नसल्याने संघ कोणत्या आधारावर तयार करण्यात आला हे देखील स्पष्ट नव्हते, असे सूत्रांनी सांगितले. दुसरी रँकिंग मालिका २६ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान अल्बेनियातील तिराना येथे होणार आहे.

### राडुकानू दुबई टेनिसमध्ये पदार्पणासाठी सज्ज

**दुबई** : आगामी १६ ते २३ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या डब्ल्यटीए १००० दुबई टेनिस स्पर्धेसाठी ब्रिटनच्या एम्मा राडूकानूला वाईल्डकार्ड मिळाला असून माजी यूएस ओपन चविजेती राडुकानू आता या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी हाम्यास सज्ज झाली आहे. सध्या जगात ६० व्या क्रमांकावर असलेल्या राडुकानूने अलीकडेच कतार ओपन आणि अबू धाबी ओपन या दोन्हीमध्ये भाग घेतला होता, परंतु दोन्ही स्पर्धेत तिला पहिल्या फेरीतच पराभव पत्करावा लागला होता. जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनच्या शेवटच्या ३२ मध्ये ती पोहोचली होती व तिथे तिला पाच वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती इगा स्वियातेकने सरळ सेटमध्ये हरवले होते. दुबईमध्ये टूर स्पर्धेत एम्मा राडुकानुला पहिल्यांदाच सहभागी होताना पाहणे आश्चर्यकारक आहे. एम्माकडे प्रचंड प्रतिभा आहे आणि आम्ही या वर्षीच्या स्पधेत तिला कोर्टवर पाहण्यास उत्सुक आहोत, असे स्पर्धेचे संचालक सलाह तहलक म्हणाले. यावर्षी स्पर्धेचा २५ वा वर्धापन दिन साजरा होत असताना, जगातील अव्वल १० महिला खेळाडू या स्पर्धेत केंद्रस्थानी असतील. या स्पर्धेत जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाची आर्यना सबालेन्का सहभागी झाली असून ती आपल्या कारकिर्दीत नवव्यांदा दुबईला परतली आहे. या वर्षी अमेरिकन मॅडिसन कीजचे पुनरागमन देखील होईल. कोको गॉफ चौथ्यांदा या स्पर्धेत भाग घेणार आहे. अमेरिकेच्याच जेसिका पेगुला आणि एम्मा नवारो सुद्धा भाग घेतील. गत वर्षीची विजेती जास्मिन पाओलिनी आपल्या जेतेपदाच्या बचावाचा प्रयत्न करणार आहे.

### कोहलीचा अनुभव नेतृत्वाच्या भूमिकेत मदत करेल : रजत

**बंगळुरू** : संघ नेतृत्वाचे बारकावे जाणून घेण्यासाठी मला विराट कोहलीच्या अनुभवाचा फायदा होईल व सर्व परिस्थितीत खेळाडूंसोबत उभे राहण्याला महत्त्व दिले जाईल, असे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा नवनियुक्त कर्णधार रजत पाटीदार म्हणाला. पाटीदार गत वर्षीच्या मेगा लिलावापूर्वी करारमुक्त झालेल्या फाफ डु प्लेसिसकडून आरसीबीचे कर्णधारपद स्वीकारले आहे. मी तेवढा व्यक्त नाही, परंतु मला सामन्यांच्या परिस्थितीची जाणीव आहे. म्हणून, माझ्या खेळाडूंना पाठिंबा देणे व सर्व परिस्थितीत त्यांच्यासोबत उभे राहणे तसेच त्यांना आराम व आत्मविश्वास वाटेल असे वातावरण देणे महत्वाचे आहे, असे रजत म्हणाला. आरसीबीच्या ड्रेसिंग रूममधील अनुभवी नावे आयपीएल कर्णधारपदाच्या आव्हानात्मक कामातून मार्ग काढू शकतात, असेही तो म्हणाला. आमच्याकडे नेत्यांचा एक गट आहे. त्यांचा अनुभव आणि कल्पना माझ्या नवीन नेतृत्व भूमिकेत निश्चितच मदत करतील. एक व्यक्ती म्हणूनही वाढतील.

# महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्य विजेतेपद

## उत्तराखंडात महाराष्ट्राचा जयजयकार

## ३८वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते विजेतेपदाचा चषक स्वीकारताना महाराष्ट्राचा संघ

◆ **डेहराडून, १४ फेब्रुवारी**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे व्दिशतक झळकविणाऱ्या महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्य विजेतेपदाच्या करंडकाने आज गौरविण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते महाराष्ट्राला राज्य विजेतेपदाचा करंडक देण्यात आला.

इंदिरा गांधी स्टेडियममध्ये ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा शानदार समारोप सोहळा रंगला. या दिमाखदार समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे (एमओए) महासचिव नामदेव शिरगावकर यांनी सर्वोत्तम राज्य विजेतेपदाच्या करंडक स्वीकारला. यावेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मंडविया, भारतीय ऑलिम्पिक महासंघाच्या अध्यक्ष पी.टी. उषा, उत्तराखंडच्या क्रीडामंत्री रेखा आर्या, महाराष्ट्र संघाचे पथकप्रमुख संजय शेटे, उदय डोंगरे, विठ्ठल शिरगांवकर उपस्थित होते.

उत्तराखंडातील स्पर्धेत ५४ सुवर्णांसह ७१ रौप्य, ७६ कास्य अशी एकूण २०१ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने दुसरे स्थान मिळविले. स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा राज्यातील संघांमध्ये महाराष्ट्र अव्वल ठरला. अहमदाबाद, गोवा पाठोपाठ उत्तराखंड स्पर्धेत महाराष्ट्र देशातील संघांमध्ये अव्वल येण्याची ऐतिहासिक हॅट्ट्रिक साजरी केली आहे.

तब्बल २२७ क्रीडाप्रकारात महाराष्ट्राने पदके जिंकण्याचा कामगिरी केली आहे. जिम्नॅस्टिक्स सर्वाधिक १२ सुवर्णांसह २४ पदके महाराष्ट्राने जिंकली आहेत. महाराष्ट्राने कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडामंत्री दत्तामामा भरणे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सर्वाधिक २०१ पदकांची कमाई करणारा महाराष्ट्र देशातील एकमेव संघ ठरला आहे, सर्वोत्तम संघाचा मानही आपण पटकविला आहे असे सांगून नामदेव शिरगावकर म्हणाले की , महाराष्ट्राच्या पदकविजेत्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सलग तिसऱ्यांदा राज्यांच्या संघात अव्वल स्थान संपादन केले आहे.

देशात पुन्हा जय महाराष्ट्राचा जयजयकार होत असल्याचा आनंद मोठा आहे (वृत्तसंस्था)

### शार्दूल हृषीकेशला पदक



शार्दूल हृषीकेश

**हल्दवानी** : उत्तराखंडातील ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या १७ व्या दिवशी रात्री ऊशिरापर्यंत मल्लखांब स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला नव्हता . स्पर्धा समितीने शुक्रवारी सकाळी पदकाचा अंतिम तक्ता जाहीर केला. यामध्ये मल्लखांबमधील ३ कांस्यपदकांमुळे महाराष्ट्राने पदकाचे व्दिशतक पूर्ण केले. शार्दूल हृषीकेश, रिषभ घुबडे व दर्शन मिनियारने महाराष्ट्रासाठी शेवटची पदके जिंकली. त्यापूर्वी अखेरचे सुवर्णपदकही रूपाली गंगावणेने पटकावले. मल्लखांबात शार्दूल हृषीकेशने पदकांचा चौकार झळकविला. आदित्य पाटील, सोहेल शेख मृगांक पाठारे यांनही पदकांची कमाई केली आहे. ४ सुवर्ण, ४ रौप्य व ५ कांस्य पदकांची लयलूट मल्लखांबात महाराष्ट्राने करून विजेतेपदही प्राप्त केले.

तब्बल २७ क्रीडाप्रकारात महाराष्ट्राने पदके जिंकण्याचा कामगिरी केली आहे. जिम्नॅस्टिक्स सर्वाधिक १२ सुवर्णांसह २४ पदके महाराष्ट्राने जिंकली आहेत. महाराष्ट्राने कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दन राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडामंत्री दत्तामामा भरणे, महासचिव नामदेव शिरगावकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# एफआयएच प्रो-लीगसाठी भारतीय पुरुष हॉकी संघ सज्ज

◆ **भुवनेश्वर, १४ फेब्रुवारी**

सध्या जगात पाचव्या क्रमांकावर असलेला भारतीय पुरुष हॉकी संघ शनिवारी येथील प्रतिष्ठित कलिंगा हॉकी स्टेडियमवर आपल्या बहुप्रतिक्षित एफआयएच प्रो-लीग २०२४-२५ मोहिमेची सुरुवात करण्यासाठी सज्ज झाला आहे.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार विजेता हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ १५ व १६ फेब्रुवारी रोजी जागतिक क्रमवारीत ७ व्या स्थानावर असलेल्या स्पेनविरुद्ध दोन रोमांचक सामन्यांसह आपल्या मोहिमेची सुरुवात करेल, त्यानंतर १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या जर्मनीविरुद्ध लढणार आहे.

भारताची मोहीम घरच्या मैदानावर सुरू होईल, त्यामुळे संघाला त्यांची अलीकडील गती दाखविण्याची उत्तम संधी मिळेल. जर्मनीविरुद्धच्या सामन्यांनंतर, भारत २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी आयर्लण्डविरुद्ध खेळेल आणि त्यानंतर २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडविरुद्ध सामना करेल.

२०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये शानदार पदक जिंकून, हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली आहे. २०२४ मध्ये जर्मनीविरुद्धच्या घरच्या मैदानावर झालेल्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत संघ शेवटचा खेळला होता, जिथे भारताने



हरमनप्रीत सिंग

पहिल्या सामन्यात २-० असा पराभव पत्करून दुसऱ्या सामन्यात पाहुण्या संघाचा ५-३ असा पराभव केला. जर्मनीने शूटआउटद्वारे मालिका जिंकली असली तरी, स्पर्धात्मक कामगिरीमुळे भारताच्या प्रो-लीगच्या तयारीत आत्मविश्वास वाढला.

यापूर्वी, सप्टेंबरमध्ये झालेल्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये भारताने आपले जेतेपद यशस्वीरित्या राखून आपले सर्व सामने जिंकले आणि आशियातील सर्वात मजबूत संघांपैकी एक म्हणून आपले स्थान मजबूत केले.

हरमनप्रीत सिंगसोबत उपकर्णधार हार्दिक सिंग सहभागी होईल. ते अनुभवी आणि तरुण प्रतिभेने भरलेल्या संतुलित संघाचे नेतृत्व करतील. मनप्रीत सिंग, मनदीप सिंग, ललित कुमार उपाध्याय, सुमित, संजय, जुगराज सिंग आणि विवेक सागर प्रसाद असे ज्येष्ठ खेळाडू संघाचा कणा असतील तर अराईजित सिंग हुंडल, अंगद बीर सिंग आणि अर्शदीप सिंगसारखे उदयोन्मुख स्टार खेळाडू संघात नवीन ऊर्जा आणि कौशल्य आणतील. (वृत्तसंस्था)

# दिल्लीच्या मीनू पाठकची चमकदार कामगिरी

◆ **नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी**

दिल्लीच्या मीनू पाठकने राष्ट्रीय निवड चाचण्या १ आणि २ (गट अ) रायफल/पिस्तूलच नेमबाजी स्पर्धेया शेवटच्या दिवशी सर्वात मोठे आश्चर्य घडवून आणले. शुक्रवारी तिने अंतिम फेरीत २४३.१ गुणांसह महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल टी सामन्यात आघाडी घेतली.

डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या दुसऱ्या दिवशी सेनादलाचा वरुण तोमरने दुसरा विजेता म्हणून कामगिरी केली. त्याने पुरुषांच्या एअर पिस्तूल टी-२ अंतिम फेरीत २३९.८ गुणांसह पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या सरबजोत सिंगवर १.९ गुणांनी विजय मिळवला. हरयाणाचा सुरुची फोगट आणि सौरभ चौधरीने पुन्हा एकदा पदक जिंकले. या प्रयत्नांमुळे सौरभ भारतीय क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. सुरभी रावने पात्रता फेरीत ५८५ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. सुरुचीने दुसरे स्थान मिळवले. (वृत्तसंस्था)

# श्रीलंकेने जिंकली मालिका

## ऑस्ट्रेलियावर १७४ धावांनी विजय





शतकवीर कुसल मेंडिस सामनावीर

◆ **कोलंबो, १४ फेब्रुवारी**

श्रीलंकेने शुक्रवारी येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला १७४ धावांनी पराभूत करून दोन सामन्यांची वन-डे मालिका २-० अशी जिंकली. हा विजय श्रीलंकेचा ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सर्वात मोठा एकदिवसीय विजय आहे. आगामी आयसीसी चॅम्पियन्स चषकासाठी सज्ज होत असतानाचा एक महत्त्वाचा निकाल आहे.

विजयासाठी २८२ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ केवळ १०७ धावांत गारद झाला. ही वन-डे क्रिकेटच्या इतिहासातील ऑस्ट्रेलियाची आठवी सर्वात कमी धावसंख्या आहे. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीतील कमकुवतपणा उघड झाला. स्टीव्ह स्मिथच्या संघासाठी हे एक आश्चर्यकारक पतन आहे.

आता काही दिवसांवरच पाकिस्तान आणि यूएईमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स चषकासाठी ऑस्ट्रेलियाला लवकर संघटित व्हावे लागेल व कंबर कसावी लागणार आहे.

श्रीलंकेचा विजय कुसल मेंडिसच्या प्रतिभेवर आधारित होता. त्याने डावाला बळकटी देण्यासाठी उत्कृष्ट शतक झळकावले. ११५ चेंडूत ११ चौकारांसह १०१ धावांची शतकी खेळी केली. सलामीवीर निशान मदुष्का ने ७० चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारसह ५१ धावांचे, तर कर्णधार चरिथ असलंकाने ६६ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ७८ धावांचे योगदान दिले. जानिथ लियानागे (२१ चेंडूत नाबाद ३२) याने चांगली साथ दिली. श्रीलंकेने ५० षटकांत ४ बाद २८१ धावांची नोंद केली. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांना श्रीलंकेच्या फलंदाजांना रोखण्यासाठी संघर्ष करावा लागला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा वरचा क्रम सुरुवातीपासूनच डळमळीत झाला. जेक फ्रेझर-मॅकगर्क (९) आणि मॅट शॉर्ट (२) पुन्हा एकदा प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले, तर ट्रॅव्हिस हेडच्या १८ धावांच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ३३/३ अशी झाली. कॅरी आणि कर्णधार स्मिथचने ४६ धावांची भागीदारी केली पण त्यानंतर ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली. ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ २४.२ षटकांत १०७ धावांत बाद झाला.

श्रीलंकेकडून दुनिथ वेलालगेने ४ बळी, असिथा फर्नांडो व वनिंदू हसरंगाने प्रत्येकी ३ बळी टिपलेत. (वृत्तसंस्था)

# चॅम्पियन्स चषक विजेत्या संघाला मिळणार २.२४ दशलक्ष डॉलर्स बक्षीस

◆ **दुबई, १४ फेब्रुवारी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आठ संघांच्या चॅम्पियन्स चषक स्पर्धेसाठी बक्षीसाच्या रकमेत ५३ टक्के वाढ जाहीर केली आहे. या घोषणेनुसार आगामी चॅम्पियन्स चषक जिंकणाऱ्या संघाला २.२४ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची रोख रक्कम मिळणार आहे.

विजेत्या संघाला मिळणारी रोख रक्कम भारतीय चलनात २० कोटी रुपयांच्या जवळपास असेल. उपविजेत्या संघाला अर्धी रक्कम म्हणजे १.१२ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (९.७२ कोटी रुपये) मिळेल, तर उपांत्य फेरीतील प्रत्येक पराभूत संघाला ५६०,००० अमेरिकन डॉलर्स (४.८६ कोटी रुपये) मिळतील. बक्षिसांची एकूण रक्कम ६.९ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (अंदाजे ६० कोटी रुपये) झाली आहे.

या मोठ्या बक्षिसाची रक्कम आयसीसीच्या या खेळात गुंतवणूक करण्याच्या आणि आमच्या स्पर्धांची जागतिक प्रतिष्ठा राखण्याच्या सततच्या वचनबद्धतेचे अधोरेखित करते, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी पाकिस्तान व युएईमध्ये होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

प्रत्येक गट फेरीतील विजय विजेत्या संघासाठी ३४,००० अमेरिकन डॉलर्स (३० लाख रुपये) पेक्षा जास्त असेल. पाचव्या किंवा सहाव्या स्थानावर असलेल्या संघांना प्रत्येकी ३५०,००० अमेरिकन डॉलर्स (३ कोटी रुपये) मिळतील, तर





सातव्या आणि आठव्या स्थानावर असलेल्या संघांना १४०,००० अमेरिकन डॉलर्स (१.२ कोटी) मिळतील. याव्यतिरिक्त, या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सर्व आठ संघांना १२५,००० अमेरिकन डॉलर्स (१.०८ कोटी) हमी रक्कम मिळेल.

१९९६ नंतर पाकिस्तान पहिल्यांदाच आयसीसी स्पर्धेचे आयोजन करणार आहे. तथापि, पाकिस्तानच्या प्रवासाशी संबंधित सुरक्षेच्या कारणास्तव भारत त्यांचे सर्व सामने दुबईमध्ये खेळेल. रोहित शर्माच्या संघाची मोहीम २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध सुरू होईल.

पाकिस्तान लेगमध्ये कराची, लाहोर आणि रावळपिंडी येथे सामने होतील.

२०२५ च्या आवृत्तीत आठ संघ चार संघांच्या दोन गटात विभागले गेले आहेत, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

आयसीसी पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ हा क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे, जो एकदिवसीय प्रतिभेच्या शिखरावर प्रकाश टाकणारी स्पर्धा पुनरुज्जीवित करतो, जिथे प्रत्येक सामना महत्त्वाचा असतो, असे आयसीसी अध्यक्षांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले.

आर्थिक प्रोत्साहनाव्यतिरिक्त, ही स्पर्धा तीव्र स्पर्धा पेटवते, जगभरातील चाहत्यांना आकर्षित करते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी क्रिकेटची वाढ आणि दीर्घकालीन शाश्वतता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, असे शाह पुढे म्हणाले.

पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २००९ ते २०१७ पर्यंत दर चार वर्षांनी आयोजित करण्यात आली होती, परंतु कोविडमुळे व्यत्यय आला आणि त्याच्या प्रासंगिकतेवरील चर्चांमुळे ती पुढे ढकलण्यात आली. ही स्पर्धा प्रथम १९९८ मध्ये द्वैवार्षिक स्पर्धा म्हणून सादर करण्यात आली. महिला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२७ मध्ये टी-२० स्वरूपात पदार्पण करेल. (वृत्तसंस्था)

### मुंबई, दिल्ली यांच्यात डब्ल्यूपीएल सामना आज

◆ **वडोदरा, १४ फेब्रुवारी**

महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) २०२५ च्या दुसऱ्या सामन्यात शनिवारी कोटाम्बी स्टेडियमवर पहिल्या विजेत्या मुंबई इंडियन्स आणि दोन वेळा अंतिम फेरी गाठणाऱ्या दिल्ली कॅपिटल्स संघादरम्यान रोमांचक सामना होणार आहे.

२०२३ च्या विजेत्या मुंबई इंडियन्सने परदेशी आणि भारतीय स्टार खेळाडूंच्या मुख्य गटावर अवलंबून राहून संघाला संधी दिली आहे. गत वर्षी आठ सामन्यांपैकी पाच विजयांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर राहिलेल्या हरमनप्रीत कौरच्या संघाला या हंगामात यश मिळवून देण्याचा प्रयत्न असेल. दुखापतग्रस्त वेगवान गोलंदाज पूजा वस्त्रकारच्या जागी पारुनिका सिसोदियाला संधी देण्यात आली आहे. इंग्लंडची इस्सी वोंगला फॉर्ममध्ये अडचणी येत असल्यामुळे तिला वगळण्यात आले व तिच्या जागी दक्षिण आफ्रिकेची वेगवान गोलंदाज शबनीम इस्माइलचा समावेश करण्यात आला आहे. ९ वर्षांखालील महिलांच्या विश्वचषकातील उत्कृष्ट गोलंदाजी करणारी जी. कमलिनी, खेळणार आहे. मुंबई इंडियन्सकडून आंतरराष्ट्रीय स्टार खेळाडू- नॅट सायव्हर-ब्रंट (इंग्लंड), हेली मॅथ्यूज (वेस्ट इंडीज), अमेलिया केर (न्यूझीलंड) आणि दक्षिण आफ्रिकेची त्रिकूट नादिन डी, शबनीम इस्माइल आणि ट्रायॉन या खेळणार आहे. (वृत्तसंस्था)

# कामगिरी संघावर अवलंबून असते : कपिल देव

◆ **कोलकाता, १४ फेब्रुवारी**

कामगिरी ही संघावर अवलंबून असते, एका खेळाडूवर नाही. वेगवान गोलदाज जसप्रीत बुमराह प्रभावी खेळाडू आहे, पण तो दुखापतग्रस्त आहे, त्याच्या अनुपस्थितीत भारतीय संघाने पुढे जाणे आवश्यक आहे . एका खेळाडूवर संघाचे यश अवलंबून राह ता कामा नये, असे मत भारताचे दिग्गज क्रिकेटपटू कपिल देव ने व्यकत केले.

सिडनी येथे झालेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकतील शेवटच्या सामन्यात भारताचे नेतृत्व करताना बुमराहच्या पाठीला दुखापत झाली, त्यामुळे बुमराहला चॅम्पियन्स चषक स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले आहे. तो मालिकेतील भारताचा सर्वोत्तम गोलंदाज होता. त्याची अनुपस्थिती भारतासाठी एक मोठा धक्का आहे, विशेषतः २०२४ च्या टी-२० विश्वचषकात त्याने विजयी कामगिरी केली होती.

कामगिरी एका खेळाडूवर अवलंबून नसते, तर संघावर अवलंबून असते. परंतु हो, जर बुमराह तंदुरुस्त नसेल तर ती चांगली बातमी नाही, पण त्याच्या अनुपस्थितीत संघाने पुढे जायला हवे, असे कपिल देवने कोलकाता येथे एका कार्यक्रमात पत्रकारांना सांगितले.

भारतीय संघाला शुभेच्छा. सर्वोत्तम कामगिरी करण्यावर लक्ष केंद्रित करा आणि जिंकण्याचा किंवा हरण्याचा विचार करू नका, असे तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# भारताचा जपानकडून ०-३ ने पराभव

## आशिया मिश्र संघ अजिंक्यपद बॅडमिंटन

◆ **क्विंगदाओ, १४ फेब्रुवारी**

एच. एस. प्रणॉयने शौर्याने लढा दिला, परंतु शुक्रवारी येथे बॅडमिंटन आशिया मिश्र सांघिक अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दुय्यम दर्जाच्या जपान संघाकडून भारताला ०-३ ने पराभवाचा सामना करावा लागला. याबरोबरच या स्पर्धेत भारताच्या मोहिमेचा निराशाजनक शेवट झाला.

२०२३ मध्ये दुबईत कांस्यपदक विजेता भारतीय संघाला लय मिळवण्यात अडचण आली आणि मिश्र दुहेरीत पराभव झाल्यानंतर ते ०-१ ने मागे पडले.

जगात ३७ व्या क्रमांकावर असलेल्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टोने जागतिक क्रमवारीत १२ व्या क्रमांकावर असलेल्या हिरोकी मिदोरिकावा व नात्सु सैतो या जोडीकडून १३-२१, २१-१७, १३-२१असा पराभव पत्करावा लागला.

पी. व्ही. सिंधूच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे मैदानाबाहेर पडल्याने, २०२२ च्या जागतिक कनिष्ठ गट अजिंक्यपद स्पर्धेत विजय मिळवल्यानंतर जागतिक क्रमवारीत ८ व्या क्रमांकावर पोहोचलेल्या टोमोका मियाझाकीविरुद्ध भारताला कठीण आव्हान उभे करावे लागले.

जागतिक क्रमवारीत ३१ व्या स्थानावर असलेल्या मालविका बनसोडने सिंधूच्या जागी खेळताना धाडसी लढत दिली. विशेषतः दुसऱ्या गेममध्ये, परंतु तिच्या तरुण प्रतिस्पर्ध्याच्या नियंत्रण आणि सातत्याशी जुळवून घेण्यात तिला संघर्ष करावा लागला. सरतेशेवटी मालविकाला १२-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे भारतीय संघ ०-२ ने पिछाडीवर राहिला.

भारताचे स्पर्धेतील आव्हान जिवंत ठेवण्यासाठी प्रणॉयने सर्व काही कसोशीने प्रयत्न केले, परंतु दृढनिश्चयी प्रयत्नांनंतर, दीर्घ विश्रांतीनंतर परतलेल्या ३२ वर्षीय प्रणॉयला जागतिक क्रमवारीत १६ व्या स्थानावर असलेल्या केंटा निशिमोतोविरुद्ध दबाव टिकवून ठेवता आला नाही.

जपानचा स्टार खेळाडू निशिमोतोने १ तास १७ मिनिटांत २१-१४, १५-२१, २१-१२ असा विजय मिळवून विजयावर शिक्कामोर्तब केले.

या स्पर्धेत जपानने आपला अव्वल खेळाडूंचा संघ पाठवला नव्हता, अनेक दिग्गज खेळाडू अनुपस्थितत होते, तरीही पराभव पत्करावा लागल्यामुळे भ रतीय संघ निराश झाला.

२०१७ मध्ये जपान पहिल्या आवृत्तीचे विजेते होते आणि २०१९ मध्ये उपविजेते होते. (वृत्तसंस्था)

# अखेरच्या क्षणी अनेक संघांत बदल

## चॅम्पियन्स चषक क्रिकेट

◆ **दुबई, १४ फेब्रुवारी**

आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धा १९ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानमध्ये सुरू होणार आहे. आठ वर्षांच्या विश्रांतीनंतर परतणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पुरुषांच्या वन-डे संघांचे अव्वल आठ संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहेत.

१२ फेब्रुवारी रोजी संघ सादर करण्याची अंतिम तारीख संपल्यामुळे सर्व सहभागी देशांनी अधिकृतपणे आपल्या १५ सदस्यीय संघांची घोषणा केली आहे व या संघांमध्ये शेवटच्या क्षणी अनेक बदल करण्यात आले आहेत.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ या स्पर्धेत प्रवेश करत आहे. या संघात २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघातील आठ खेळाडूंचा समावेश आहे. तथापि, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे बाहेर झाल्यामुळे संघाला मोठा धकका बसला. त्याच्या जागी तरुण वेगवान गोलंदाज हर्षित राणाला बोलावण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, यशस्वी जयस्वालची जागा वरुण चक्रवर्तीने घेतली आहे.

यष्टिरक्षक-फलंदाज मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखाली गतविजेता पाकिस्तान २०१७ चे विजेतेपद राखण्याचे ध्येय ठेवेल. या संघात गत चॅम्पियन्स चषक विजेत्या संघातील प्रमुख खेळाडूंचा समावेश आहे, यात फखर जमान, बाबर आझम आणि फहीम अश्रफचा समावेश आहे. तथापि, दुखापतीमुळे त्यांना सलामीवीर फलंदाज सैम अयुबची उणीव भासेल.

एकदिवसीय विश्वविजेता ऑस्ट्रेलिया या स्पर्धेत लक्षणीयरीत्या कमकुवत होईल. कारण संघात अनेक वरिष्ठ खेळाडू अनुपस्थित असतील. कर्णधार पॅट कमिन्स, प्रमुख वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड आणि मिशेल स्टार्कने मूळ संघातून माघार घेतली आहे. त्यांच्या अनुपस्थितीत, स्टीव्ह स्मिथकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ अष्टपैलू मिशेल मार्शशिवायही खेळेल. या संघात नवीन चेहरे बेन द्वारशुइस, स्पेन्सर जॉन्सन आणि तनवीरचा समावेश असेल.

न्यूझीलंडच्या संघात वेगवान गोलंदाज बेन सीअर्स दुखापतीमुळे बाहेर झाला झाला त्याच्या जागी जेकब डफीची निवड करण्यात आली आहे. कर्णधार



म्हणून आपल्या पहिल्या आयसीसी स्पर्धेत न्यूझीलंड संघाचे नेतृत्व करणारा मिशेल सॅण्टनर युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या मिश्रणासह संघाचे मार्गदर्शन करेल. अनुभवी वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ट आणि टिम साऊदीच्या अनुपस्थितीमुळे मॅट हेनरी, लॉकी फर्ग्युसन व तरुण वेगवान गोलंदाज नॅथन स्मिथ यांच्यावर कामगिरी करण्यासाठी दबाव असेल.

दरम्यान, नजमुल हुसेन शांतोच्या नेतृत्वाखालील बांगलादेश २०१७ च्या उपांत्य फेरीतील कामगिरीला मागे टाकण्याचे लक्ष्य ठेवत आहे. वरिष्ठ खेळाडू महमुदुल्लाह व मुशफिकुर रहीम स्थिरता प्रदान करतात, तर तरुण खेळाडू नाहिद राणा आणि रिशाद हुसेनने आक्रमक कामगिरी केली आहे.

अफगाणिस्तानला शेवटच्या क्षणी बदल करावा लागला आहे, जखमी अल्लाह गझनफरऐवजी तरुण फिरकी गोलंदाज नांग्याल खरोतीने संघात स्थान मिळवले आहे. संघात अनुभवी स्टार खेळाडू रशीद खान आणि मोहम्मद नबी यांना कायम ठेवण्यात आले आहे, तर रहमानुल्लाह गुरबाज आणि इब्राहिम झद्रानने वरच्या फळीत ताकद वाढवली आहे.

इंग्लंडच्या संघात जो रूटचे पुनरागमन दिसून येत आहे, तर टॉम बँटनने जखमी जेकब बेथेलची जागा घेतली आहे. जोस बटलरच्या नेतृत्वाखाली, त्यांच्या गोलंदाजीचे नेतृत्व जोफ्रा आर्चर आणि मार्क वूड करतील, ज्यांना गस ॲटकिन्सन आणि जेमी ओव्हरटन पाठिंबा देतील.

दुखापतीमुळे ॲनरिच नॉर्टजेला वगळण्यात आल्यामुळे दक्षिण आफ्रिकेला मोठा धक्का बसला, त्यामुळे कॉर्बिन बॉशचा समावेश करण्यात आला. दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान आक्रमणाचे नेतृत्व कागिसो रबाडा करत आहेत, तर फलंदाजीची सूत्रे टेम्बा बावुमा, एडेन मार्कराम, रॅसी व्हॅन डर ड्यूसेन आणि हेनरिककडे आहे.

आठ संघांना दोन गटांमध्ये विभागले गेले आहे, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. गट अ मध्ये यजमान पाकिस्तान, भारत, न्यूझीलंड आणि बांगलादेश यांचा समावेश आहे, जे रोमांचक उपखंडीय स्पर्धांचे आश्वासन देतात. गट ब मध्ये ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांचा समावेश आहे. भारत २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध २०२५ च्या आयसीसी पुरुष चॅम्पियन्स चषक मोहिमेची सुरुवात करेल आणि त्यानंतर २३ फेब्रुवारी रोजी प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी सामना करेल. भारत २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध त्यांचा शेवटचा गट अ सामना खेळेल.

१९९६ नंतर पाकिस्तान पहिल्यांदाच आयसीसी स्पर्धेचे आयोजन करणार आहे. २०२५ च्या आवृत्तीत आठ संघ चार अशा दोन गटात विभागले गेले आहेत, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### सापटणे येथील आकाश ढवळे यांची सोलापूर ग्रामीण पाणीपुरवठामध्ये निवड

**टेंभुर्णी, दि. १४ फेब्रुवारी-**

सापटणे (टें) येथील आकाश मदन ढवळे एम.पी.एस.सीच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या सरळ सेवा भरती परीक्षेमधून ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापर येथे कनिष्ठ अभियंता पदी निवड झाली. या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. माढा तालुका हा अधिकाऱ्यांचा गाव म्हणून हळूहळू नावलौकिकास पुन्हा सापटणे टें येत आहे. आकाश ढवळे हे वेणेगाव चे पोलीस पाटील राजू पाटील यांचे भाचे आहेत. यावेळी आकाश ढवळे म्हणाले की कोणतेही काम कष्ट केल्याशिवाय मिळत नाही असा संदेश आजच्या आकाश तरुण पिढीला म्हणजे सुशिक्षित विद्यार्थ्यांना दिला आहे. आकाश हा अत्यंत गरीब कुटुंबातील मुलगा आहे. आई वडिल शेतकरी आहेत. तो दोन वर्षापासून पुणे येथे अभ्यास करत होता. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करून यश मिळवले. निवड झाल्याबद्दल संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी त्याचे अभिनंदन केले.





### सचिन वायकुळे यांचा सन्मान

**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

तृतीयपंथी समुदायासाठी करत असलेल्या कामाबद्दल सचिन वायकुळे यांचा माजी मंत्री तथा आ. ॲड. दिलीप सोपल यांनी कौतुक करत सत्कार केला. तृतीयपंथी अंतरराष्ट्रीय परिषदेतील निमंत्रण आणि या समुदायाला सामाजिक प्रतिष्ठा मिळावी यासाठी आजवर वायकुळे यांनी सकारात्मक काम केले आहे. या समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना रेशन कार्ड, आधार कार्ड तसेच मतदान ओळखपत्र मिळवून देण्यात वायकुळे यांनी कौतुकास्पद काम केले. या कामाबद्दल आ. ॲड. दिलीप सोपल यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी राज्य सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. विकास जाधव उपस्थित होते.



### पठाणवस्तीत शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन

**पिलीव, दि. १४ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पठाणवस्ती येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत १४ फेब्रुवारी रोजी कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत पठाणवस्ती येथे शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये निवडलेल्या पशुधन आधारित शेती पद्धती या बाबीच्या अनुषंगाने मुरघास तयार करणयाची तांत्रिक पद्धती, मुरघासाचे जनावरांसाठी महत्व, मुक्त गोठा पद्धतीचे फायदे, दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र याबाबत पशुधन विकास अधिकारी डॉक्टर रेडे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना सविस्तर मार्गदर्शन केले. पशुधन विकास अधिकारी डॉक्टर ठवरे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी पिलीवचे मंडळ कृषी अधिकारी सतिश जगताप, कृषी अधिकारी सतिश कोळेकर, कृषी सहहयाक नितीन शिंदे व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अश्विनी कॉलेजचे पदव्युत्तर पदवी परीक्षेत नेत्रदिपक यश

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

अश्विनी रूरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, कुंभारीने आपल्या यशाची परंपरा कायम राखत उन्हाळी २०२३ मध्ये झालेल्या नेत्ररोग विषयाच्या पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये डॉ. श्रुती सिध्देश्वर सोनवणे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. आतापर्यंत पदवी परीक्षेमध्ये ९ व पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये १ विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय पदके मिळविलेली आहेत. या यशाबद्दल विद्यार्थ्याचे संस्थेचे कार्यकारी विश्वस्त बिपीनभाई पटेल, विश्वस्त भारतीबेन पटेल, विश्वस्त मेहूल पटेल, अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, डॉ. सचिन मुंबरे, डॉ. गुणवंत नस्के, आरोग्य अधीक्षक डॉ. सिध्देश्वर करजखेडे, डॉ. मंजुनाथ पाटील, डॉ. श्रीकृष्ण इंगळे, डॉ. सोनाली रावळ, डॉ. माधुरी कल्याणी यांनी अभिनंदन केले.



## निधन वृत्त...

### श्रीमंत धरणे



**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी -**

धाराशीव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील बाबुळगाव येथील रहिवासी आणि प्रगतशील शेतकरी श्रीमंत मनाजी धरणे (वय ९१) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा उदया गुरुवारी सकाळी ११ वाजता राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पशच्यात ३ मुले, १ मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. राजवर्धन विद्यालय येथील लिपिक जगन्नाथ धरणे यांचे वडिल होत.

### दिगंबर मिरजकर



**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी -**

दाजी पेठ येथील रहिवासी व प्रसिद्ध यंत्रमाग कारखानदार दिगंबर लक्ष्मणराव मिरजकर (वय७०) यांचे बुधवार सकाळी दि. १२ फेब्रुवारी रोजी ११ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रात्री पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# भीमाकाठावरील दहशत कधी थांबणार?

## ● खुलेआम झळकणाऱ्या तलवारी, कोयते, गोळीबारांच्या आवाजाने नागरिक भयभीत

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. १४ फेब्रुवारी-**

भीमाकाठ म्हटले की डोळ्यासमोर चित्र उभे राहते ते वाळू माफिया, धाडसी दरोडा, गोळीबाराचा आवाज, निर्घृण खून, बेकायदेशीर शस्त्रे, खुलेआम झळकणारे कोयते. नेहमीच या भागात दहशत सुरु आहे. दहशत कधी थांबणार आणि जनता कधी चांगले दिवस बघणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

विजयपूर जिल्हा अनेक संत-महंतांचा जन्मभूमी, कर्मभूमी. एकेकाळी या परिसरात हलसंगी सिंपी लिंगण्णा, मधुरचन्नरु, गुरुलिंग कापसे असे ख्यात साहित्यिक, विचारवंतांनी राज्याचे लक्ष वेधले होते. त्यानंतर भीमा नदीकाठ परिसरात अर्थात भीमातीर म्हणजे मल्लिकार्जुन चडचण, धर्मराज, गंगाधर चडचाण, पुत्रप्पा सावकार, तर दुसरीकडे चंदप्पा हरिजन, भागप्पा हरिजन यांच्या गँगच्या कुकृत्यामुळे भीमातीरद हंत्तकरु अर्थात भीमा नदीकाठावरील गुन्हेगारी अशी ओळख निर्माण झाली.







महाराष्ट्र -कर्नाटक सीमा म्हणून वाहत असलेली भीमा नदी, या नदीतून बेकायदेशीर वाळू उपसा, बेकायदेशीर शस्त्रे खरेदी विक्री, विजयपूर, कलबुर्गी, रायचूर जिल्ह्यात एकप्रकारे दहशत निर्माण झाली होती. जमीन वादातून प्रारंभ झालेल्या भीमातीर परिसरातील हत्याकांडात पूर्ववैम नस्यातून अनेकांचे खून झाले आहेत. चंदप्पा हरिजन, धर्मराज व गंगाधर हरिजन या बंधूंचा खून झाल्यानंतर परिसर शांत झाला असे वाटत असतानाच मंगळवारी भागप्पा हरिजनची निर्घृण खुनानंतर पुन्हा एकदा खळबळ माजली आहे. चंदप्पा हरिजनचा गँगमधील बलिष्ठ, खतरनाक गुंड, शूटर म्हणजे भागप्पा हरिजन. विजयपूर जिल्हा न्यायालय परिसरात त्याच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. तीन गोळ्या शरीरात घुसूनही तो वाचला होता. मात्र मंगळवारी रात्री भागप्पा हरिजनचा शेवट झाला. एखाद्या गुंडाची हत्या झाल्यानंतर संपले आता सर्व अशी चर्चा नागरिकांत होत असताना आणखी एकाचा खून होते.

### सोलापूर-विजयपूर राष्ट्रीय महार्गावर झाला होता हल्ला

विजयपूर-सोलापूर राष्ट्रीय मार्गावरील अरकेरी तांड्याजवळ २ नोव्हेंबर २०२० रोजीम हादेव सावकार भैरगौंड याच्यावर ३० ते ४० जणांच्या टोळीने हल्ला करून कारला टिप्परने धडक देऊन गोळीबार, पेट्रोल बॉम्ब फेकून प्राणघातक हल्ला करण्यात आला. तीन गोळ्या शरीरात घुसल्यामुळे महादेव सावकारावर अनेक दिवस रुग्णालयात उपचार करण्यात आले. अशाप्रकारे दोन वेगवेगळ्या भागात प्रारंभ झालेल्या भीमातीर परिसरात हत्याकांड थांबणार की अजून किती जणांचे बळी जाणार हा प्रश्नच आहे. भीमा तीर परिसरात दहशत, रक्तपाताचा शेवट कधी होणार याचीच चर्चा करण्यात येत आहे.

खून, खुनाच्या प्रयत्नांची मालिका सुरूच आहे. भीमातीर परिसरात चंदप्पा हरिजन याने दहशत, रक्तपाताची मालिका सुरू केली तर दुसरीकडे पुत्रप्पा सावकार आणि मल्लिकार्जुन चडचण या दोन कुटुंबातील जमिनीच्या सीमेवरून सुरू असलेल्या वाद-विवाद अजूनही सुरूच आहे. २००८ साली महादेव सावकार यांचे मोठे भाऊ पुत्रप्पा सावकार याच्यावर लोणी बीके गावात निवडणूक प्रचारादरम्यान गोळ्या झाडण्यात आल्या. पुत्रप्पाच्या खुनानंतर या दोन कुटुंबातील वैमनस्य आणखीच वाढले. आरोपी मल्लिकार्जुन चडचण अजूनपर्यंत सापडलाच नाही. तो जीवंत आहे की नाही हे सुद्धा कोणाला माहीत नाही. २०१६ मध्ये मल्लिकार्जुन चडचण याचा मुलगा धर्मराज व गंगाधर चडचण यांचा विजयपूर जिल्ह्यात विशेष करून भीमातीर परिसरात वास्तव्य वाढू लागला. ३० ऑगस्ट २०१७ रोजी चडचण येथील कोकंणगाव येथे पोलिसांनी बनावट चकमकीत धर्मराज व गंगाधर यांचा खून केला. याची सुपारी महादेव सावकार भैरगौंड यांनी दिल्याचा आरोप आहे.

## कुख्यात गुंड भागप्पा हरिजन खूनप्रकरणी चौघांना अटक

### पोलीस प्रमुख लक्ष्मण निंबर्गी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. १४ फेब्रुवारी-**



जिल्ह्यातील भीमा नदी काठ परिसरातील अनेक गुन्ह्यांमध्ये सहभागी कुख्यात गुंड भागप्पा हरिजनच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे, असे जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबरगी यांनी सांगितले.

इंडी तालुक्यातील अगरखेड गावातील प्रकाश ऊर्फ पिंटू लक्ष्मण मेलिनकेरी (वय २६), इंडी तालुक्यातील होर्ती गावातील राहुल भीमाशंकर तलकेरी (वय २०), इंडी तालुक्यातील आगरखेडचा सुदीप रेणुका कांबळे (वय २०) आणि बसवेश्वर कॉलनी, बैलहोंगल, बेळगाव जिल्हा येथील मणिकंठ उर्फ गडिगेप्पा शंकरप्पा बेनकोप्प, (वय२७) याला अटक करण्यात आली आहे. फेब्रुवारी ११ तारखेला रात्री दहाच्या सुमारास, पिंटू आणि इतर चार-पाच जणांनी एकत्र येऊन भागप्पावर पिस्तुलाने गोळ्या झाडून आणि नंतर कुऱ्हाडीने आणि चाकूने त्याच्या मानेवर, छातीवर आणि हातावर वार करून त्याची हत्या केली. याप्रकरणी मृताची मुलगी गंगूबाई हिने गांधी चौक पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अलिकडेच, विजयपुर शहरात रवी मलिनकेरी तरुणाची हत्या तुलसीराम हरिजन आणि त्याचे सहकारी ॲलेक्स गोल्लर, षण्मुख नडविनकेरी, प्रकाश गोल्लर, मुरुगेश उल्लागडीआणि राजेसाब रुद्रवाडी यांनी हत्या केली होती हे सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. भागप्पा हरिजन आणि रवी मेलिनकेरी हे नातेवाईक असून दोघांमध्ये काही वर्षांपासून आर्थिक व्यवहार सुरू होते. दोघे मिळून रिअल इस्टेटचा व्यवसाय करीत होते.



### मालमत्तेचा वाद अन् खून

रवी मेलिनकेरीच्या मृत्यूनंतर, रवी मेलिनकेरीचा धाकटा भाऊ, प्रकाश मेलिनकेरी यास भागप्पा हरिजन याने तुझा भाऊ माझं नाव सांगून पैसे, मालमत्ता आणि वाहन घेतले आहे, ते सर्व मला परत दे, असा प्रकाशवर दबाव आणत होता. त्याने प्रकाशला अनेकवेळा धमकीही दिली होती. अलीकडे, भागप्पा ती मालमत्ता सोडून देण्यासाठी दबाव आणत होता आणि त्यांनी अनेकवेळा प्रकाशला धमकीही दिली होती. भागप्पा प्रकाशला तुम्ही ती मालमत्ता द्यावी. अन्यथा १० कोटी द्या, असा दम देत होता. त्याच्या भावाच्या पत्नीबद्दल असभ्य भाषा वापरत होता. मी तुझ्या भावाला कसे मारलं, तुलाही अशाच प्रकारे मारण्याची धमकी दिली होती. हाच राग मनात ठेवून प्रकाश मेलिनकेरीने त्याच्या नातेवाईक आणि मित्रांसह भागप्पाची निर्घृण हत्या करण्याचा कट रचला आणि भागप्पा हरिजनची हत्या केली. आरोपीने गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्रे आणि वाहने जप्त करण्यात आली आहेत.



## सुलाखे हायस्कूलचे विद्यार्थी ५० वर्षांनंतर एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील सुलाखे हायस्कूलमधील पन्नास वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांचे म्हणजेच १९७५-७६ ची बॅच यांचे तिसरे स्नेहसंमेलन नुकतेच अतिशय आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाले.

स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम तालुक्यातील महागाव येथील आकांक्षा या फार्म हाऊसवर आयोजित केला होता. या स्नेहमेळाव्यामध्ये अनेकांनी जुन्या गोष्टीला उजाळा देत अनेक मित्रांच्या आठवणी काढल्या. हे स्नेहसंमेलन खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाचे नियोजन शिवाजी पाटील यांनी केले होते. संजय आगावणे, धनंजय दडपे, हिंमत काळभोर, दिलीप बाफना, प्रमोद कोटलवार, प्रविण तातेड, देविदास पाटील, दीपक जोशी, शोभा, श्रीकांत जोशी या सर्वांनी सहकार्य केले. हा स्नेह मेळावा शिवाजी पाटील यांनी आयोजित केल्याबद्दल सर्व स्नेहींनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले. सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. पुढील नियोजन करण्याचे सुनिश्चित केले.

## बार्शीत हवालदार, पोलीस पाटील ॲन्टी करप्शनच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

पोलीस कर्मचारी सर्जेराव बाबूराव गायकवाड (पोलीस हवालदार बक्कल नंबर ९२९, नेमणूक बार्शी तालुका पोलीस ठाणे, रा. जैन मंदिराच्या बाजूस, अलीपूर रोड, बार्शी), लोकसेवक राहुल रमेश उंबरे (वय ३२, पद पोलीस पाटील, बावी, रा. बावी, ता. बार्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.



बार्शी तालुका पोलीस ठाण्यामध्ये माझ्या आईने दाखल केलेल्या गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात पाठविण्यासाठी लोकसेवक पोलीस यास पोलीस पाटील यांनी मदत केली आणि पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. विशाल बालाजी फोपले (वय २२, व्यवसाय शिक्षण, रा. बावी (आ), ता. बार्शी) यांनी फिर्याद दाखल केली. ही घटना बुधवारी सायंकाळी साडेपाच ते गुरुवारी दुपारी सव्वाबाराच्या दरम्यान घडली. पोलीस गायकवाडने स्वतः करिता १० हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती पाच हजारांच्या लाचेची मागणी करुन ती रक्कम पोलीस पाटील राहुल उंबरेकडे देण्यास सांगितले. लाचलुचपत विभागाने सापळा रचून पाच हजारांची लाच स्वीकारताना पोलीस पाटील उंबरेला रंगेहाथ पकडले. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, लाचलुचपत विभाग सोलापूरचे पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले तपास करीत आहेत.

## बार्शीत व्यापारी पवन श्रीश्रीमाळ यांच्या अपहरणाचा अयशस्वी प्रयत्न

### आठ कोटींच्या खंडणीसाठी रचला होता डाव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

बार्शी शहरातील प्रसिद्ध व्यापारी शुभम उर्फ पवन संजय श्रीश्रीमाळ यांच्या अपहरणाचा कट उधळण्यात पोलिसांना यश आले आहे. ८ कोटी रुपयांची खंडणी मागण्यासाठी कट रचणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून, पाचजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी अल्पवयीन असल्याचे समजते.

१२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.४५ वा. श्रीश्रीमाळ यांना एका अनोळखी व्यक्तीचा फोन आला. शेंगदाण्याच्या व्यापाराच्या बहाण्याने त्यांना भेटायला बोलवण्यात आले. मात्र संशय आल्याने श्रीश्रीमाळ यांनी तो प्रस्ताव नाकारला. त्यानंतर दिवसभर वेगवेगळ्या क्रमांकांवरुन त्यांना फोन येत राहिले, पण त्यांनी प्रत्येकवेळी संभाषण टाळले. सायंकाळी ५.५० वाजता, बालाजी कॉलनी येथील त्यांच्या घरी दोन अनोळखी तरुण एमएसईबीचे कर्मचारी असल्याचे सांगून प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, घरातील व्यक्तींना संशय आल्याने त्यांनी त्यांना रोखले. त्यामुळे दोघेही तिथून निघून गेले.



### सावध राहण्याचे आवाहन

बार्शीतील व्यापारी आणि नागरिकांनी सावधान राहावे, कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

### आरोपींना अटक करण्याची मागणी

व्यापारी पवन श्रीश्रीमाळ यांच्या अपहरणाचा अयशस्वी प्रयत्न झाल्यानंतर बार्शीतील व्यापारी खडबडून जागे झाले असून मुख्य आरोपींना ताबडतोब अटक करा अन्यथा बार्शीतील व्यापार पेठ बंद ठेवू, असा इशारा व्यापारी महासंघाच्यावतीने पोलिसांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या घटनेनंतर श्रीश्रीमाळ यांच्या मित्रांनी सतर्कता दाखवत मारुती स्विफ्ट डिझायर (चक१ २झट६६८४) या गाडीने संशयितांचा पाठलाग केला आणि पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालींदर नालकुल, शहर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी शहर पोलिसांनी तपास वेगाने सुरु केला. आकाश बरडे या संशयितांची चौकशी केली असता पुण्यातील अजिंक्य टोणपे, दक्ष पांडे, प्रथमेश वळामे आणि नवनाथ साळुंखे यांच्यासोबत मिळून मोठा कट रचल्याचे उघड झाले. टोळीने गेल्या एक महिन्यापासून श्रीश्रीमाळ यांच्या हालचालींचे निरीक्षण केले होते. त्यांचे रोजचे वेळापत्रक, प्रवासाचे मार्ग, व्यवसायिक व्यवहार यांचा अभ्यास करुन अपहरणाची संधी शोधत होते. टोळीकडे मफलर, वायर, चाकू यासारखी हत्यारे सापडली आहेत.

या कटानुसार श्रीश्रीमाळ यांचे अपहरण करुन ८ कोटी रुपयांची खंडणी मागण्याचा आणि त्यानंतर त्यांचा खून करण्याचा डाव होता. मात्र, श्रीश्रीमाळ यांची सतर्कता आणि पोलिसांच्या वेगवान कारवाईमुळे हा कट उधळला. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य कट रचणारे आणखीन दोन संशयित आरोपींना लवकरच अटक करण्यात येणार असून, मास्टर माईंड अजिंक्य टोणपे आणि त्याच्या साथीदारांचा शोध सुरु आहे.

# आसक्ती, त्यागाने परमार्थाची आराधना करणाऱ्यांसाठी नामदेवांनी मागितले दीर्घायुष्य

### ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी मांडले श्री संत नामदेव चरित्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

जीवनातील विषयांच्या आसक्तीचा त्याग करत परमार्थाची आराधना करणाऱ्या संत वृत्तीच्या साधकांसाठी श्री संत नामदेवांनी परमात्म्याकडे दीर्घायुष्य मागितले, असे ज्येष्ठ निरुपणकाथ विवेक घळसासी यांनी केले.

शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँकेच्याकर्मवीरव्याख्यानमालेतील चौदाव्या प्रबोधनमालेत पसायदान श्री संत नामदेवांचे या विषयावर ते बोलत होते.यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे उपस्थित होते.

यावेळी घळसासी म्हणाले, नामदेवांनी विठ्ठलाला भोजन खाऊ घातले, यापेक्षा मोठा भक्ती भाव नाही. नामदेवांचे भक्ती सांप्रदायात मोठे योगदान आहे. भागवत धर्माची पताका उत्तर भारतामध्ये फडकविण्याचे काम त्यांनी केले. गुरुग्रंथसायबामध्ये नामदेवांचे अभंग आहेत. पंजाबमधील घुमान येथे नामदेवांच्या नावाने विश्वविद्यालय आहे.



कर्मवीर व्याख्यानमाला पुष्प-दुसरे

संत हे वाणीने रसाळ आणि मनाने मवाळ असतात, असे सांगत घळसासी म्हणाले, संतांना आसनसिद्ध बैठक, श्वासांवर नियंत्रण, गुरुजनांबद्दल श्रद्धा आणि परमार्थिक निष्ठा या पात्रता असाव्या लागतात. संतांनी एकांतवासामध्ये ध्यानाबरोबरच आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण केले पाहिजे. संतांना परमात्म्याशी अनुसंधान साधताना असती त्याग आणि विषय वासना वर्ज करावी लागते. संतत्वाकडे वाटचाल ही सत्वपरीक्षा आहे. सर्व संतांनी आपल्या जीवनामध्ये प्रारब्ध भोग भोगले आहेत. पण अध्यात्मिक आणि पारमार्थिक कर्मातून संतांनी आत्मभान आणि आत्मज्ञान प्राप्त केले. ज्ञानदेव आणि तुकारामांच्या पाया आणि कळसाच्या भूमिकेमध्ये भागवत सांप्रदायाच्या वाटचालीत कळसावर पताका लावण्याचे काम श्री संत नामदेवांनी केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नीता देव यांनी केले. या व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी बँकेचे व्हाईस चेअरमन अशोक वाघमारे, मुरलीधर चव्हाण, सरव्यवस्थापक भारत उमाटे, गणेश बारंगुळे, विजय शिखरे, स्वप्निल राऊत आदी परिश्रम घेत आहेत.

**नामदेवांनी वारकऱ्यांना देशात नेला :** नामदेवांनी आपल्या भ्रमंतीमधून महाराष्ट्रातला वारकरी देशभरात नेला. वारकरी धर्माची समतेची परंपरा जपली पाहिजे. सर्व संतांनी दिलेला संदेश हा आचरणात आणला पाहिजे. केवळ पुस्तकी पांडित्य परिपूर्ण नसते तर जीवनाला अनुभव सिद्ध प्रमाणतेची अनुभूती असावी लागते. नामदेवांनी समाजाला अध्यात्मिक, परमार्थिक, धार्मिक, सांप्रदायिक त्यागाचे देणे देणाऱ्या साधकांसाठी मोक्ष मागितले आणि यातून संत परंपरा धन्य आणि दृढ केली. पंढरपूरच्या देवालयात असलेली नामदेव पायरी ही भक्तीची परमावली आहे. खऱ्या भक्तामुळे परमात्माही झुकतो, असे ते म्हणाले.

# वाढला उकाडा; आठवला डेऱ्याचा थंडावा

## काळे व लाल मातीचे डेरे घेण्यासाठी ग्राहकांची वाढली गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
'शोलापूर'म्हणून सुपरीचित असलेल्या सोलापूरचा तापमानाचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. तापमान सध्या ३७ अंश सेल्सिअसकडे चालले आहे. त्यामुळे शहरवासीयांनी आपला मोर्चा आता लाल व काळ्या माती पासून बनवलेल्या माठांकडे वळवलेला दिसत आहे. वाढत्या उकडांपासून थंडावा मिळावा, यासाठी सोलापूरकरांनी आता माठ खरेदी करण्याचे सुरू केले आहे. त्यामुळे शहराच्या विविध बाजारपेठेत रस्त्याच्या दुतर्फा डेरे (माठ) खरेदी विक्री जोरदार सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

दरम्यान, गरिबांचा फ्रिज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डेऱ्याकडे (माठ) केवळ उन्हाळ्यातच पाहिले जाते. वाढत्या उन्हामध्ये थंडगार पाण्याचे आधाराचे स्तोत्र म्हणून डेऱ्याला ओळखले जाते. सध्या सोलापूरसह आसपासच्या ग्रामीण भागामध्ये देखील यांची मागणी वाढत आहे. शहरातील विविध बाजारपेठेत तसेच प्रमुख रस्त्यांच्या दुतर्फा माठ खरेदी करण्यासाठी ग्राहकांची रेलचेल वाढली आहे. मालवाहतूक करणाऱ्या ट्रकांमधून यांची मठांची एका ठिकाणाहून दुसरा ठिकाणी ने आण केली जात आहे. समाजातील सर्व स्तरातून ग्राहकांची याला मागणी असते. माठातील थंडगार पाणी आपले तहान मिटवतो. यामुळे प्राधान्य क्रमाने ग्राहक यांची खरेदी करतात. सध्या सोलापूर ग्रामीण भागातून माठ विक्रीसाठी शहरात येत आहेत. होटगी दक्षिण सोलापूर येथे काळे व लाल माती पासून बनवलेले माठ गेल्या दोन-तीन महिन्यांपासून शहराच्या विविध बाजारपेठ येथे विक्रीसाठी दाखल झाले आहेत.



### दरवर्षी नवीन माठ खरेदी करण्यावर भर

दर उन्हाळ्यामध्ये नवीन माठ खरेदी केला जातो. वर्षभर ठेवलेला माठ शेवटी खराब होतो. पाणी थंड होत नसल्याने नवीन माठ खरेदी करावा लागतो. उन्हाळ्यामध्ये फ्रिज ऐवजी माठातील पाणी लाभदायक आणि तहान भागवणारे ठरते. फ्रिजच्या पाण्याने सर्दी खोकला येतो. परंतु माठातील पाण्याने कोणताही प्रादुर्भाव होत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात विशेषत्वाने माठ खरेदी केले जाते.

**- शैलू आंधटे, महिला ग्राहक**

### माठांच्या आकारमानानुसार दर

काळे व लाल मातीचे माठ बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. लिटर अथवा घागरीच्या क्षमतेनुसार या माठांचे दर आहेत. सुमारे २५० रुपयांपासून ते ८०० रुपयांपर्यंतचे माठ बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झालेले आहेत. एक ते दीड घागऱ्यांचा माठ २०० ते २५० रुपयांपर्यंत विकला जात आहे. त्याचप्रमाणे दोन ते अडीच घागरींचा माठ चारशे रुपयांपर्यंत विकला जात आहे. त्याच पद्धतीने लाल माती पासून बनवलेले आकर्षक नक्षीकाम असलेले गुजरात माठ यांची किंमत ८०० रुपयांपर्यंत आहे. ग्राहकांची खरेदीसाठी रेलचेल वाढत आहे. ऊन वाढल्यानंतर आणखीन मागणी वाढेल असा अंदाज आहे.

**- समीर चौधरी, विक्रेते**



# लोकांनी वाचावं म्हणूनच मी स्वतःचं ग्रंथालय सुरु करतोय : मारुती चित्तमपल्ली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
माझ्या आयुष्यात मी जवळपास ३० हजार पुस्तकांचं वाचन केलंय, त्याचा संग्रह केलाय. आता तो सगळा पुस्तकांचा खजिना लोकांसाठी उपलब्ध व्हावा म्हणून मी स्वतःचं सुसज्ज असं ग्रंथालय सुरु करतोय.. लोकांनी तिथं यावं, वाचावं, अभ्यास करावा. पुस्तकं घरी देणार नाही. कारण ती फार दुर्मिळ ग्रंथ आहेत. त्यात नोबेल पुरस्काराची, बुकर पुरस्काराची जगभरातली पुस्तकं असतील. अशी माहिती अरण्यऋषि पद्मश्री मारुती चित्तमल्ली यांनी दिली. प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने डॉ. सुहासिनी शहा यांनी त्यांचा सन्मान केला.

त्यावेळी मारुती चित्तमपल्ली यांनी अनेक विषयांवर दिलखुलास गप्पा मारल्या त्यावेळी ते बोलत होते. प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात त्यांचा सत्कार करायचा होता पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्याक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी आज त्यांच्या घरी जाऊन त्यांचा सन्मान केला.

चितमपल्ली यांनी जल, जमीन, जंगल यांची जी आपण हेळसांड केलीय त्याविषयी चिंता व्यक्त केली. बिबटे, वाघ किंवा अन्य जंगली प्राणी मानवी वस्तीत येऊन जे नुकसान करतायत त्यालाही आपण कारणीभूत आहोत. त्यांना जंगलात खायला मिळत नाही म्हणून ते मानवी वस्तीत येतायत. मी नागझिरा, नवेगाव, मेळघाट इथं काम करत असताना जंगलांच्या भोवताली मोठ्या प्रमाणावर गवत उगवेल याची काळजी घ्यायचो. त्यामुळे हरणं जंगलात राहिली, वाघ बिबट्या जंगलात राहिले, प्रत्येकाचं अन्न तिथं उपलब्ध होतं. असे चित्तमपल्ली म्हणाले.



# शौचालय हटविण्यासाठी आज सिद्धेश्वरांची महाआरती

## ● मनपा प्रशासनाला सद्बुध्दी देण्यासाठी घालणार साकडं

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरातील विष्णू घाट येथील व लक्ष्मी मार्केट समोर असलेल्या प्रवेशद्वाराशेजारी असलेले शौचालय हटविण्यात यावे यासाठी सोलापूर शहरातील तमाम महिला मंडळाच्या वतीने ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांना महाआरती करून प्रशासनाला शौचालय हटवण्याची सद्बुद्धी द्या असे साकडे घालणार आहे. ही महाआरती उद्या शनिवार दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता श्री सिद्धेश्वर मंदिर येथे होणार आहे.

या महाआरतीत जिजाऊ ब्रिगेड, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ महिला मंडळ, उद्योगवर्धिनी उद्योग समूह, जैन कासार महिला मंडळ, वडार समाज महिला मंडळ, पद्मशाली सखी संगम, पतंजली योग महिला समिती, शिवसेना महिला आघाडी (ठाकरे गट), महाराष्ट्र वीरशैव सभा महिला आघाडी, अक्कनबळग महिला मंडळ, बसव केंद्र, कलासंगम फाउंडेशन, दानेश्वरी महिला मंडळ, वीरशैव जंगम समाज महिला आघाडी, शिवदासमय महिला मंडळ, बसव योग केंद्र, मुग्धा फाउंडेशन, अक्कमहादेवी महिला मंडळ (मड्डी वस्ती), वीरशैव महिला मंडळ (सम्राट चौक), रुद्रसेना महिला मंडळ, स्वामी समर्थ महिला मंडळ, वीरशैव व्हिजन महिला आघाडी या महिला मंडळांचा समावेश आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

## ● महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने कारवाई सुरू आहे. आज पथकाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत चार चाकी दोन हात गाडी आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले.



महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. आज पथकाकडून जनता दरबार मधील तक्रारी अर्जानुसार छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील रस्त्यावरील असलेले अतिक्रमण हटविण्यात आले. चार चाकी दोन हात गाडी व लोखंडी साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



# मनपातील निवृत्त कर्मचाऱ्यांना प्रॉव्हिडंट फंडाची थकीत रक्कम अदा; कुटुंबीयांनी मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
निवृत्ती वर्ष जेष्ठता यादीनुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात परिवहन उपक्रमाला मनपाकडून प्राप्त झालेले ९० लाख रुपये प्रॉव्हिडंट फ़ंड वितरित करण्यात येत आहे. यामुळे परिवहनच्या सेवानिवृत्त कर्मचारी आणि कुटुंबियांमधून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, परिवहन उपक्रमाचे मयत सेवक कै. दावल कबाडे यांची पत्नी मंगल दावल कबाडे यांना त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या २ दिवसापूर्वी थकीत रक्कम रुपये २ लाख १७ हजार ८६१ रुपये एकवट अदा करण्यात आले. ही रक्कम मिळाल्याने कबाडे कुटुंबीयांनी आज आयुक्त शीतल तेली -उगले यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.महानगरपलिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या धोरणात्मक निर्णयानुसार उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक तैमूर मुलानी आणि सहायक आयुक्त गिरीश पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन उपक्रमाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्ती वर्ष ज्येष्ठतेच्या आधारे प्रॉव्हिडंट फंडाची थकीत रक्कम एकवट देण्याचे जाहीर करण्यात आले होते. या निर्णयामुळे शेकडो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. जे अनेक वर्षांपासून त्यांच्या थकबाकीच्या प्रतीक्षेत आहेत. त्या अनुषंगाने निवृत्ती वर्ष जेष्ठता यादीनुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात परिवहन उपक्रमाला मनपाकडून प्राप्त झालेले ९० लाख रुपये प्रॉव्हिडंट फ़ंड वितरित करण्यात येत आहे.

# छावा चित्रपटाचे संभाजी ब्रिगेडच्यावतीने जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
आज बहुचर्चित छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रावरील छावा चित्रपट सोलापुरातील सर्व चित्रपटगृह येथे प्रदर्शित करण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी या चित्रपटाचे जल्लोषात स्वागत केले.



संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी फर्स्ट शो, फर्स्ट डे हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या पोस्टरला पुष्पवृष्टी व फटाक्याची अतिषबाजी करून जल्लोष केला. यावेळी छत्रपती संभाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेवच्या घोषणेने अवघा परिसर दुमदुमला होता. चित्रपटांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास मांडण्यात आला आहे. रयतेच्या स्वराज्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. तरी सोलापुरातील सर्वांनी सहकुटुंब हा चित्रपट पहावा, असे आवाहन संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे.

# तिलाटीजवळील रेल्वे फाटक बंद करा

## ● जिल्हाधिकाऱ्यांची सिमेंट कंपनी अधिकाऱ्यांना सूचना
## ● आमदार सुभाष देशमुख यांनी घेतली संबंधित विभाग प्रमुखांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिलाटी स्टेशन ते होटगी स्टेशन दरम्यान असलेले सिमेंट फॅक्टरीचे चारही रेल्वे फाटक लवकरात लवकर बंद करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नागरिकांचा अंत पाहू नका, तात्काळ पर्यायी उपाययोजना शोधून ब्रिज व उड्डाणपूल बांधण्यासाठी कार्यवाही करण्याचेही आदेश ही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.




शुक्रवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी आमदार सुभाष देशमुख यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, झुआरी सिमेंट कंपनी तसेच चेट्टीनाड सिमेंट कंपनीच्या अधिकाऱ्यांची संयुक्तपणे बैठक जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे बोलावली. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी रेल्वे फाटक सतत बंद करत असल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठाकरे, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी तसेच होटगीचे सरपंच अतुल गायकवाड, इंगळगीचे सरपंच विनोद बनसोडे, राहुल वंजारे, प्रधान गुरव, सागर धुळवे यांच्यासह तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यासंदर्भातील सर्व माहिती जाणून घेऊन नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल कशी सुटका होईल आणि कायमस्वरूपी गेट हटवण्यासंदर्भात सिमेंट कंपन्यांनी उपाययोजना करावे, असे सांगितले. अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने गेट बंद करण्यासंदर्भात उपाययोजना केल्याचे सांगितले. झुआरी आणि चेट्टीनाड सिमेंट कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना देखील या संदर्भात उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

# विशेष स्वच्छता कामाची आ. विजयकुमार देशमुख यांनी केली पाहणी

## ● अंतर्गत रस्तेही चकाचक होत असल्याने केले कामाचे कौतुक
## ● पालिकेच्या पथकाकडून शेळगी ब्रिज सर्व्हिस रोडची साफसफाई


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
महापालिकेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम २.० नेटक्या पद्धतीने नियोजनपूर्वक राबविण्यात येत आहे. महापालिकेच्या विविध आठ झोन अंतर्गत विविध अंतर्गत रस्त्यांची साफसफाई करण्यात आली. दरम्यान, आ. विजयकुमार देशमुख यांनी स्वच्छता कामांची पाहणी केली. या मोहिमेमुळे रस्ते चकाचक होत असल्याचे सांगत कामाचे कौतुक केले.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली दि. १० ते २२ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ६.३० ते ११ वाजेपर्यंत सोलापूर महापालिका प्रशासनाने शहरातील अंतर्गत रस्ते साफसफाई करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम २.० राबविण्यात येत आहे. मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे माध्यमातून आरोग्य निरीक्षक आणि कर्मचारी पथकांकडून नियोजनपूर्वक स्वच्छतेची कामे करण्यात येत आहेत. शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी विभागीय कार्यालय क्रमांक १ अंतर्गत हॉटेल अंबेसेडर ते निराळेवस्ती पूल, विभागीय कार्यालय २ अंतर्गत विश्रांती चौक ते भीमाई चौक (संपूर्ण होमकरनगर) रूपाभवानी चौक मंदिर ते ब्रिज, विभागीय कार्यालय क्रमांक ३ अंतर्गत महात्मा झोपडपट्टी, क्रांती झोपडपट्टी, पद्मानगर, चिप्पा मार्केट, विभागीय कार्यालय क्रमांक ४ अंतर्गत अपना नगर संपूर्ण परिसर, विभागीय कार्यालय क्रमांक ५ अंतर्गत जानकीनगर परिसर, विभागीय कार्यालय क्रमांक ६ अंतर्गत अमृतनगर संपूर्ण परिसर, विभागीय कार्यालय क्रमांक ७अंतर्गत जगदंबा चौक, फलटण मशीद परिसर व अंतर्गत रस्ते, विभागीय कार्यालय क्रमांक ८ अंतर्गत आर्मी कैन्टीन ते सुरवसे शाळा परिसर, स्वच्छ करण्यात आला. विविध रस्त्यांची साफसफाई करण्यात आली. त्या त्या रस्त्यावरील मुता-या स्वच्छ करणे, डिव्हायडर, रस्त्याच्या कडेची सर्व अनावश्यक साहित्य, कचरा, प्लास्टिक उचलणे, रस्त्याच्या कडेची झाडांची छाटणी करणे, फुटपाथही पाण्याने स्वच्छ धुऊन घेणे आदी स्वच्छतेची कामे करण्यात आली.



### या ठिकाणी दिली भेट

आ. विजयकुमार देशमुख यांनी अचानकपणे स्वच्छता कामाच्या ठिकाणी भेट दिली. शेळगी ब्रिज, तुळजापूर नाका येथील सर्व्हिस रोड स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली. येथील नेटकी स्वच्छता करण्यात आली असल्याचे दिसून आल्याने आ. देशमुख यांनी या कामाचे कौतुक केले. अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या स्वच्छता मोहिमेची माहिती दिली. यावेळी सहाय्यक आयुक्त तथा झोन अधिकारी कृष्णा पाटील, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विद्युत विभागाचे सहाय्यक अभियंता महादेव इंगळे, मुख्य निरीक्षक बाबासाहेब इंगळे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २१ फेब्रुवारीपासून अभिजात मराठीचा 'ऑनलाईन जागर'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

दि. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात मराठीचा 'ऑनलाईन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे.

या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडिओ शेअर करून देश विदेशातील मराठी माणसांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. अभिजात मराठीच्या या ऑनलाईन जागरामध्ये आपण अभंग, पोवाडे, नाट्यछटा, लघुकथा, गायन, भारुड आधी कलांच्या माध्यमातून सहभागी होऊ शकता. अभिजात मराठीच्या या उत्सवात आपला सहभाग हा आपल्या भाषेचा गौरव वाढविणारा ठरेल. तर चला मग करा रेकॉर्ड आपला व्हिडिओ आणि पाठवा आम्हाला. आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महासंवाद' या पोर्टल वर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील. आपले व्हिडिओ ९८९२६६०९३३ आणि ७५०४६९६७८६ या व्हॉट्सअँप क्रमांकावर पाठवू शकता.



## संक्षिप्त वृत्त...

### रविवारी विवेक घळसासी यांचे व्याख्यान

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील जटायु अक्षरसेवा प्रकाशन संस्थेच्या वतीने रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन येथे योग : आहार, विहार, संस्कार या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. योग अभ्यासक धनंजय सूर्यवंशी आणि स्नेहल पेंडसे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. याप्रसंगी ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे व्याख्यान होणार आहे. प्रा. टिंकेश ग्यामलानी यांची विशेष उपस्थिती असेल. ही माहिती जटायुचे संपादक ॲड. मंजुनाथ कक्कळमेली यांनी दिली. लेखक सूर्यवंशी, पेंडसे हे मागील तीन दशकांपासून योग प्रशिक्षण आणि प्रसार करत आहेत. बंगळूर येथील एस व्यासा या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या योग संस्थेत दोन्ही लेखकांचे योगविषयक प्रशिक्षण झाले आहे. ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात योग पदविका अभ्यासक्रम शिकवतात. त्यांच्या योगदीप या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचेही यावेळी प्रकाशन होणार आहे.



### विद्यार्थ्यांसाठी उद्या 'छावा'चा मोफत शो

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

चौधरी फाउंडेशन, सोलापूर आणि मावळा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रविवार दि. १६ फब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असलेला छावा हा चित्रपट विद्यार्थ्यांना मोफत दाखविण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष चेतन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. भागवत डलॅब चित्रपटगृहात २५० विद्यार्थ्यांना हा चित्रपट मोफत दाखविण्यात येणार आहे. ११ ते १५ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांनी या चित्रपटाचा लाभ घ्यावा अधिक माहितीसाठी विराज इंगळे ९६ ९९ ४० ६२ १५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कपिल अलाट यांनी केले आहे. यावेळी विराज इंगळे, अमित भोसले उपस्थित होते.

### रद्दी खरेदीसाठी दरपत्रक देण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

जिल्हा माहिती कार्यालयातील वर्तमानपत्रांची रद्दी विकण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत असून, इच्छुकांनी ( शॉपक्ट लाईसन्स आवश्यक) या कार्यालयाची रद्दी खरेदी करण्यासाठी दरपत्रक सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सोलापूरच्या वतीने करण्यात येत आहे. जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी (मराठी व इंग्रजी ), जुने मासिके पाहण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, दरपत्रके तीन प्रतीत बंद पाकीटात जिल्हा माहिती अधिकारी ,जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर. या नावाने नवीन प्रशासकीय इमारत, तळमजलाक विभाग, सोलापूर -१ या पत्यावर पाठवावीत. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख २१ फेब्रवारी २०२५ अशी आहे.

### शिवालय शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्षपदी हरीश सिध्दे

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजयंती साजरी करणाऱ्या पहिल मंडळ म्हणून ज्या मंडळाच उल्लेख होतो त्या शिवालय सामाजिक संस्थेचे संस्थापक प्रकाश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्ष पदी हरीश सिध्दे यांची निवड करण्यात आली. माजी विरोधी पक्षनेते अमोल बापू शिंदे, उद्योजक प्रमोद मोरे, सुखदेव शिंदे, कार्यकारी अभियंता नवनाथ चव्हाण, शशी थोरात, राम गायकवाड यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्ष हरिश सिध्दे, कार्याध्यक्ष शुभम नीळ, रोहन म्हमाणे, उपाध्यक्ष अभिजित शिंदे, राहुल भोसले, सेक्रेटरी रमाकांत ताटे, सह सेक्रेटरी स्वराज्य चव्हाण, खजिनदार प्रशांत बिराजदार, रितेश कदम, लेझीम प्रमुख शिवराज कलशेट्टी, महिबूब नदाफ, गजानन कोकाटे ऋतुज सिध्दे, मिरवणूक प्रमुख रोहन काटे, विनायक कटके, पूजा प्रमुख स्वप्निल कुलकर्णी, प्रसिद्धी प्रमुख आकाश फुलसे यांची निवड करण्यात आली. शिवजयंतीदिनी ४०० मावळ्यांची लयबद्ध लेझीमने मिरवणुकीने सांगता होईल.



# माघी यात्रेत तीन कोटींचे उत्पन्न


## मागील यात्रेच्या तुलनेत तब्बल ४७ लाखांची झाली घट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ फेब्रुवारी-**

माघ यात्रा कालावधीत भक्तांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी लाखो रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले. मंदीर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, पूजा, फोटो विक्री आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून मंदिरे समितीस तीन कोटी ३ लाखांचे उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

माघ यात्रेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. माघ शुध्द ०१ (दिनांक ३० जानेवारी) ते माघ शुध्द १५ (दिनांक १२ फेब्रुवारी) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ३२ लाख ३३ हजार ४२० रुपये अर्पण, ८० लाख ३४ हजार १२८ रुपये देणगी, ४० लाख ८१ हजार ००० रुपये लाडू प्रसाद विक्री, ३६ लाख ८३ हजार ९६९ रुपये भक्तनिवास, ८ लाख ८८ हजार ८०० पुजेच्या माध्यमातून, ८६ लाख ४८ हजार १५२ रुपये हुंडीपेटी, १० लाख ३९ हजार ७०७ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून ६ लाख ९७ हजार ६४० रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ३२ लाख ४७ हजार ७७४ रुपये अर्पण, ८९ लाख ०२ हजार ७९८ रुपये देणगी, लाडूप्रसाद विक्रीतून ३९ लाख ४४ हजार, भक्तनिवास ५० लाख ९० हजार ७२१ रुपये, ७ लाख २८ हजार ६०० रुपये पूजेच्या माध्यमातून, १ कोटी १५ लाख ९८ हजार ७३९ रुपये हुंडीपेटीतून, ५ लाख १५ हजार ८०५ रुपयाचे सोने-चांदीचे दागिणे अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून ९ लाख ९४ हजार ८२ रुपये प्राप्त झाले होते.





### यावर्षीच्या उत्पन्नात झाली घट

सन २०२४ च्या माघी यात्रेत रू. ३ कोटी ५० लाख २२ हजार ५१९ /- व या वर्षीच्या यात्रेत रू.३ कोटी ३ लाख ०६ हजार ८१६/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू. ४७ लाख १५ हजार ७०३/- इतकी घट झाल्याचे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने सुमारे चार लाख ५० हजार लाडूप्रसादाची विक्री झाली असून, सुमारे ५२ ग्रॅम सोने व ६ किलो चांदीच्या वस्तू प्राप्त झालेल्या आहेत. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असेही यावेळी श्रोत्री यांनी सांगीतले.

# गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त तीन दिवसीय पारायण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

श्री गजानन महाराजांच्या १४७ व्या प्रकट दिनानिमित्त सोरेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात १८, १९ आणि २० फेब्रुवारी रोजी तीन दिवसीय उत्सव साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण, विविध भजन मंडळांचे सादरीकरण, भक्तिगीते, उपशास्त्रीय गायन तसेच धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा ते सात मंगल वाद्य काकडा आरती भूपाळी नऊ ते दहा रुद्र पूजा दहा ते अकरा पंचावन्न श्री दासगणू महाराज यांनी लिहिलेले श्री गजानन महाराज जीवन चरित्र श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण. दुपारी बारा वाजून पाच मिनिटांनी सामूहिक आरती. दुपारी एक ते दोन मुक्ताई,दोन ते तीन गुरुमाई, तीन ते चार मार्कंडेय, चार ते पाच दुर्गा माता महिला भजनी मंडळाचे भजन सायंकाळी पाच ते सहा डॉक्टर संध्या जोशी यांचे भक्ती गीते आणि संध्याकाळी सहा वाजता सांज आरती.

दिनांक १९ फेब्रुवारी सकाळी सहा ते सात मंगल वाद्य काकडा आरती भूपाळी ९ ते १० रुद्र पूजा दहा ते अकरा पंचावन्न सामुहिक श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण. १२ .०५ वाजता सामूहिक आर्थिक. दुपारी एक ते दोन द्वारकाधीश दोन ते तीन स्वरा ,तीन ते चार रेणुका, चार ते पाच दुर्गा भजनी मंडळ आणि पाच ते सहा दीपक कलढोणे यांचे उपशास्त्रीय गायन आणि भक्ती गीते सायंकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी सांज आरती. प्रकट दिनाचा मुख्य सोहळा गुरुवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी सकाळी मंगलवाद्य काकडा आरती भूपाळी नऊ ते दहा मंडळाचे नूतन विश्वस्त श्रीयुत प्रफुल सिंगी यांच्या हस्ते दुग्ध पंचामृत अभिषेक, दहा ते अकरा पंचावन्न श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण, बारा वाजून पाच मिनिटांनी मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाखरे विश्वस्त आणि सर्व भक्तांच्या समवेत महाआरती, सकाळी दहा ते तीन रक्तदान शिबिर, सकाळी साडे दहा ते तीन पर्यंत महाप्रसाद सायंकाळी पाच वाजता पालखी प्रदक्षिणा, सहा वाजता सांजआरती, याशिवाय मंडळामार्फत धार्मिकानुष्ठाने, आध्यात्मिक शिबिरे आणि संस्कृती कार्यक्रम आधी उपक्रम राबविले जातात.

# ढोल-ताशांच्या गजरात शिवमूर्तीची प्रतिष्ठापना



### शिवजयंती निमित्त शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने मूर्तीचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त डाळींबी आड शिंदे चौक येथे शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शिवमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली, यावेळी प्रमुख पाहुणे आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे यांच्या हस्ते श्रींचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भगवा ध्वज फडकण्यात येऊन ध्वजास मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या मूर्तीचे विधीवत पूजन करण्यात आले,

यानंतर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. आपले मनोगत व्यक्त करताना माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, यांनी शिवजयंती निमित्त शहरवासीयांना शुभेच्छा दिल्या

यावेळी ट्रस्टी अध्यक्ष नानासाहेब काळे, राजन जाधव, दिलीप कोल्हे, श्रीकांत डांगे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, विनोद भोसले, श्रीकांत घाडगे, घाडगे गुरुजी, मनोज गादेकर, सुनील रसाळे, महेश हनमे, जगदीश पाटील, बाळासाहेब पुणेकर, तात्यासाहेब वाघमोडे, मतीन बागवान, बजरंग जाधव, मारुती सावंत, अमोल कळंब, सदाशिव पवार, नरेश मोहिते, रवी मोहिते, राजु सुपाते, विवेक इंगळे, अंबादास शेळके, प्रीतम परदेशी, ब्रम्हदेव पवार, लिंगराज जाधव, सचिन चव्हाण, सुभाष पवार, आदित्य घाडगे, डॉ.लक्ष्मणराव काळे, संदीप जाधव, अनिल छत्रबंद, सुनील शेळके, अनिल म्हस्के, जितू वाडेकर, विनायक टेंभुर्णीकर, महादेव गवळी, लहू गायकवाड, विजय पुकाळे, दिनकर जगदाळे, सचिन गुंड, प्रकाश ननवरे, गोवर्धन गुंड, विश्वजित गायकवाड, सोमनाथ शिंदे, सचिन स्वामी, बसू कोळी, देविदास घुले, राजू काकडे, दिनकर जगदाळे, सुनील भोसले, प्रताप चौहान, रमेश जाधव, राम माने, सचिन चव्हाण, राजू व्यवहारे, रोहन माने, श्रीनिवास संगा, महेश जिंदम, सुष्मा घाडगे, लता फुटाणे, सुनंदा साळुंखे, मनीषा नलावडे, लता ढेरे, मनीषा महाडिक, श्रद्धा कंदुरे, वंदना भिसे, प्रतीक्षा चव्हाण, अश्विनी भोसले, वैजयंती भोसले, चारुशीला जगदाळे, नीलिमा शितोळे, मनीषा माने, पूजा शेळवणे, दीपाली चव्हाण उपस्थित होते.




# संत मीराबाई रचित भजन स्पर्धेत स्वरा मंडळ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

राष्ट्र सेविका समितीद्वारे आयोजित संत मीराबाई रचित भजन स्पर्धा शिवस्मारकच्या सभागृहात, शनिवार, दि. १३ फेब्रुवारीला दुपारी २ ते ५ या वेळात पार पडल्या. संगीततज्ञ प्रा.विलासजी कुलकर्णी आणि शुभांगी देशक परीक्षक लाभले. तर गोपाळराव जोशी व सर्जे यांनी तबल्याची साथ दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. माधुरी दबडे यांच्या हस्ते पारितोषिक प्राप्त मंडळांना पारितोषिके दिली. प्रथम क्रमांक स्वरा भजनी मंडळ द्वितीय क्रमांक वीणाप्रसाद भजनी मंडळ उत्तेजनार्थ स्वरांजली भजनी मंडळ. सूत्रसंचालन प्राध्यापिका मधुराताई गोगटे यांनी उत्कृष्ट रीतीने केले. प्रास्ताविकात गायत्री ताई सुमंत यांनी संत मीराबाईंचा जीवनपट सहजतेने उलगडून दाखवला, डॉ, दबडे यांनी संत मीराबाईंसारखी भक्ती समाजाला आदर्शवत कशी आहे, हे स्पष्ट केले. तर अपर्णा सहस्रबुद्धे यांनी संत मीराबाई यांचे भजन गायले. समारोपात सविता लळित यांनी समितिच्या लगतच्या कार्यक्रमाची-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या त्री जन्मशताब्दी निमित्ताने ८ मार्चला होणाऱ्या जाहीर व्याख्यानाबद्दल सांगितले व शिवस्मारक व अन्य सहकार्य करणार्या लोकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अनुजाताई जोशीने शांतिमंत्र म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली. सेविकांना योग्य सजावट, सुंदर रांगोळी काढून रंगत वाढवली.

# प्रभाकर स्वामी महाराज मंदिरातर्फे भाविकांना प्रसादाचे वाटप





सोलापूर : प्रभाकर स्वामी महाराज मंदिरातर्फे २० हजार लाडू प्रसादाच्या पाकिटांचे वितरण करताना सेवेकरी. दुसऱ्या छायाचित्रात गुरुमहाराज प्रतिष्ठानच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करताना पदाधिकारी. (छायाचित्र : केवल तिवारी)

**दर्शनासाठी भाविकांच्या लागल्या रांगा**

**विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त शुक्रवारी सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात भाविकांना २ टन लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले. सुमारे २० हजार लाडू प्रसादाच्या पाकिटांचे वितरण शुक्रवारी झाले.

शुक्रवारी पहाटे श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराजांच्या मूर्तीस रुद्राभिषेक करण्यात आला. यानंतर सामूहिक आरतीनंतर श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराजांच्या बंधूंचे पणतू रमेश टेंबे आणि भक्त मीना जोशी यांच्या हस्ते भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले. यानंतर विविध भजनी मंडळांनी सुरेल भजने सादर करीत भक्तांना ठेका धरायला लावला. यावेळी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोडू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वसंत बंडगर, वामन वाघचौरे, मंदिर समिती सदस्य सुभाष बद्दरकर, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.

### आज रथ, पालखी मिरवणूक

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराजांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त शनिवारी (दि. १५) शहरातील पारंपारिक मार्गावरून रथ आणि पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात समोर होईल. भाविकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टी उदय वैद्य यांनी केले आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३०

**भरोनी सद्भावाची अंजुळी । मियां वोविया फुलें मोकळीं ।**
**अर्पिली अंध्रियुगुली । विश्वरुपाचां ।।**

विश्वरुप दर्शनाने केवळ अर्जुन, संजय आनंदी झाले आहेत असे नाही. विश्वरुप आपल्या आवडत्या भक्ताला दाखविल्याने भगवंतांनाही आनंद झाला आहे. अर्जुन, भगवंत, संजय यांच्याबरोबर विश्वरुपाचा आंनद माऊली स्वत:ही घेत आहेत व हा आनंद ते आपणालाही देत आहेत. भगवंतांनी सांगितलेली श्रीमद्भगदगीता संस्कृत भाषेत तशीच राहिली असती, म्हणजेच माऊलींनी तिला आपल्या मायबोलीत आणले नसते तर हा आनंद आपणाला उपभोगता आला नसता. माऊलींनी त्यांच्या सद्गुरु निवृत्तीनाथांच्या व श्रोत्यांच्या कृपेने विश्वरुपाचे अत्यंत सुंदर प्रकारे वर्णन श्री ज्ञानेश्वरीत अकराव्या अध्यायात केले आहे. या विश्वरुपाचा संबंध त्यांनी अनेक ओव्यातून समाजाशी जोडला आहे. या विश्वरुपाला माध्यम करुन ईश्वराच्या खऱ्या स्थानाची माहिती माऊलींनी दिली आहे. विश्वरुप हे ईश्वराचे खरे रुप असून या रुपात सर्व जीवमात्रांचा समावेश असल्याचे माऊलींनी सोप्या शब्दात पटवून दिले आहे. भक्ती कशी असावी, याचे स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. नि:स्वार्थ भक्ती, प्रेम, आपुलकी ईश्वराला म्हणजे प्रत्येक जीवमात्राला कशी आवडते याचे सोदाहरण स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. केवळ चांगली रुपे, बलशाली जीवच ईश्वराचे अंश नसून इतर सर्वही ईश्वराचाच अंश असल्याचे विश्वरुपात आपणाला पाहायला मिळाले आहे. विश्वरुपाचे वर्णन ऐकल्याने आपल्या मनातील द्वैत, भेद नष्ट झाले असतील. विश्वरुप ज्याला समजले त्याला या विश्वातील सर्व जीवमात्रात ईश्वरच दिसेल यात शंका नाही. खऱ्या भक्ताला लहान- मोठा, चांगला-वाईट,असा भेदच नसतो. म्हणून विश्वरुपाच्या जाणिवेतून खरे भक्त निर्माण करण्याचा प्रयत्न माऊलींनी केला आहे. विश्वरुपाचा मनसोक्त आनंद घेतल्यानंतर माऊली म्हणतात, भरोनी सद्भावाची अंजुळी । मियां वोविया फुलें मोकळीं । अर्पिली अंध्रियुगुली । विश्वरुपाचां ।।. अर्थात सद्भावाची ओंजळ भरुन ओवीरुपी मोकळी फुले आपण विश्वरुपाच्या दोन्ही चरणांवर अर्पण करीत असल्याचे माऊली म्हणतात. विश्वरुपाचे वर्णन करण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये नसतांनासुध्दा केवळ सद्गुरु कृपेमुळे व सर्व श्रोत्यांच्या आशिर्वादाने आपण करु शकल्याचे माऊली म्हणतात. माऊलींचा असा नम्रपणा, अधून-मधून केलेला लडिवाळपणा श्री. ज्ञानेश्वरी अमर होण्याला कारणीभूत ठरला आहे. आपल्याकडून माऊलींसारखे वर्णन होत गेले तर वाद-विवाद, मीपणा, अहंकार, द्वेष,भेद कधीच पळून जातील. माऊलींच्या ओव्यातून अपणाला केवळ भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचा संवाद समजून घ्यावयाचा नाही तर माऊली अधून-मधून जे मार्गदर्शन करीत आहेत, ते मार्गदर्शन आपल्या जीवनात उपयोगात आणावयाचे आहे. माऊलीप्रमाणे ज्या समाजाने दु:खं दिली, त्या समाजालाही आपणाला आनंद द्यावयाचा आहे. सामाजिक ऋणाची जाण ठेवून आपण आपले पाऊल उचलावयाचे आहे. हे पाऊल उचलण्यासाठी आपला आत्मविश्वास, कष्ट करण्याची मानसिकता वाढण्यासाठी माऊलीकृपा निश्चितच होईल यात शंका नाही.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - संत नरहरी सोनार पुण्यतिथी, जगद्गुरु सेवालाल महाराज जयंती |
| दि. १५ फेब्रुवारी २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. तृतीया (२३.५१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - उ.फाल्गूनी (२५.३८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - सुकर्मा (०७.३१) | |
| करण - वणिज (१०.४८) | |

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.

# उद्यापासून शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला

## मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने आयोजन


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दि. १६ ते १८ फेब्रुवारी दरम्यान रोज सायंकाळी ६.३० वाजता शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर येथे छत्रपती शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर येथील शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी प्रशाला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित मूर्तीची प्रतिष्ठापना रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. श्री शिवजन्मोत्सव व्याख्यानमालेचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. याच दिवशी व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प डॉ.केदारनाथ फाळके हे गुंफणार आहेत. आज्ञापत्र व शिवछत्रपतींची राजनीती हा त्यांचा व्याख्यानाचा विषय आहे. सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी अमर हजारे (बीड) हे मानवी मूल्य जागवल्याशिवाय समाज विकास अशक्य या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. याप्रसंगी शिव प्रतिमेचे पूजन पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या हस्ते होणार आहे. मंगळवारी १८ फेब्रुवारी रोजी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन होणार आहे. त्यानंतर डॉ. चंद्रकांत चव्हाण हे मराठ्यांचे स्वातंत्र्यलढ्याचे तेजस्वी पर्व रणरागिणी ताराराणी या विषयावर तिसरे पुष्प गुंफणार आहेत. दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता सोलापूर नगरपरिषद प्रशासन सहआयुक्त विणा पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर शिवजयंतीनिमित्त महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. शिवभक्तांनी शिवतीर्थ येथे महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले आहे. यावेळी विनायक पाटील, प्रा. महेश माने, ज्ञानेश्वर सपाटे, नामदेव थोरात, महादेव गवळी, सुनिता साळुंके, अशोक चव्हाण, शिवदास चटके, सुजाता जुगदार, डॉ.मधुकर पवार, उदयसिंह पवार, किशोर बनसोडे, दत्ता भोसले उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५२) रक्षाबंधन

परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार नेहमी म्हणायचे भारत मातेची परमवैभवी भव्य इमारत तेव्हाच बांधता येईल जेव्हा त्याचा पाया विस्तृत बलशाली व भक्कम बंधुभावावर आधारित असेल. आपले आजचे माननीय संघचालक आपल्या अनेक भाषणातून या देशातील मुसलमान व ख्रिश्चन बांधवांना बंधुभाव जोपासा असे आवाहन करत असतात. तुम्ही एके काळचे हिंदू आहात; पण तुमचे पूर्वज काही कारणाने धर्मांतरित झाले आहेत, हे लक्षात घ्या. तरच 'हिंदू मुस्लिम सीख ईसाई सब है भाई भाई' हा नारा खरा उतरेल. आज हिंदूंनी सुद्धा जागृत होण्याची गरज आहे. आज हिंदू हजारो जातीत, शेकडो पंथांमध्ये, विभागला गेला आहे. विभाजन माणसाला स्वार्थी करते. स्वार्थीपणाचा हा दोष दूर करायचा असेल, तर प्रत्येक हिंदूचे आत्मभान जागृत झाले पाहिजे. जातीपंथाच्या पलीकडे विचार करून मी फक्त आणि फक्त हिंदू आहे हीच माझी ओळख, अशी अनुभूती त्याने धारण केली पाहिजे. जातीपातीच्या भिंती तोडून; अस्पृश्यतेला गाडून; पंथभेद समाप्त करून; हिंदू युवक उभा राहिला पाहिजे. त्यासाठी डॉक्टरजी संघात रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करत असत. यात हिंदू बांधव एकमेकांना राखी बांधत असत. बंधुभाव हा धर्म आहे आणि बंधुभाव हीच मानवता आहे. बंधूभावामुळे

एकराष्ट्रीयता निर्माण होईल. बंधुभावना म्हणजे प्रेम भावना; एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होण्याची भावना असते. ती सर्वांना घट्ट बांधून ठेवते. हे विश्वचि माझे घर हे आपले राष्ट्रीय ध्येय आहे. विश्वबंधुत्वाचा पाया हिंदू बंधुत्व आहे. संत ज्ञानदेव माऊलींनी सुद्धा आता विश्वात्मक देवाला साद घातली आहे.

**क्रमशः**

# पाकणीच्या राजनंदिनी येलगुंडे, संस्कृती यादवांची राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**




सोलापूर जिल्हा मागास समाज सेवा व संशोधन संस्था संचलित श्रीमती सावित्रीबाई खडतरे कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, पाकणी (ता.उ. सोलापूर) येथील राजनंदिनी निवृत्ती येलगुंडे व संस्कृती गोविंद यादव यांची महाराष्ट्राच्या राष्ट्रीय नेटबॉल संघात निवड झाली. २३ ते २६ फेब्रुवारी दरम्यान भिवानी (हरियाना) येथे होणाऱ्या स्पर्धेत ते भाग घेतील. धुळे येथे झालेल्या राज्य नेटबॉल स्पर्धेतील ज्यूनियर मुलींची गटातील कामगिरीवर त्यांची निवड झाली.

यशस्वी खेळांडूचे तसेच मार्गदर्शक प्रा. श्री. मच्छिद्र भानवसे व विठ्ठल शिंदे यांचे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनिषा फुले, प्राचार्य दत्तात्रय महादेव शिंदे व संस्थेच्या उपाध्यक्ष नागेश शिंदे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


स्व. डॉ. वासुदेव रायते


डॉ. मोहन आगाशे


स्व. श्रीनिवास विष्णू रायते


प्रा. श्री. माधव वझे

# महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे पुरस्कार जाहीर

### डॉ. आगाशे यांना डॉ. वासुदेव रायते स्मृती तर प्रा. वझे यांना श्रीनिवास रायते गुरुजी बालसाहित्यिक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्यावतीने ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांना स्वर्गीय. 'डॉ. वासुदेव रायते स्मृती' पुरस्कार तर श्यामची आई चित्रपटातील श्यामची भूमिका साकारणारे प्रा. माधव वझे यांना स्वर्गीय. श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दिली.

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते, साहित्य परिषद जुळे सोलापूरच्या कार्याध्यक्ष सायली जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आणि जयंत रायते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार रविवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात डॉ. मोहन आगाशे आणि माधव वझे यांना सन्मान पूर्वक देण्यात येणार आहे. डॉ. आगाशे आणि प्रा. वझे यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारात १० (दहा) हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल, आणि पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. स्व. डॉ. वासुदेवराव रायते यांच्या निधनानंतर रायते कुटुंबीय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर शाखेच्या वतीने हा पुरस्कार देण्याचे ठरवले आहे. यापूर्वी हा पुरस्कार सोलापूरचे ज्येष्ठ कवी नारायण- काका कुलकर्णी यांना देण्यात आला. तर श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी पुरस्काराने यापूर्वी गोविंद गोडबोले, विजया वाड, आबा महाजन, संगीता बर्वे, आश्लेषा महाजन, एकनाथ आव्हाड, उर्मिला चाकूरकर, आदीं बालसाहित्यिकांचा गौरव करण्यात आला आहे. साहित्य आणि नाट्यसिकांनी या कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे, सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी व कार्याध्यक्षा सायली जोशी यांनी केले आहे.

# स्क्रॅप रिक्षातून पसरतेय धुराचे लोळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

सोलापूर स्मार्टसिटी स्क्रॅप रिक्षांचा धुमाकूळ काही केल्या थांबत नसल्याचे दिसत आहे. दिवसेंदिवस स्क्रॅप रिक्षातून प्रवासी वाहतूक सुरू असल्याने रिक्षात बसणारे व रिक्षाच्या मागून येणाऱ्या दुचाकीस्वार यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. मोडकळीस आलेल्या स्क्रॅप रिक्षातून कायम धूर निघत आहे. अशा या धुराड्यां रिक्षामुळे नागरिकांच्या श्वसन प्रक्रियेला बाधा ठरत आहेत. शहराच्या प्रमुख रस्त्यांवर कालबाह्य झालेल्या रिक्षा कायम धूर ओकत असल्याचे निदर्शनास येते. या रिक्षांवर प्रशासनाकडून कोणती कारवाई होते का? हा प्रश्न नागरिकांना पडत आहे. सध्या रिक्षा चालकांचा परमिट प्रश्न गाजत आहे. तसेच आता बुलेटस्वारांच्या सायलेन्सरवर कारवाई केली जात आहे. आवाज करणाऱ्या बुलेट दुचाकीचे सायलेन्सर काढले जात आहे. अशा पद्धतीने सार्वजनिक आरोग्य धोक्यात आणणाऱ्या प्रत्येक वाहनावर कारवाई व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. कालबाह्य झालेल्या रिक्षा निकाली काढण्यात याव्यात, त्यांचे परवाने रद्द करण्यात यावे, रस्त्यांवर स्क्रॅप रिक्षा धावत असल्याने अपघाताचे प्रमाण देखील वाढणार आहे. त्यामुळे प्रशासनाने अशा रिक्षावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



# धारूरकर,पवार व लिंगडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ, अॅथलेटिक्स असोसिएशन, व जलतरण क्लब यांच्यावतीने पदोन्नतीने तालुका क्रीडाधिकारी म्हणून गणेश पवार (तुळजापूर), सुनील धारूरकर (दापोली जिल्हा रत्नागिरी) तर सूर्याजी लिंगडे यांची (सोलापूर पी.टी.एस.) या ठिकाणी प्रशिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे, सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दशरथ गुरव, शहर उपाध्यक्ष ज्ञानेश्वर काळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहर सचिव प्रा. प्रमोद चुंगे, सहसचिव प्रा. राहुल हजारे, श्री. इंगळगी, श्री. शिवानंद सुतार, श्री.कल्याणप्पा हायगुंडे, प्रताप सूर्यवंशी, संजय साळुंखे, श्री.खाडे, राजू दसाडे, श्री पवार, श्री सोलंकर, श्री तालोटीया, श्री सोहम शेटे, सागर मदारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल हजारे यांनी केले.

# मंद्रुप परिसरातील महा-ई-सेवा केंद्र चालकांकडून लाभार्थ्यांची लूट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १४ फेब्रुवारी-**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालय अंतर्गत असणाऱ्या ३८ गावांमध्ये महा-ई-सेवा चालकांकडून विविध योजनेचे लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची आर्थिक लूट करण्यात येत आहे. याबाबत मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयात तक्रार केल्यानंतर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे . तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महा ई सेवा केंद्रावर कारवाई करून शासनाच्या नियमाप्रमाणे दर घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालय अंतर्गत ३० गावे असून त्यामध्ये सर्वत्र महा-ई-सेवा केंद्र सुरू आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणारे दाखले या कार्यालयाकडून मिळतात . शासनाच्या नियमाप्रमाणे महा ई सेवा केंद्र चालकांनी दर पत्रक लावला असून त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून लाभार्थ्यांकडून ३०० ते ४०० रुपये उकळण्याचा प्रकार सुरू आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची धडपड सुरू असताना महा-ई-सेवा केंद्र चालक मात्र जाणीवपूर्वक लाभार्थ्यांची आर्थिक लूट करीत आहेत. रहिवासी दाखला , जातीचा दाखला, विविध प्रकारचे प्रतिज्ञापत्र , जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, आधारकार्ड, पीकविमा, संजय गांधी योजना अर्ज यासह अनेक शेती विषयक व शासकीय योजनांसाठी लागणारे कागदपत्रे काढण्यासाठी लाभार्थी गेल्यानंतर महा ई सेवा केंद्र चालक दोनशे ते तीनशे रुपये जादा रक्कम घेऊन आर्थिक लूट करीत आहेत . याबाबत मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयात तक्रार केल्यानंतर सहा महिन्यापासून त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे लाभार्थ्यांमधून सांगण्यात येत आहे. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंद्रूप परीसरातील महा ई सेवा केंद्रांवर कारवाई करून लाभार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे दर घेण्याचे आदेश देण्याची मागणी होत आहे.

### मंद्रुप अप्पर तहसीलचे दुर्लक्ष

पीकविमासह इतर दाखल्यासाठी शासकीय दरपत्रक असताना महा ई सेवा केंद्रचालक लाभार्थ्यांकडून पैशांची लूट करीत आहेत . याबाबत तहसीलदार व नायब तहसीलदारांकडे तक्रार केल्यानंतर उडवाउडवीची उतरे देऊन चालढकल करण्यात येत आहे. मंद्रुप अप्पर तहसीलच्या निष्काळजीपणामुळे लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे.

# मि. फिटमध्ये विंटर एंडिंग सेल धमाका ऑफर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

होटगी रोड वरील गांधी नगर चौकातील मि.फिट फिटनेस साहित्य विक्री दालनात, विंटर एंडिंग सेल च्या अंतर्गत आकर्षक ऑफर उपलब्ध आहे.

या ऑफरमध्ये ४५ टक्के पर्यंत सवलतीच्या दरात विविध फिटनेस साहित्य विक्रीसाठी उपलब्ध आहेत, ज्यात घरातल्या घरात चालण्या साठी ट्रेड मिल, वजन कमी करण्यासाठी ईलीप्टिकल सायकल व स्पिन बाईक, गुडघे दुखीसाठी अपराइट बाईक च्या ठराविक मॉडेल चा समावेश आहे. त्याचप्रमाणे, हरक्यूस कंपनीच्या फिटनेस मशीनवर १५,००० रुपयांपासून ४.५ लाख रुपयांपर्यंत 0 टक्के व्याज दराने बजाज फायनान्सकडून फायनान्स उपलब्ध आहे. ही ऑफर १५ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत वैध आहे. तरी ग्राहकांनी या धमाकेदार ऑफरचा लाभ घेण्याचे आवाहन मि.फिट कडून करण्यात आले आहे.



# संत रविदास महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ व संत रविदास विश्वमहापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने संत रोविदास महाराज मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्यावतीने संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.




चार पुतळा, सोलापूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार दिलीपराव माने, अश्विनी सह. रुग्णालयाचे चेअरमन बिपीनभाई पटेल, भारत दूरसंचारचे महाव्यवस्थापक श्रीकांत मग्रुमखाने, जी.एम. ग्रुपचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, डी. के. ग्रुपचे संस्थापक दशरथ कसबे, बॉबी ग्रुपचे संस्थापक अजितभाऊ गायकवाड, माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे व संगीता जाधव, सोलापूर विद्यापीठाचे निबंधक मलिक रोकडे, निवृत्त पोलीस निरीक्षक विठ्ठल अंगुले, फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मोरे, जनता बँकेचे माजी संचालक संजय चाबुकस्कार, प्रल्हाद कांबळे आदिजण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्याच्या हस्ते संत रविदास महाराजाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येवून संत रविदास महाराजांची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित असलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. संत रविदास महाराजांचे समाजकार्य फार मोठे असून त्यांचे आचार विचार आपण सर्वांनी अचरणात अणावे असे अवाहन करून सर्व समाज बांधवांनी गट-तट विसरुन एकजुट दाखवावी असेही आमदार देशमुख म्हणाले. तसेच श्रीदेवी फुलारे यांनीही यावेळी आपले मत मांडले. आपल्या प्रास्ताविक जेष्ठ समाजसेवक व दलित मित्र अशोक लांबतूरे यांनी यावर्षी दोन्ही संघटना एकत्रीत येवून संत रविदास जयंती साजरी करीत आहोत. मात्र समाज बांधव एकत्र येवून आपली दाखवत नसल्याची खंत व्यक्त केली. सूत्रसंचलन परशुराम मग्रुमखाने यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संजय शिंदे यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मधुकर गवळी, मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष आप्पाशा सनके, शावराप्पा वाघमारे, राम कबाडे, गणेश तुपसमुद्रे, ईस्माईल व्हनसुरे, कविता कोडवान, भाग्यश्री शिंदे, वनिता काशिद, आशा सातपुते, शोभा धुळेराव आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रशांत कांबळे, बाळासाहेब आळसंदे, प्रदिप लांबतूरे, तानाजी जाधव, सचिन कांबळे, विजेंद्र शिर्के, अशोक सुरवसे, भिमराव वाघमारे, कृष्णा काळे, पंकज लांबतूरे, तुकाराम चाबुकस्वार, किरण व्हनकुरे, राजु कर्दम, छायाप्पा चव्हाण, बापुसाहेब आडसुळ, अलका गवळी, विद्या हराळे, अनुराधा थोरात, डॉ. अनिल शिंदे, जीवन शिंदे, लक्ष्मण चाबुकस्वार, इरेश मग्रुमखाने, अरुण शिंदे, सुदाम गवळी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# टेंभुर्णी-लातूर महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न सुटणार

## खा. ओमप्रकाशराजे निंबाळकर : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सतत पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

धाराशिव लोकसभा मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाचा महामार्ग टेंभुर्णी-लातूर हा महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी-कुर्डूवाडी- बार्शी- पांगरी, धाराशिव जिल्ह्यातील येडशी, तडवळा, ढोकी व लातूर जिल्ह्यातील मुरुड या मोठ्या बाजारपेठांना जोडणारा व मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेले बार्शी शहरातून थेट पश्चिम महाराष्ट्राचे संपर्क निर्माण करणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न लवकरच मिटण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. चौपदरीकरणाच्या अनुषंगाने लोकसभेत २१ जानेवारी २०१९ रोजी तारांकित प्रश्न खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मांडला होता. तसेच सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाकरिता अनेक वर्षापासून प्रयत्न चालू होते. अर्थसंकल्प अधिवेशनात ९ मार्च २०२१ रोजी नियम ३७७ च्या माध्यमातून हा विषय मांडला. राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी अभियंता, लातूर यांच्यासोबत ५ ऑक्टोबर २०२१ रोजी धाराशिव येथे आढावा बैठक घेतली. ४ ऑगस्ट २०२२ रोजी केंद्रीय मंत्री गडकरी यांची दिल्ली येथे भेट घेतली. २१ डिसेंबर २०२३ रोजी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी गडकरी यांची पुन्हा भेट घेऊन पाठपुरावा केला.

यामुळे गडकरी यांनी या मार्गास ५७४.१८ कोटी रुपये मंजूर केल्याचे कळविल्याचे खा. निंबाळकर यांनी सांगितले. जवळा (दु), ते बोरगाव (काळे) अंतर ३७.५२५ किमी मार्गाच्या चौपदरीकरणासाठी ५७४.१८ कोटी रुपये मंजूर झाले आहे. हे काम निविदा स्तरावर आहे.

### ढोकी येथे आज बैठक

याबाबत शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी दु. १२ वा. राजलक्ष्मी मंगल कार्यालय, ढोकी येथे बैठक लावण्यात आली आहे. या बैठकीस खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. कैलास घाडगे-पाटील, कार्यकारी अभियंता, लातूर, राष्ट्रीय महामार्ग सल्लाम सलत उपस्थित राहणार आहे. या बैठकीस जवळा (धु), दुधगाव, कसबे तडवळा, ढोकी, कोल्हेगाव, ढोराळा, मुरुड या भागातील नागरिकांनी उपस्थित रहावे व या महामार्गाच्या बाबतीत काही शंका, प्रश्न असतील त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त


कु. स्वयम पंकज किटुकाले 97.21 percentile | कुमारी. क्षितिजा पुष्कराज गांधी 87.92 percentile | कु. आर्यन सुजय गोडसे 82.60 percentile | कुमारी. तनवी नितीन राणे 81.74 percentile

### शिवरत्न पॅटर्न; अकलूजच्या विद्यार्थ्यांचे जेईईमध्ये घवघवीत यश

**अकलूज, दि. १४ फेब्रुवारी-**

देशपातळीवर घेण्यात आलेली JEE EXM² FIRST SESSION २०२५ परीक्षेत शंकरनगर, अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या शिवरत्न पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश संपादन केले आहे. स्वयंम पंकज किटुकाले ९७.२१, क्षितिजा पुष्कराज गांधी ८७.९२, आर्यन सुजय गोडसे ८२.६०, तनवी नितीन राणे ८१.७४ पर्सेंटाईल घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी लातूर पॅटर्नवर आधारित शिवरत्न पॅटर्न, अकलूजची सुरूवात करण्यात आली होती. या शिवरत्न पॅटर्नच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थी घवघवीत यश संपादन करत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते-पाटील, अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

### ग्रामपंचायत अधिकारी हनुमंत वगरे यांची स्वीय सहाय्यक पदावर नियुक्ती

**सदाशिवनगर, दि. १४ फेब्रुवारी-**



पिरळे (ता. माळशिरस) ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी हनुमंत वगरे यांची स्वीय सहाय्यक पदावर (उसनवारी तत्वावर) नियुक्ती करण्यात आली असून त्यांना कार्यमुक्त करावे असे माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांना कळविण्यात आले आहे. हनुमंत वगरे यांचे मुळगाव कोंडबावी (ता. माळशिरस) त्यांनी १९९९ साली महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे एमएससी (अग्री) शिक्षण घेतले त्यानंतर ते ग्रामसेवक या पदावर काम करीत आहेत.आता ते पिरळे ता माळशिरस ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत तसेच बांगार्डे या गावचाहि अतिरिक्त पदभार थांच्यावर आहे.तसेच ते माळशिरस तालुका अधिकारी प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेचे काम पहात आहेत.त्यांची ग्रामविकास व पंचायतराज राज्यमंत्री ना योगेश कदम यांचे स्वीय सहाय्यकपदी हनुमंत वगरे यांची (उसनवारी तत्वावर) नियुक्ती करण्यात आली आहे.

### ओंकार साखर कारखान्याने शेतकऱ्यांना दिला मदतीचा हात

**पिलीव, दि. १४ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात पंढरपूर तालुक्यातील उर्वरीत ऊसाचे गाळप करुन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. माळशिरस तालुक्यातील ऊस सध्या जवळपास संपलेला आहे. सध्या प्रचंड उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे यामुळे ऊसाला पाणी कमी पडत चालले आहे. शेतकरी अडचणीत असताना व पाणी कमी पडत चालले आहे वजनात घट होत आहे. ओंकार साखर कारखाना यंदाच्या गळीत हंगामात ऊसास ३१०० रुपये दर जाहीर केला आहे तर फेब्रुवारी महिन्यात गाळपास येणाऱ्या ऊसास ३१०० दर देणार आहे. सध्या पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनचा बराच ऊस शिल्लक आहे यामुळे या तालुक्यातुन ओंकार कारखान्यास सुमारे एक हजार ते बाराशे टन ऊस गाळपास येत आहे. अडचणीच्या काळात आम्हाला ओंकार साखर कारखान्याने ऊस गाळपास नेला यामुळे भविष्यात सुद्धा आम्ही कारखान्यास मदत करु असे बोलुन दाखविले. तर ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी आपला कारखाना दराबाबत कोणासीही स्पर्धा करीत नाही. मात्र शेतकरी हिताला प्राधान्य दिले जातेय.




### मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**पंढरपूर, दि.१४ फेब्रुवारी-**

श्री रुक्मिणी विद्यापीठ संचलित मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमाची सुरूवात संस्थापक सचिवा सुनेत्राताई विजयसिंह पवार यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आली. सुनेत्राताई पवार, प्राचार्या नंदिनी गायकवाड, इरफान शेख, माधुरी बोडके, विभावरी डुबल यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन निकीता कदम यांनी केले तर आभार कार्तिकी पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शंभु नवले, नागनाथ क्षीरसागर, सोहम भंडारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### बेवारस मयताबाबत संपर्क साधण्याचे आवाहन


**पंढरपूर, दि.१४ फेब्रुवारी-**

पंढरपूर रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नंबर तीन वर एक अनोळखी पुरुश मयत झाला आहे. सदर मयत व्यक्तीबाबत माहिती असल्यास सबंधितांनी रेल्वे पोलीसांशी संपर्क साधवा असे, आवाहन पंढरपूर रेल्वे पोलीसांनी केले आहे. अनोळखी व्यक्तीचे वय अंदाजे ३५ वर्षे असून, उंची १७० से.मी, अंगाने सडपातळ, रंग काळा-सावळा, केस काळे, चेहरा उभट, नाक सरळ, अंगावर काळ्या रंगाची पांढऱ्या पट्ट्याची ट्रॅक पॅन्ट व काळ्या रंगाचा टी शर्ट असे मयत व्यक्तीचे वर्णन आहे. संबधीतांनी तसेच ओळखीच्या व्यक्तीने याबाबत पंढरपूर लोहमार्ग पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुप्रतिपदा उत्सव भक्तिभावात

## अक्कलकोट शहरातून निघाली श्री स्वामी समर्थांच्या पारंपारिक पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी-**



गुरूप्रतिपदानिमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुप्रतिपदा उत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. पहाटे ५ वाजता श्रींची काकड आरती झाली. यानंतर स्वामीभक्तांच्या वतीने नित्यनियमाने होणारे अभिषेक झाले. सकाळी ८:३० वाजता चेअरमन महेश इंगळे यांच्या उपस्थितीत पुरोहित मंदार महाराज व ब्रम्हवृंदांच्या वैदिक मंत्रोच्चारात देवस्थानचे विश्वस्त महेश गोगी यांच्या हस्त पारंपरिक देवस्थानचे लघुरुद्र करण्यात आले.

दुपारी ११:३० वाजता श्रींना नैवेद्य आरतीद्वारे महानैवेद्य अर्पण करून भक्त निवास येथे स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद देण्यात आले. याचा लाभ हजारो स्वामी भक्तांनी घेतला. दिवसभर हजारो भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकारिता मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी व सेवेकरी प्रयत्नशील होते. सायंकाळी ५ वाजता श्रींच्या सजविलेल्या पालखी सोहळ्याची सुरुवात देवस्थानचे पुजारी मोहन महाराज, मंदार महाराज, व्यंकटेश महाराज यांचे हस्ते आरती करून व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांचे हस्ते पालखी पूजन करून वारकरी दिंडया व बँड पथक व स्वामी नामाच्या जयघोषात पालखी मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आले. पालखी मिरवणुक फत्तेसिंह चौक, मेन रोड, कारंजा चौक, समाधी मठ, परतीचा मार्ग कारंजा चौक, मौलाली गल्ली, सुभाष गल्ली, मधला मारुती, भारत गल्ली, देशमुख गल्ली, मार्गे वटवृक्ष मंदिरात रात्री साडे नऊ वाजता पालखी मंदिरात आल्यानंतर गुरु भजन व आरती होवून उपस्थित सर्व भाविकांना मंदिर समितीच्या वतीने शिरा प्रसाद वाटप करण्यात आले. यानंतर गुरूप्रतिपदा उत्सव कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मंदार महाराज पुजारी, महेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, चंदकांत गवंडी, शशिकांत लिंबीतोटे, प्रदिप हिंडोळे, महादेव तेली, अमर पाटील, प्रसन्न हत्ते, रामचंद्र समाणे, संतोष पराणे, श्रीकांत झिपरे, सागर गोंडाळ, गिरीश पवार, प्रसाद सोनार, महेश काटकर, संजय पवार, स्वामीनाथ लोणारी, श्रीशैल गवंडी, ऋषिकेश लोणारी, अविनाश क्षीरसागर, संतोष जमगे, लखन सुरवसे, संजय बडवे, मोहन शिंदे, वैभव जाधव, नरसिंग क्षीरसागर, दादा सावंत, दिपक जरिपटके, ज्योती जरिपटके, प्रसाद पाटील सर, विपूल जाधव, नागनाथ जेऊरे, राजेश निलवाणी, चंद्रकांत डांगे, पोपट भोसले, दिगंबर पाटील, श्रीमंत पांचाळ, अक्षय पांचाळ, नागनाथ गोमदे आदींसह देवस्थानचे सेवेकरी व अनेक स्वामीभक्त उपस्थित होते.




# बार्डी येथे कळसारोहण, अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१४ फेब्रुवारी-**

बार्डी (ता. पंढरपूर) येथे महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी कळसारोहण व अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात होणार आहे.

यंदा अखंड हरिनाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव तसेच मंदिराच्या कळसाचे कळसारोहण असा दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. कळसारोहण वारकरीरत्न हभप राम महाराज झिंजुर्के यांच्या हस्ते होणार आहे. त्या अनुषंगाने वारकरी संप्रदायाप्रमाणे भव्य कलश दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.त्यासाठी सोलापूर व पुणे जिल्ह्यातील सर्व प्रसिद्ध गायक, वादक मंडळी उपस्थित राहणार आहेत. कलश दिंडीमध्ये हजारो मृदंगवादक आपली मृदंगांची कला सादर करणार आहेत. रौप्य महोत्सवानिमित्त यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहमध्ये अकरा दिवसांचा सोहळा साजरा होणार आहे. या सप्ताहाचे ध्वजपूजन हभप गुरुवर्य सुदाम महाराज पिसे व कलश पूजन हभप बालयोगी सुखदेव महाराज यांच्या हस्ते होणार आहे. सोहळ्यामध्ये दैनंदिन काकडा आरती, अभिषेक, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा त्याचबरोबर तुकाराम महाराज गाथा वाचन, भजन, संतचरित्र, हरिपाठ, कीर्तन, हरिजागर आणि सुगम संगीताचे कार्यक्रम होणार आहेत. रौप्य महोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्रीराम महाराज झिंजुर्के, तुकोबारायांचे दहावे वंशज बापूसाहेब महाराज देहूकर यांच्याबरोबरच इतर प्रसिद्ध कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. कळसारोहण व हरिनाम सप्ताहानिमित्त बार्डी व बार्डी पंचक्रोशीतील वारकरी, भाविकभक्तानी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सप्ताहात सामील व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# नदीवरील विद्युत मोटारीची चोरी; आरोपीस तीन महिने करावास

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १४ फेब्रुवारी-**



पेहे (ता. पंढरपूर) येथील शेतकऱ्याची भीमा नदीवरील विद्युत पाणबुडी मोटार चोरल्याप्रकरणी पंढरपूर न्यायालयाने तीन महिने सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पंढरपूर पी. बी. घोरपडे यांनी आरोपी सुनिल पाटील यास शिक्षा सुनावली. याबाबत अधिक माहिती अशी की पेहे येथील शेखर बेलदर यांची भीमा नदी पात्रातील पानबुडी मोटार १७ जानेवारी २०२३ रोजी चोरीला गेली होती. करकंब पोलिसांनी तपास करुन आरोपी विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याची सुनावणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पी. बी. घोरपडे यांच्यासमोर झाली. सरकारी वकील याकूब मुल्ला यांनी न्यायालयासमोर भक्कम पुरावा सादर करीत केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीस तीन महिने सश्रम कारावस व दोन हजार दंडाची शिक्षा सुनावली. करकंब पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश तारू यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार म्हणून पोलीस नाईक खांडेकर यांनी तर कोर्ट ऑर्डरली पोलीस हवालदार बंडू कुंभार यांनी कामकाज पाहिले.

# सोजर फार्मसीच्या प्राध्यापकांचा आंतरराष्ट्रीय सन्मान

## इंडो-कॅरिबियन परिषदेत द्वितीय क्रमांकाने झळकले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

कागल (जि. कोल्हापूर) येथील वाय. डी. माने इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये पार पडलेल्या इंडो-कॅरिबियन आंतरराष्ट्रीय परिषदेत खांडवी येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीतील प्रा. शितल कुऱ्हाडे आणि मंदार जोशी यांनी उल्लेखनीय कामगिरी करत पोस्टर सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.




औषध संरचना, संशोधन आणि फार्मास्युटिकल सायन्समधील जागतिक ट्रेंड या विषयावर आयोजित या परिषदेचे आयोजन असोसिएशन ऑफ फार्मसी प्रोफेशन, महाराष्ट्र राज्य आणि वेस्ट इंडीज इंटरनॅशनल ब्रँच यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या परिषदेचा मुख्य उद्देश औषध निर्मितीतील आधुनिक संशोधन, तंत्रज्ञानातील नवीन प्रवाह आणि फार्मास्युटिकल उद्योगातील भविष्यातील संधी यावर चर्चा घडवून आणणे हा होता. परिषदेत विविध तज्ज्ञांनी आपले संशोधन सादर केले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर औषध क्षेत्रातील नवकल्पनांचा आढावा घेतला. सोजर कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापकांनी अड्वान्सेस इन ३ऊ प्रिंटिंग फॉर पर्सनलाईज्ड ड्रग फॉर्म्युलेशन्स या नावीन्यपूर्ण विषयावर प्रभावी पोस्टर सादर केले.

त्यांच्या या संशोधनाने आधुनिक औषधनिर्मिती प्रक्रियेत थ्री डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या वापराची व्याप्ती आणि त्याचे संभाव्य फायदे यावर प्रकाश टाकला.

या परिषदेतील स्पर्धेत १६० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या सोबतच, महाविद्यालयातील द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थी करण सोलंकी आणि गौरव हिप्परगी यांनीही या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. सुजित करपे, संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले आणि सचिवा कल्पनाताई बारबोले यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

# अणदूरमधील रस्त्यासाठी आत्मदहनाचा इशारा

## अतिक्रमण हटविण्याबरोबरच दोन्ही बाजूला गटार करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १४ फेब्रुवारी-**

तीर्थक्षेत्र पर्यटन विकास अंतर्गत साधारण दोन कोटी रुपये ईस्टीमेट असलेल्या अणदूर स्टॅण्ड ते आण्णा चौक या मुख्य रस्त्याचे काम चालू झाले असून, हे काम दोन्ही बाजूचे अतिक्रमण काढून, दोन्ही बाजूंना गटारी करूनच करावे तसेच गटार नसलेल्या रस्त्याचे ईस्टीमेट देणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी अन्यथा १७ फेब्रुवारी रोजी तहसील, तुळजापूर कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा माजी शिवसेना तालुका प्रमुख बाळकृष्ण घोडके यांनी दिला आहे.



अणदूर मुख्य रस्त्याचे काम हे एमजीपी पाईप लाईन रस्त्याच्या बाजूने आगोदर पुरावी, अडथळे ठरणारे वीज पोल काढावेत, रोडच्या बाजूने स्ट्रीट लाईट लावावी, रोडच्या मधोमध डिव्हायडर लावावा तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला झालेले अनधिकृत अतिक्रमण ताबडतोब काढावेत अशा मागण्या केल्या असून या मागण्या मान्य नाही झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही निवेदन देण्यात आले आहे.

### समन्वयाचा अभाव

रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे, कारण पुढील ५० वर्ष हा रस्ता होणार नाही हे सगळ्यांना मान्य असताना व या बाबत एकमत असतानाही रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात राजकारण होत असताना दिसून येत आहे. राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, व्यापारी, गुत्तेदार, ग्रामपंचायत सदस्य यांच्यात समन्वय दिसून येत नसल्याचे चित्र आज दिसत आहे.



# शिवानंद बिंदगेंचे विचार मोलाचे : महेश इंगळे

**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील स्विमिंग ग्रुप व प्रभात भ्रमण परिवारचे जेष्ठ सदस्य शिवानंद बिंदगे यांचे विचार व मार्गदर्शन अत्यंत मोलाचे होते. स्विमिंग करीत असताना नित्य दिनचर्येत मन प्रसन्न व आनंदी ठेवून जीवन जगण्याचा हास्य आम्हाला दिल्याचे मनोगत श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले

कै. शिवानंद बिंदगे सदस्यांसह हसापूर येथील फार्म हाऊसवर वर्षानुवर्षे स्विमिंग करणे व प्रभात भ्रमण परिवारसह व्यायाम करणे अशी त्यांची दिनयर्या होती. त्यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. स्विमिंग ग्रुपमधील ज्येष्ठ सदस्य, सदैव प्रसन्न-हास्य व्यक्तीमत्व हरपल्याने स्विमिंग ग्रुप सदस्यांवर व प्रभात भ्रमण परिवारसह बिंदगे कुटुंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. श्री.स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना करून सर्वांच्या वतीने कै. शिवानंद बिंदगे मामा यांच्या प्रती भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आला. यावेळी संतोष पराणे, बाळासाहेब एकबोटे, अरविंद पाटील, अंकुश केत, श्रीकांत झिपरे, चंद्रशेखर आडवितोटे, शिवशरण अचलेर, सुनिल पवार, चंद्रकांत सोनटक्के, बाबा सुरवसे, मल्लीनाथ आडवितोटे, सचिन किरनळ्ळी, काशिनाथ सोलनकर, ज्ञानेश्वर भोसले यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व मित्र परिवार उपस्थित होता.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याची चैन अर्पण



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ फेब्रवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरे समितीस पंढरपूर येथील दानशुर भाविकाने सुमारे १६ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

संबंधित भाविक हे श्रीक्षेत्र पंढरपूर येथील रहिवाशी असून, त्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी नाव न जाहिर करण्याच्या अटीवर १६ ग्रॅम वजनाची चेन श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली आहे. त्याची अंदाजे एक लाख २३ हजार इतकी किंमत होत आहे. मंदिर समितीने सोने चांदीच्या भेट वस्तू स्विकारण्यासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती केली असून, त्यासाठी विभाग प्रमुख, एक लिपीक संवर्गातील कर्मचारी व दोन सराफ कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहे. भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते.

ज्या भाविकांना सोने चांदीच्या वस्तू अर्पण करावयाच्या आहेत, त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन देखील यावेळी श्री.श्रोत्री यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...

### राज्यस्तरीय सब ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी नवता वीरची निवड

**करमाळा, दि. १४ फेब्रुवारी-**

शेलगाव क. (ता. करमाळा) चे रहिवाशी व सध्या जुन्नर येथे कार्यरत असलेले प्रा. इंद्रजीत वीर यांची कन्या नवता इंद्रजित वीर हिची १०० मी धावणे या खेळ प्रकारासाठी महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशीप २०२५ या पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने घेतलेल्या जिल्हास्तरीय सब ज्युनिअर खेळ गटामध्ये ८ वर्षांखालील मुलींच्या गटातून १०० मी. धावणे या खेळ प्रकारात नवता हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. आता ती पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जुन्नर तालुक्यातील सर्वात लहान खेळाडू म्हणून हिची प्रथमच निवड झाली आहे. नवता ही जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे, प्राचार्य सबनीस प्राथमिक विद्यालय जुन्नर या विद्यालयाची विद्यार्थिनी असून ती इयत्ता दुसरीत शिकत आहे. तिला द लिजेंड अकॅडमी जुन्नरचे प्रमुख दिशांत मेहेर व अतुल औटी यांनी मार्गदर्शन केले आहे. जुन्नर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. सुधीर ढोबळे, उपाध्यक्ष संजय बुट्टे-पाटील, कार्याध्यक्ष धनेश संचेती, सेक्रेटरी ॲड. अविनाश थोरवे, मुख्याध्यापिका उर्मिला थोरवे यांनी अभिनंदन केले.





### हॅकेथॉन प्रदर्शनासाठी नागनहळ्ळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची निवड

**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यावतीने यंदा प्रथमच हॅकेथॉन स्पर्धात्मक कार्यक्रम होणार आहे. यात नागनहळ्ळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. जिल्हा प्रदर्शनात नागनहळ्ळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी बहुउद्देशीय कृषी यंत्र निर्मिती केली. त्यास जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळाला. यामुळे या प्रदर्शनासाठी त्यांची निवड झाली आहे. प्राप्त झाले असून राज्यस्तरीय हॅकेथॉन प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. जमीर जमादार, जुबेर जमादार व बसवराज आजुरे यांनी यंत्राची निर्मिती केली असून, त्यांना शंभुलिंग बशेट्टी, वशीम शेख, रविंद्र नवले, अमोल पाटील, शुंभागी मिठारी, मोहन गुरव व प्रयोगशाळा सहाय्यक नुरद्दीन शेख यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य मुजावर आय. एम., मुख्याध्यापक आर. जी. शेख यांनी अभिनंदन केले.



### केत्तूर येथील नेताजी सुभाष विद्यालयातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**करमाळा, दि. १४ फेब्रुवारी-**

केत्तूर येथील नेताजी सुभाष विद्यालयातील दहावी, बारावी विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. अध्यक्षस्थानी जयसिंगराव देशमुख होते. यावेळी बाजीराव माने, प्राचार्य के. कृष्णमूर्ती, केंद्र प्रमुख काळे, सरपंच सचिन वेळेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष निकम, उदयसिंह मोरे-पाटील, राजाराम माने, हरिश्चंद्र खाटमोडे, राजेश कानतोडे, सुभाष जरांडे, सर्जेराव राऊत, निर्भया पथकाचे समीर खैरे आदि उपस्थित होते.पर्यवेक्षक भीमराव बुरुटे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राधिका देशमुख, रोशनी भोसले, वर्षाराणी बाबर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. धस यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य काशिनाथ जाधव यांनी केले, सूत्रसंचालन किशोर जाधवर यांनी केले तर शेवटी आभार रामचंद्र मदने यांनी मानले.

### ॲड. अजित विघ्ने यांना मिळाली नोटरी

**करमाळा, दि. १४ फेब्रुवारी-**



करमाळा तालुक्याचे पश्चिम भागातील केत्तुरचे रहिवाशी ॲड. अजित विघ्ने यांना भारत सरकार-नोटरी होण्याचा बहुमान प्राप्त झालेला असून, आजपर्यंत करमाळ्याचे पश्चिम भागात कोणीही नोटरी नव्हते. यामुळे या भागातील लोकांना भिगवण, बारामती, इंदापूर तसेच कर्जत, टेंभुर्णी अशा ठिकाणी दस्त नोंदणी व इतर महत्त्वाच्या कामासाठी जावे लागत होते. त्यांनी पॅनल ॲडव्होकेट म्हणून जिल्हा परिषद, पंचायत समिती करमाळा, स्टेट बँक ऑफ इंडिया, जलसंपदा विभाग येथे काम केलेले असून, विविध अशासकीय कमिटीवरदेखील ते कार्यरत आहेत.

# पंढरपूर-म्हसवड, भाळवणी-पिराची कुरोली मार्ग धोकादायक

## ● गतिरोधक नसल्यामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ; भाळवणीचे सरपंच रणजीत जाधव करणार आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ फेब्रुवारी-**

पंढरपूर ते म्हसवड आणि भाळवणी ते पिराची कुरोली या रस्त्यावर गतिरोधक करणे अत्यावश्यक झालेले आहे. याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे तालुक्यातील भाळवणी गावचे सरपंच रणजीत जाधव यांनी २५ फेब्रुवारी २०२५ पासून पंढरपूर तहसील कचेरी समोर आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की पंढरपूर ते म्हसवड हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ई असून हा रस्ता भाळवणी गावातून जात आहे. या रस्त्यावरच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, न्यू इंग्लिश स्कूल भाळवणी या दोन्हीही संस्थेचे अंदाजे तीन हजार विद्यार्थी ये जा करीत असतात. तसेच सांगोला कडे येण्या जाण्यासाठी याच रस्त्याचा उपयोग केला जात आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहतुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. याचा परिणाम म्हणून या रस्त्यावर अनेक लहान-मोठे अपघात घडत आहेत. यास जबाबदार कोण राहणार ? असा सवाल नागरिकाकडून केला जात आहे. तरी महीम चौक,एस टी स्टँड जवळ,लिंगे शॉपिंग सेंटर परिसरात तात्काळ गतिरोधक करण्यात यावेत अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे. तात्काळ गतिरोधक न केल्यास सरपंचसह,ग्रामपंचायत सदस्य, विद्यार्थी,पालक, महिला तसेच ग्रामस्थांनी आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.



या बरोबरच भाळवणी ते पिराची कुरोली या रस्त्यावरही गतिरोधक करणे गरजेचे आहे. हा रस्ता गावाच्या मधून जात असल्यामुळे या रस्त्यावर लहान मुले महिला ग्रामस्थ यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच या रस्त्यावरून पांडुरंग व वसंतराव काळे साखर कारखान्याच्या वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे या रस्त्यावरही सतत लहान मोठे अपघात घडत आहेत. तरी एस टी स्टँड जवळ,मशीद,म्हेत्रे कॉर्नर,भीमनगर चौक,गोंधळी चौक, अण्णाभाऊ साठे नगर चौक येथे गतिरोधक करणे आवश्यक आहे.तरी संबंधित विभागाने या दोन्ही रस्त्यावर गतिरोधक तात्काळ करावेत अशी मागणी ग्रामस्थांमधूनही केली जात आहे.

यापूर्वी वेळोवेळी ग्रामपंचायत कडून संबंधित विभागास गतिरोध करण्याबाबत पत्रव्यवहार करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्यामुळे व ग्रामस्थांच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे मी स्वतः पंढरपूर तहसील कार्यालय येथे २५ फेब्रुवारी २०२५ रोजी आमरण उपोषणास बसणार आहे. तरी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ गतिरोधक करून सहकार्य करावे.

**-रणजीत जाधव,**
**सरपंच, ग्रामपंचायत, भाळवणी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ पुणे या विभागात दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळा व न्यू इंग्लिश स्कूल या शाळेच्या दरम्यान रबलर स्ट्रिप करण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. त्यास अनुसरून कार्यकारी अभियंता दिपाली पोतदार यांनी दिनांक ०३ सप्टेंबर २०२४ रोजी या ठिकाणी रबलर स्ट्रिप तयार करून अहवाल सादर करण्याचे पत्रात सांगितले होते.तरी ही वरिष्ठ अधिकारी पत्रव्यवहार करूनही कनिष्ठ अधिकारी काम करीत नसतील तर संबंधित तक्रार कोणाकडे करायची हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**- सहदेव नावडे, पालक**

## न्यूनगंड बाजूला ठेवून वास्तव आयुष्याला भिडा : प्रा. डॉ. चौधरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ फेब्रुवारी-**

प्रचंड क्षमता आणि कष्ट करण्याची वृत्ती अंगी असतानाही केवळ न्यूनगंड बाळगल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी यशापासून दूर राहतात. त्यामुळे युवक युवतींनो न्यूनगंड बाजूला ठेवून वास्तव आयुष्याला भिडा. अंधश्रद्धा न बाळगता प्रयत्नवादाची कास धरा. वाचन, चिंतन आणि सूक्ष्म निरीक्षणाने सद्सद् विवेक वाढीस लागतो म्हणून पुस्तकांशी मैत्री करा, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. संजय चौधरी यांनी केले.




पोथरे (ता. करमाळा) येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये सक्षम भारतासाठी युवकांचे योगदान या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानामध्ये ते बोलत होते. यावेळी सरपंच अंकुश शिंदे अध्यस्थानी होते.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील आपल्या विद्यार्थी जीवनातील अनेक रंजक आठवणींना उजाळा देवून प्रा. चौधरी यांनी विद्यार्थी विद्यार्थीनींचे प्रबोधन केले. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवायोजना विभागाचे प्रभारी प्रकल्प अधिकारी डॉ. अभिमन्यू माने यांनी प्रास्तविक करून डॉ. संजय चौधरी यांचा परिचय करून दिला. सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रा.सुधीर मुळीक व प्रा. कृष्णा कांबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर प्रा. विजया गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. डॉ. उत्तम विटूकडे, प्रा. ऋषी माने, प्रा. दीपक सोनवणे व प्रा. नागसेन ढावरे यांनी परिश्रम घेतले.

## शाह कन्या प्रशालेत माजी विद्यार्थिनींचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

माहेर ग्रुपच्यावतीने सौ. हि. ने. न. शाह कन्या प्रशालेमध्ये गुरुवारी स्नेहबंध मेळावा साजरा करण्यात आला. साठ वर्षांनी या सर्व माजी विद्यार्थीनी गोडबोले यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आल्या व त्यांनी प्रशालेस एक लाखाची रोख रक्कम देणगी स्वरुपात दिली.



संस्था सचिव चिन्मय वालवडकर यांनी प्रास्ताविक केले. अनेक माजी विद्यार्थिनींनी आपल्या शाळेतील स्मृतींना उजाळा दिला. आशा जोशी, छाया गंगावणे, शोभा घोरपडे, सुषमा नारकर, विजया जहागीरदार, लीला डागळे, मालती पवार चंदा पवार यांनी मनोगत व्यक्त केले तर शुभांगी काळे, सुमन पानगावकर, मृणाल कुलकर्णी, शोभा रणशूर, विजया देशपांडे यांनी स्वरचित कविता केल्या. मीरा हातोळकर यांच्या भारुडाने व लावणीने कार्यक्रमाला रंगत आली. अनेकजणांनी शाळेविषयीची कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास संस्थेच्या संचालिका हेमाभाभी देसाई, क्रीशा देसाई, मुख्याध्यापिका जोशी मॅडम, माहेर ग्रुपचे प्रणेते गोडबोले सर, काटकर, वैशाली टिळक, राजेंद्र शेटे, अनंत कुलकर्णी इत्यादी गुरुवर्य उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी मंदाताई वैद्य, मंगलताई काळे, आशा जोशी, उज्वला जोशी, मृणाल कुलकर्णी, जयश्री काळे व गोडबोले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आयुब शेख, ऋजुता हातोळकर यांनी तर आभार उज्वला जोशी यांनी मानले.

## डॉ. पल्लोलू यांच्या फेरनियुक्तीसाठी आ. कोठेंचे आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वाय. एच. पल्लोलु यांना सेवेत फेरनियुक्ती देण्याबरोबरच श्री. जांबमुनी प्रशालेला नियोजित जागा हस्तांतरणसाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांना आ. देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवेदन दिले. याबाबत आ. कोठे यांनीही विभागीय आयुक्तांकडे शिफारसही केली आहे.

या शिष्टमंडळात श्री. जांबमुनी मोवी समाजाचे अध्यक्ष करेपा जंगम, माजी सेक्रेटरी रवी नायक म्हेत्रे, मोहन जंगम, जांबमुनी प्रशालेचे चेअरमन शंकर परूल यांचा समावेश होता. डॉ. वाय. एच. डॉ पल्लोलू हे कोरोना महामारी पूर्वी वैद्यकीय अधिकारी म्हणून ३ फेब्रुवारी २०१४ सालापासून सेवेत कार्यरत असताना प्रमाणिकपणे ८ वर्षे सेवा दिली आहे. सेवेत कार्यरत असताना कोरोना संसर्गाच्या तीन लाटेत उत्तम प्रकारे काम काज पार पाडले आहे. मुद्रा सनसिटी नागरिक आरोग्य केंद्राचे कामकाज जागतिक आरोग्य संघटनेचे प्रशिक्षण घेऊन नियमानुसार पहिल्या लाटेत पार पाडले आहे. असे असताना विनाकारण त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेरील कोरोनाचे चुकीचे व असंबधित एकाच कारणाने २३ ऑक्टोबर २०२० रोजी पहिली कारवाई केली. त्यानंतर कारण हे चुकीचे व नियमबाहय असल्याचे मनपा सभागृहात सिध्द झाल्यानंतर १६ मार्च २०२१ रोजी वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लोलू यांना मनपा प्रशासनाने फेर नियुक्ती दिली. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी कोरोना महामारीचे दुसऱ्या व तिसऱ्या लाटाचे कामकाज उत्तमरित्या पार पाडले आहे. असे असताना काहीही नोटीस, पूर्वसूचना न देता मनपा प्रशासनाने १२ मार्च २०२२ रोजी दुसऱ्यांदा एकाच कारणाने अन्यायकारक कारवाई केली. डॉ. पल्लोलू यांच्यावर अन्याय झाल्याची बाब आ. कोठे यांनी पुणे विभागीय आयुक्तांसमोर मांडली. यावेळी डॉ. पल्लोलू यांना पुन्हा सेवेत फेरनियुक्तीचे आदेश देऊन लवकरात लवकर न्याय देण्यात येईल, असे सांगितले. श्री. जांबमुनी प्रशालेला जागा हस्तांतरण प्रक्रियेचे पुणे विभागाचे प्रक्रिया पूर्ण करून महाराष्ट्र शासन मुंबईकडे पाठवण्यात येईल, असे म्हणाले.





## तीर्थ येथील श्री रामलिंगेश्वर प्रशालेत शहिदांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी श्रेणी पोलीस उपनिरीक्षक धनसिंग राठोड, हवालदार रेड्डी, प्रा.सुधीर सोनकवडे, शिल्पा महिंद्रकर, नागराज पाटील, सिद्धेश्वर बिराजदार, सिद्धाराम पाटील, अमर पाटील, शांतप्पा बगले, राजकुमार देडे, गुरुशांत बिराजदार उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यांनी तर आभार प्रा.रेवणय्या मठपती यांनी मानले.

# वन विभागात करिअरची चांगली संधी : माणिक भोसले

### वन विभागातील करिअर विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ फेब्रुवारी-**

डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय व सांगोला महाविद्यालय, वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात वन विभागातील विविध पदांवर कशा पद्धतीने अभ्यास करून, परीक्षा देऊन जाता येऊ शकते याविषयीचे सखोल मार्गदर्शन रिटायर्ड डीसीएफ माणिक भोसले यांनी केले.



यावेळी प्राचार्य डॉ. मुलाणी यांनी मनोगतात ध्येय निश्चित करून, नियोजन पूर्वक पाठपुरावा केल्यास यशाच्या जवळ पोहोचता येते असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख सिनेटर डॉ.राजेंद्र सुर्यवंशी यांनी तर सूत्रसंचालन सिनेटर डॉ. सीमा गायकवाड यांनी केले. आभार प्रा. मारुती हाके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा.पल्लवी कदम, सांगोला महाविद्यालयाचे डॉ. आर. आर. टेंभुर्णे, प्रा. रोहित पवार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश जांगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

वन म्हणजे जीवन. समृद्ध जंगले असतील तरच जीवन सुकर होऊ शकते. भूभागाच्या किमान ३३ टक्के जंगल असणे अपेक्षित असते. पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेली अनेक प्रकारची वने, यामध्ये करिअर करण्याच्या विविध संधी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

**- माणिक भोसले,**
रिटायर्ड डीसीएफ, महाराष्ट्र शासन

CMYK
धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## इमारतीचे बांधकाम पुर्ण; रूग्णालय बनले शोभेची वस्तू

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ फेब्रुवारी -**
तालुक्यातील काक्रंबा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र चालू करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना शिवसेना (उद्धव ठाकरे गट) सोशल मीडियाचे तालुकाप्रमुख चेतन बंडगर यांनी दि.१४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी दिले आहे.



काक्रंबा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून सुध्दा रुग्णांच्या सेवेसाठी अद्याप चालू करण्यात न आल्यामुळे त्या भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे.

त्यामुळे सदरील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तात्काळ चालू करुन देण्याची मागणी सदरील निवेदनातून केली आहे यावेळी राम थोरात रोहिदास म्हेत्रे यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...



### अनुराग जगताप यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१४ फेब्रुवारी -**
पुरंदर सासवडचे माजी आमदार संजय जगताप यांचे पुतणे अनुराग जगताप यांनी सहकुटूंब सह परिवारांनी आई तुळजाभवानीची विधिवत पूजा केली. पूजेनंतर मंदिर प्रशासकीय कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गवळी, पुजारी शुभम क्षीरसागर, दिनेश कापसे, प्रविण जाधव, रिटायर फौजी प्रतिक गायकवाड हे उपस्थित होते.



### सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न

**लोहारा, दि.१४ फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील भातागळी येथील जिल्हा परिषद या शाळेमध्ये एसपीसी योजना अंतर्गत पोलिस अधिक्षक संजय जाधव व अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांचे मार्गदर्शना खाली शालेय विद्यार्थ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळामध्ये विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र पोलिस दल, ई-सुरक्षेचा परिचय आणि विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा या विषयांवर ईकबाल सय्यद पोलिस उपनिरीक्षक यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, गुड टच बॅड टचचे प्रशिक्षण पो. नाईक आतीश सारफळे यांनी दिले. शाळेचे एसपीसी नोडल मुख्याध्यापक गायकवाड व शिक्षक वृंद तसेच सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक रवि जगताप सह आदी उपस्थित होते.

### जाणीव संघटनेच्या वतीने बाल मेळावे

**वाशी, दि.१४ फेब्रुवारी -**
सरमकुंडी, तांदळवाडी जाणीव संघटनेचे बाल मेळावे जाणीव संघटनेच्या वतीने वाशी तालुक्यातील सरमकुंडी, तांदळवाडी या ठिकाणी बाल आनंद मेळावे घेण्यात आले. यामधून २५० ते ३०० मुलांपर्यंत हा कार्यक्रम राबवण्यात आला. यामध्ये विविध स्पर्धा खेळ, गाणी गोष्टी, संवाद कौशल्य, वक्तृत्व कौशल्य, नेतृत्व कौशल्य यावर मार्गदर्शन करण्यात आले. मुला-मुलींमध्ये विज्ञानाचा प्रसार व्हावा त्यांचे गुणवत्ता वाढावी तसेच त्यांना व्यक्तिमत्व विकास वाढीसाठी खेळ गाणी गोष्टीतून मार्गदर्शन रामभाऊ लगाडे वंचित विकास संस्थेची पूर्णवेळ कार्यकर्ते यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक सुरवसे, रमेश दुनधव, शिंदे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी मुला-मुलांनी मनापासून आनंद व्यक्त केला व मनसोक्त कार्यक्रमात भाग घेतला.

### तुळजापूरसह उमरगा, लोहारा तालुक्यातील दहा हजार हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली...

# रामदाऱ्यातील कृष्णेच्या पाणी वितरणाची कामे हाती घ्या

### जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मागणीवरून आदेश...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ फेब्रुवारी -**
कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प उपसा सिंचन योजना क्रमांक २ चे एकूण सहा टप्पे आहेत. त्यातील टप्पा क्रमांक १ ते ५ घाटणे बॅरेज ते रामदरा तलाव ही कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा व लोहारा या तीन तालुक्यांना मोठा लाभ होणार आहे. या तीन तालुक्यातील एकूण १०८६२ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टप्पा क्रमांक ६ मधील कामांना प्राधान्यक्रमात मंजुरी देण्यात यावी आणि ही कामे तातडीने सुरू कारवी अशी आग्रही मागणी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केली होती. त्याला जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी हिरवा कंदील दिला असून मागणी केलेली टप्पा क्र. ६ मधील कामांच्या सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्याबाबत त्यांनी बुधवारी आदेशीत केले आहे.

त्यामुळे रामदरा ते बोरी-एकुरगा या टप्पा क्र.६ मधील पाणी वितरणाच्या कामाला आता वेग येणार असल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा कृष्णा खोरे व गोदावरी खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बुधवार १२ फेब्रुवारी रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आग्रही मागणीवरून आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. कृष्णा खोर्यात मराठवाड्याचा ९ टक्के भूभाग आहे. त्यामुळे कृष्णा खोर्यातील पाण्यावर मराठवाड्याचा न्याय्य हक्क आहे.

माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी कृष्णा खोर्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळावे यासाठी २००१ साली मंत्रिमंडळात महत्वपूर्ण निर्णयाला मंजुरी मिळवून घेतली.

हक्काच्या २३.६६ टीएमसी पाण्यापैकी ७ टीएमसी पाण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी महायुती सरकारने ११ हजार ७२६ कोटी रूपयांच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सिंदफळ येथील पंपगृहातून तुळजाभवानी देवीच्या चरणी असलेल्या रामदरा तलावात लवकरच दाखल होत आहे. रामदरा येथून हे पाणी बोरी-एकुरगा आणि तेथून बंद पाईपलाईनद्वारे तुळजापूर, लोहारा आणि उमरगा तालुक्यातील शेतशिवारात जाणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

पाणी वितरणाच्या सर्वेक्षणाचे प्राथमिक काम पूर्ण झाले होते मात्र टप्पा क्रमांक ६ मधील प्राधान्यक्रम मंजूर नसल्याने प्रत्यक्षात अंदाजपत्रकाच्या कामांना सुरुवात करता येत नव्हती.

जलसंपदा मंत्री ना. विखे पाटील यांनी आपल्या आग्रही मागणीची दखल घेऊन टप्पा क्रमांक ६ मधील कामांची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

योजनेच्या टप्पा क्र.६ मध्ये अस्तित्वात असलेल्या एकूण ८ साठवण तलाव व नव्याने बांधकाम करण्यात आलेले २ बंधारे जोड कालव्याद्वारे भरणे प्रस्तावित आहे.

याद्वारे तुळजापूर तालुक्यातील २,८७४ हेक्टर, उमरगा तालुक्यातील २,०५७ हेक्टर व लोहारा तालुक्यातील २,१४७ हेक्टर असे एकूण ७,०७८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टप्पा क्र.६ मध्ये निर्माण होणारे ७,०७८ हेक्टर सिंचन क्षेत्र हे उपसा सिंचन योजना क्र.२ च्या एकूण प्रकल्पिय १०,८६२ हेक्टर सिंचन क्षेत्राच्या ६५ टक्के इतके आहे. या टप्प्यात १ पंपगृह, उर्ध्वगामी नलिका व ८५ किलोमीटर लांबीच्या बंद पाईपलाईन कामाचा समावेश आहे. शाश्वत सिंचनामुळे आता कायम पाणी उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांच्या दरडोई उत्पन्नात लक्षवेधी वाढ होवून जीवनमान उंचवण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

#### असे होणार पाण्याचे वितरण...

सिंदफळ येथील पंपगृहातून रामदरा तलावापर्यंतचा पाचवा टप्पा जवळपास पूर्ण झाला आहे. पुढील पाणी वितरणाच्या सहाव्या टप्प्यात तुळजापूर, लोहारा आणि उमरगा या तीन तालुक्यांतील साधारणतः सात हजार ५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. त्यासाठी साधारणपणे ८५ किलोमीटर लांबीची पाईपलाईन अंथरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रामदरा येथील पंपगृहातून उपसा सिंचन पध्दतीने पाणी उचलून बोरी-एकुरगा गावापर्यंत रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला नेले जाणार आहे. तेथून गुरुत्वाकर्षणाच्या माध्यमातून तुळजापूरसह लोहारा आणि उमरगा तालुक्यात पाईपलाईनद्वारे हे पाणी वाटेत येणाऱ्या आठ तलाव आणि दोन बॅरेजेसमध्ये भरून घेतले जाणार आहे. परिणामी खर्चही कमी लागणार आहे. पुढे ते बंद पाईपलाईनद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी देण्याचे प्रस्तवित आहे. त्यामुळे सिंचन क्षमतेत ४० टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे. या दहा स्टोरेज टँकची एकूण क्षमता दोन टीएमसीपेक्षा अधिक असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## श्री सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ फेब्रुवारी -**
सदगुरू श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी सामुदायिक भव्य जयंती महोत्सव नळदुर्ग शहरात शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात येणार आहे.

शनिवारी रोजी सकाळी ११ वाजता कै.वसंतराव नाईक (महामार्ग गोलाई) चौकात श्री सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर हजेरी लावणार आहेत.यावेळी ध्वजारोहण करुन प्रतिमेचे पुजन, भोगचा कार्यक्रम होईल. त्यानंतर शहरातील ऐतिहासिक किल्ला गेट येथुन बसस्थानक पर्यंत रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती नळदुर्ग येथील सदगुरु श्री सेवालाल महाराज जयंती महोत्सव समितीने दिली असुन या कार्यक्रमास समाज बांधवानी उपस्थित राहुन लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जयंती महोत्सव कार्यक्रमासाठी सदगुरू श्री संत सेवालाल महाराज जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष रवि महाराज राठोड, उपाध्यक्ष महेश चव्हाण, अकाश जाधव, सचिव बालाजी राठोड, सहसचिव सचिन राठोड, कोषाध्यक्ष दत्ता राठोड, सहकोषाध्यक्ष प्रभाकर जाधव, मिरवणूक प्रमुख कैलास चव्हाण, सचिन पवार, दिलीप राठोड, प्रवीण चव्हाण आदीनी पुढाकार घेत आहेत.

## भोत्रा सज्जाचे तलाठी गायब; नागरिकांची कामे खोळंबली

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ फेब्रुवारी -**
परंडा तालुक्यातील भोत्रा तलाठी सज्जाचे तलाठी एम.एल. कांबळे हे गेल्या एक महिन्या गावाकडे फिरकत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची काम ठप्प झाली आहेत.

यांच्यावर कारवाई करण्यात यावी. या मागणीचे निवेदन परंडा तहसीलदार यांना शुक्रवार (दि.१४ ) रिपाईचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे यांनी दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, भोत्रासाठी नियुक्त ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी एम.एल. कांबळे महिन्यापासुन सज्जावर आलेच नाहीत. भोत्रा गावामध्ये येतच नाहीत. आपली कामे बाहेरुन करत आहेत. त्यांना फोन केला असता त्यांचा मोबाइल बंद असतो. तलाठी हे ग्रामीण स्तरावरील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहे जनतेस आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. तसेच, शेतकऱ्यांशी निगडीत ई-पीक पाहणी, नुकसानीचे पंचनामे, दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती, पुनर्वसन आदी कामे करण्यासाठी तलाठी महत्त्वाचा दुवा आहे.



कांबळे यांची दप्तर तपासणी करून त्यांना तात्काळ निलंबीत करावे व भोत्रा गावातील लोकांचा त्रास दुर करावा. सदर निवेदनाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.

निवेदनावर रिपाईचे प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे, तालुकाध्यक्ष उत्तम ओव्हाळ, सोशल मीडिया आयटी सेल जिल्हाध्यक्ष आकाश बनसोडे, तालुका संपर्कप्रमुख दादासाहेब सरवदे, विलास भोसले, ता. उपाध्यक्ष जयराम साळवे, फकीर सुरवसे, भास्कर ओव्हाळ, बाबासाहेब गायकवाड, रामभाऊ गोरे, संजीवन भोसले, बबन भोसले, बापू हावळे, आजिनाथ कांबळे, बाळू रणदिवे, विजय ठोसर, धनाजी यशवद, नाना गोमासे, अण्णासाहेब भालेराव, विकास गोमासे, खंडू चाबुकस्वार, भगवान भोसले उपस्थित होते.

## नळदुर्ग-लोहगाव रस्त्याची दुरवस्था; दोन वर्षापासुन काम रखडले



### सुस्त प्रशासन व संबंधित ठेकेदाराविरुध्द ग्रामस्थांतुन तीव्र संताप...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ फेब्रुवारी -**
नळदुर्ग ते लोहगाव या रस्त्याची दुरवस्था झाली असुन वाहनचालक व प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. गेल्या दोन वर्षापासुन रस्त्याचे काम रखडल्याने प्रशासन व संबंधित ठेकेदाराविरुध्द नागरीकामधुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी लक्ष घालुन तातडीने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

या स्त्यावर पडलेल्या अस्ताव्यस्त खडीमुळे व अनेक ठिकाणी अर्धवट पुलाच्या कामामुळे रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली असुन यातुन मार्ग काढताना वाहन धारकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. लोहगाव ते नळदुर्ग या रस्त्याचे काम रेंगाळल्यामुळे या मार्गावर सातत्याने अपघात घडत आहेत.

त्याचबरोबर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे एक वर्षापासुन एसटी बस सेवा बंद असल्याने शाळकरी विद्यार्थ्यासह नागरीकांना मोठ्या गौरसोईला तोंड द्यावे लागत आहे. संबंधित ठेकेदाराने कांही ठिकाणी पुलाचे काम व रस्त्यावर खडी टाकण्याचे काम केले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुला चारी मारून साइड पट्टी वरील झाडे, झुडपे काढुन साइड पट्टी मोकळी करणे गरजेचे असताना ते काम अर्धवटच ठेवले आहे. त्यातच या अरूंद रस्त्यावर खडी, दगड, गोटे टाकण्यात आल्याने वाहतुकीस त्याचा मोठा अडथळा निर्माण होत आहे.

त्याचबरोबर बांधकामविभाग एखादा मोठा अपघात होऊन वाहनधारकांचा बळी जाण्याची वाट पहात आहे का? असा संतप्त सवालही ग्रामस्थांमधुन उपस्थित केला जात आहे.

बांधकाम विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ याची दखल घेऊन संबंधित ठेकेदारास लवकरात लवकर काम पुर्ण करण्याचे आदेश द्यावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

## शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षक परिषद कटिबद्ध : वेनुनाथ कडू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ फेब्रुवारी -**
शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू यांनी केले. दोन दिवसीय राज्य कार्यकारिणी बैठकीत ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते.

याप्रसंगी सरकार्यवाह राजकुमार बोनकिले, कोषाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, संघटनमंत्री किरण भावठाणकर, महिला आघाडी प्रमुख पुजाताई चौधरी, राज्य कार्याध्यक्ष माजी आ. नागोराव गाणार, माजी आ. भगवानराव साळुंखे, राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, गणेश पवार उपस्थित होते. बैठकीत सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, संचमान्यता, वाढीव टप्पा वेतन अनुदान, आश्वासीत प्रगती योजना, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न, मुख्याध्यापकांच्या समस्या, शिक्षकांची अशैक्षणिक कामे, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार, नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी नेमणूका, शाळांचे वेतनेत्तर अनुदान, शिक्षक संदेश मुखपत्र, संघटनात्मक वाढ व विस्तार, सदस्यता नोंदणी अभियान, कोषाध्यक्ष अहवाल, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांच्या सोबत सहविचार सभा, राज्य अभ्यासवर्ग, महिलांचा संघटनेतील सहभाग, संघटनेचे विविध उपक्रम आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व निर्णय घेण्यात आले. तसेच आगामी काळातील संघटनेची आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

याप्रसंगी अजय वानखेडे, सुभाष गोतमारे, संतोष सुरावार, मधुकर मुप्पीडवार, विनोद पांढरे, मनिषा कोलारकर, रंजना कावळे, सुधिर वारकर, सुरेश पठाडे, गुडुसाब लदाफ, राजेंद्र गुजरे, राजेंद्र वडनेरकर, शंकरराव पुंड, राजेंद्र चोथवे, अमोल काटेकर, सुरेश राठोड, यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# घाटशिळ वाहनतळ परिसरात बनावट पावत्या फाडून तुळजाभवानी मातेच्या भक्तांची लूट

### भाविकांची मात्र सुरक्षा रामभरोसे; न.प.चा कारभार जबाबदारी झटकून फक्त पैसा वसूल...

### पार्किंगचा ठेका संपल्याने पार्किंगमध्ये बनावट पार्किंग पावत्या देऊन भाविकांची लूट...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ फेब्रुवारी -**
शहरात येणाऱ्या भाविकांकडून नगरपरिषदेकडून पार्किंगसाठी पन्नास रुपये आकारण्यात येतात पण भाविकांना दिलेल्या पावतीवर पार्किंगमध्ये गाडी स्वतःच्या जबाबदारीवर लावण्याचा उल्लेख केला असून अनेक भाविक नगर परिषद पन्नास रुपये भाविकांकडून घेते पण सुरक्षा देत नाही म्हणून नगरपरिषदेच्या नावाने चांगलेच खडे फोडताना दिसत आहेत.

नगरपरिषद पार्किंगचा ठेका ७ फेब्रुवारी रोजी संपलेला असून सध्या नगरपरिषद प्रशासनाकडून स्वतः कार पार्किंग चालवली जात आहे.

ठेका संपल्यानंतर नगरपरिषदेच्या सहा कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात पावत्या फाडण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

ठेका संपल्यानंतर कार पार्किंग मध्ये अज्ञात व्यक्तींकडून भाविकांना पार्किंगची पावती देऊन नगरपरिषदेला चुना लावण्याचे काम चालू होते.




कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक यांनी प्रत्यक्षात कार पार्किंगमध्ये जाऊन पाहणी केली असता दोन व्यक्ती तुळजाई पार्किंग नावाने भाविकाकडून पैसे घेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी त्या दोन व्यक्तींना पोलिसांच्या ताब्यात दिले.

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी लाखोच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची संख्या देखील दररोज हजारोच्या घरात असते.

केवळ सहा कर्मचाऱ्यांवर संपूर्ण शहरातील नियोजन होत नसल्याने नगर परिषदेच्या वतीने समृद्धी फॅसिलिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या ३० कामगारांना कंट्रक्टी पद्धतीने पार्किंग पावत्या पडण्यासाठी घेण्यात आले असून घाटशील रोड, उद्धवराव पाटील सभागृह, हडको, अग्निशामक मैदान, आठवडा बाजार मैदान, सुरेख स्मृती रेस्ट हाऊस, १२४ भक्तनिवास परिसर या ठिकाणी शिफ्ट मध्ये ठेवण्यात आले आहे.

नगरपरिषदेने भाविकांच्या वाहनांना आणि वाहनांमधील वस्तू यांना देखील सुरक्षा द्यावी अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

# आगामी निवडणुका महायुती म्हणून लढवू : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका महायुती म्हणून लढवू असे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नांदेड येथे आयोजीत विभागीय बैठकीस ते आले असता पत्रकारांशी बोलत होते.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संदर्भात स्थानिक पातळीवर देखील निर्णय घेण्यात येणार आहे. परंतू या निवडणुका महायुती म्हणूनच लढवणार आहोत. विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले आगामी काळात देखील यश मिळणार आहे. राज्यात भारतीय जनता पार्टीचे दिड कोटी सदस्य करण्याचा संकल्प आहे. त्यामुळे हा दौरा आहे. आज झालेल्या बैठकीत १२०० कार्यकर्ते उपस्थित होते. प्रत्येक कार्यकर्त्याला ५० सदस्य करण्याचे टार्गेट देण्यात आले आहे. तर निवडणुक लढविण्याची इच्छा असणाऱ्यांना एक हजार सदस्य नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. १५ मार्च पर्यंत ४० लाख उद्दीष्ट पुर्ण करावयाचे असून सरकारचे निर्णय संघटनेमार्फत जनतेपर्यंत पोहचावयाचे आहेत. तसेच स्थानिक स्वराजय संस्थांच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांना विजयी करायचे आहे. या बाबतचा निर्णय या निवडणुका महायुती म्हणूनच लढवणार आहोत. महायुतीच्या माध्यमातूनच राज्याचा समतोल विकास करायचा आहे. विकासाबरोबरच अवैध रेती उपसा करणाऱ्या माफियांविरूध्द देखील कारवाई करण्यात येत आहे. रेतीबाबत लवकरच एक नवे धोरण राबवून दोन वर्षात रेतीचा साठा उपलब्ध कसा होईल याचे नियोजन करण्यात येत आहे. तर विभागीय आयुक्तालयाबाबतही विचार करणार असलयाचे आश्वासन यावेळी चंद्रशेशर बावनकुळे यांनी दिले. यावेळी भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे, खा. अशोक चव्हाण, कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. राजेश पवार, आ. मेघनाताई बोर्डीकर, माजी. आ. अमर राजूरकर आदीसह अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**दत्ता कोकाटे, एकनाथ पवार यांचा भाजपात प्रवेश**

शिवसेना उबाठा गटाकडुन निवडणुक लढविणारे एकनाथ पवार यांच्यासह उबाठा गटाचे सहसंपर्क प्रमुख दत्ता कोकाटे यांनी आज भाजपात प्रवेश केला. त्याच बरोबर विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केलेले दिलीप कंदकुर्ते यांनीही पुन्हा भाजपात प्रवेश केला.

# पतीने केलेल्या मारहाणीत पत्नीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १४ फेब्रुवारी**

शेतात केलेल्या कामाचे पैसे का आणली नाहीस या कारणावरुन पतीने आपल्या पत्नीच्या पोटात लाथा बूक्क्यानी मारहाण केली. या मारहाणीत पत्नीचा मृत्यू झाल्याची घटना दि.१३ फेब्रूवारी रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान घडली.

मयत संगीता काशीनाथ सूर्यवंशी वय ४० वर्ष रा.मनाठा ता.हदगाव ह.मू. प्रफूल्लनगर भोकर येथे पतीसह एक मूलगा व मूलगी हे भाड्याच्या घरात राहत होते. पती काशीनाथ सूर्यवंशी हा दि.१३ रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान पत्नी संगीता हिस तू शेतात केलेल्या कामाचे पैसे का आणली नाहीस असे म्हणत तिच्या पोटात लाथ घातली. पोटात जबर मार लागल्याने ती बेशूध्द पडली. मूलगा माधव याने आपल्या आईला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय येथे घेवून जात असताना तिचा वाटेतच मृत्यू झाला. याप्रकरणी अजय उर्फ माधव काशीनाथ सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भोकर पोलीसात आरोपी काशीनाथ सूर्यवंशी यांचेवर गून्हा दाखल करण्यात आला असून पुढिल तपास सूरु आहे. आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त

### होटलवाडी येथे लक्ष्मण शक्ती हरी किर्तन व महारुद्र भंडाऱ्याचे आयोजन

**सोनखेड-**दरवर्षी प्रमाणे याही वर्षी होटलवाडी येथे लक्ष्मण शक्ती हरिकीर्तन व महारुद्र भंडाऱ्याचे १६ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प वै.गुरुवर्य मोतीराम महाराज व वैकुंठवासी ज्ञानोबा माऊली हरसदकर यांच्या कृपा आशीर्वादाने महारुद्र कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त १६ रोजी रात्री ७ ते सकाळी ६ वाजेपर्यंत लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम होणार आहे तर १७ रोजी सकाळी १० ते १२ ह.भ.प.एकनाथ महाराज हरसदकर यांचे कीर्तन होईल व त्यानंतर लगेच महाप्रसाद होणार आहे तरी या कीर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.नारायण मामा औंढे,पांडुरंग पाटील औंढे,गोविंद औंढे,बंडू औंढे यांच्या वतीने करण्यात आली आहे.

### दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**कुंडलवाडी-**येथून जवळच असलेल्या हुनगुंदा येथील सोन्याबाई ठक्करवाड माध्यमिक विद्यालय येथे दि.१३ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्मितातार्ई ठक्करवाड मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. साईनाथ महाराज हरनाळीकर,धर्माबाद येथील शिंदे कोचिंग क्लासेसचे संचालक संभाजी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. बी. जिंकले यांनी केले.तर स्मितातार्ई ठक्करवाड मॅडम,ह.भ.प. साईनाथ महाराज हरनाळीकर,संभाजी शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.नववी व दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. बी. जिंकले, सहशिक्षक डी.एस.बोडके,सौ.एम. डी.सोमवंशी,सौ.एस.डी.देगावे,यू.व्ही.भाले,एम.एन.आकुलवार,एन. जी.लोलापोड,एस.एस.म्याकलवार,आर.एम.म्याकलोड व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन सौ.एम.डी.सोमवंशी यांनी केले. तर आभार डी.एस.बोडके यांनी मानले.

### भिमराव शिंदे यांच्याकडून उत्कृष्ट खेळाडू राजु घुले यांना ५ हजाराचे रोख बक्षिस




**लोहा-**सहारा कल्याण मंडप मैदानावर प्रिमीयर लिग क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. क्रिकेट सामन्याचे प्रेक्षक खरेदी विक्री संघाचे संचालक व माजी सरपंच भिमराव पाटील शिंदे यांच्या कडुन क्रिकेट मधील उत्कृष्ट खेळाडू राजु घुले यांना मैदानावरच पाच हाजाराचे रोख बक्षिस देऊन कौतुक केले. लोहा शहरात सहारा मैदानावर अनेक वर्षांपासून क्रिकेटचे सामने खेळवले जातात या सामन्यातुन खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्त्ये त्यामध्ये जेष्ठ व प्रतिष्ठीत व्यक्तीच्या नावे पुरस्कार व ट्राफी देऊन खेळाडुंचा मानसन्मान करुन प्रोत्साहित केले जाते.हा देण्याचा हेतु शहरात जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याची नविन तरुन खेळाडु पिढीला ओळख व्हावी म्हणून त्यांच्या नावे ट्राफी,रोख रक्कम, बक्षिसे देऊन उत्कृष्ट खेळाडूला गौरविण्यात येते.त्यामध्ये माजी उपनगराध्यक्ष सोनु संगेवार, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील पवार, आंबेडकर चळवळीत सदा अग्रेसर असनारे अनिल धुतमल,गणेश बगाडे,विजय चव्हाण , गजानन चव्हाण अविनाश पवार यांच्याकडुन आयोजन करण्यात आले आहे.

सहारा कल्याण मंडप मैदानावर सर्वात जास्त बोली लावून क्रिकेटचा सामना खेळवला जानारा वेगवान उत्कृष्ट खेळाडू प्रविण(लखन) महाबळे यांच्याकडुन सामान्याचे मराठी भाषेत समालोचन करुन खेळाडूला प्रोत्साहन देण्यात येत आहे. खेळाडु सामना खेळत आसना कोणतीच अडचण येऊन नये म्हणुन अनेकांनी कोल्ड्रिंक्स,थंड पाणी बॉटल, घाम पुसण्यासाठी नॉपकिन, प्रथमोपचार पेटी उन्हापासुन बचाव होण्यासाठी टोपी, स्वयंस्फुर्तीने मेहनत घेत आहेत.शहरात नविन खेळाडु तयार व्हावेत, मोबाईलच्या जमान्यात अनेक तरुणाना खेळाची गोडी लागावी म्हणून अनेकांनी पोस्टर बॉनरबाजी करुन क्रिकेट प्रिमियर लिंग एल.पी. एल. सामन्याची प्रसिद्ध दिली. सहारा कल्याण मंडप मैदानावर प्रिमीयर लिग एल.पी.एल २०२५ चे क्रिकेट तोरनामेंन्ट खेळवले जात आहे .या सामन्यात लोहा लॉयन्स टीम ने ड्रिम ११ या टीम वर विजय मिळवला यामध्ये राजू घुले या उत्कृष्ट खेळाडूने या सामन्यात आपले एल.पी. एल.मधे पाहिले शतक करुन (१२१) रन पटकावून मॅन ऑफ द मॅच चा मानकरी ठरला.या उत्कृष्ट खेळावर खुष होऊन भिमराव पाटील शिंदे यांनी मैदानावरच ५००० रक्कमेचे बक्षीस देऊन शुभेच्छा दिल्या.

### तळणीच्या यशात मानाचा तुरा - एकूण ६ जनांची महसूल सहाय्यक पदासाठी नियुक्ती

**नांदेड-**येथील हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षणाची वाट शोधणाऱ्या किसन मधूकर शिंदे यांची महसूल सहाय्यक पदावर नियुक्ती होणार ही वार्ता गावभर पसरली तेंव्हा गावकऱ्यांच्या तोंडून जिंकलास किसना हेच ऐकावयास मिळत आहे . किसन चे वडील म्हणायला शेतकरी मात्र खरे तर ते शेतमजूरच अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून किसन ने हे यश संपादन केल्याने परीसरात किसनचे सर्वत्र कौतूक होत आहे . तळणी येथील सेवा निवृत्त सैनिक दिनेश गंगाराम चौरे यांचीही महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. तळणीचे भूमीपुत्र दिनेश चौरे यांनी राज्य सेवा आयोगाच्या महसूल सहाय्यक पदाला गवसणी घातली आहे . त्यांच्या जीवनातील ही पाचवी भरती असून या पुर्वी त्यांनी नांदेड पोलीस, लिपीक सातारा , ग्राम विकास अधिकारी यवतमाळ 'ग्राम महसुल अधिकारी नांदेड अशा पदावर पात्रता मिळवली असतांनाही एवढयावरच न थांबता त्यांचा शैक्षाणिक प्रवास अविरतपणे सुरूच होता . त्यांनी नुकत्याच झालेल्या राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून महसुल सहाय्यक पद मिळविले . तळणी सह परीसरातील नवतरूणांना मार्गदर्शन करण्याच्या हेतूने त्यांनी तळणी येथे गत काही काळापासून प्रशिक्षण केंद्राची सुरुवात केली आहे.

# माता रमाई आंबेडकर परिषदेनिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार चारिटेबल ट्रस्ट सुभेदार रामजी आंबेडकर नगर वाघाळा हाडको येथे माता रमाई आंबेडकर परिषदे निमित्त व आम्रपाली महिला मंडळाच्या वतीने ख्यातनाम गायक प्रा. अविनाश नाईक व मयुरी नाईक यांच्या भिम गीत गायनातुन प्रबोधात्मक कार्यक्रम दि. १६ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या परिषदेचे उद्घाटन सकाळी १० वाजता भंते पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते होणार असून यावेळी खा. रवींद्र वसंतराव चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून फुले-शाहू आंबेडकर विचारांचे भाष्यकार सुरेशदादा गायकवाड हे असतील तर या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते ॲड. विजय गोणारकर यांची उपस्थिती राहणार आहे. तर या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून हनुमंत बेटमोगरेकर, मोहन हंबर्डे, फारुख अहमद, डॉ. रेखा चव्हाण, पी.एम. वाघमारे, अशोक एडके यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून डॉ. करुणा जमदाडे हे असतील. तर माता रमाई आंबेडकर परिषदेचे आकर्षण असलेले प्रा. अविनाश नाईक व मयुरी नाईक यांच्या गायनाचा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता होणार आहे. सिडको-हडको परिसरातील समाज बांधवांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष गौतम भोळे, उपाध्यक्ष अशोक ढवळे, सचिव भगवान जमदाडे यांनी केले आहे. तर हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी चंद्रकांत लांडगे, प्रभाकर कांबळे, मायाबाई सोनकांबळे, विशाखा जमदाडे, गौतम जमदाडे, शोभाबाई चावरे, कबीरदास राक्षसे, भिमराव जमदाडे हे परिश्रम घेत आहे.

# शिवसेनेच्या नांदेड शहर संघटकपदी प्रकाश दुधारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**



नांदेड उत्तर मतदारसंघात मागासवर्गीय सेलचे जिल्हाप्रम ख मंगेश कदम यांनी शहर संघटकपदी प्रकाश दुधारे बांची नियुक्ती केली आहे. शिवसनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर. संपर्कप्रमुख आनंद जाधव यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विभाग मुख्य समन्वयक राम पांडागळे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांच्या सुचनेनुसार दुधारे यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणात हदगाव येथे नियोजनाचा अभाव

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १४ फेब्रुवारी**

हदगाव येथे तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० हे मंगळवारपासून २५० जणांचे येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेत सुरू करण्यात आले परंतु सदरील प्रशिक्षणात अनेक गैरसोयीचा सामना संबंधित शिक्षकांना करावा लागला असून प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या नियोजन शून्य कार्य प्रणालींवर अनेक प्रशिक्षणार्थींनी रोष व्यक्त केला.

याच प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थ्याला प्रशिक्षणाचे साहित्य पुस्तक, वही, पेन, कागद हे साहित्य पहिल्या दिवशी देण्यात आले नाही. प्रशिक्षणार्थ्यांनी बसण्यासाठी खुर्ची, पंखी, महिलांसाठी स्वच्छ बाथरूमची व्यवस्था नाही असा अनेक समस्यां असल्याल्या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण प्रमुख म्हणून कोणाचीही नेमणूक करण्यात आली नाही. सर्व कारभार आपल्याच हातात व आपल्याच मर्जीतील लोकांना प्रशिक्षणाची कामे तसेच जेवणाचे टेंडर सुद्धा देण्यात आले. जेवनाचे टेंडर कागदोपत्री जास्त दराने व प्रत्यक्षात ठेकेदाराला कमी दराने दिल्याने दर्जेदार जेवण नसल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रशिक्षणार्थ्यांना दररोज ५०० रुपयाची कागद कार्यशाळेसाठी खर्च केला जातो असे गटशिक्षणाधिकारी सांगतात मात्र प्रशिक्षणार्थींची चौकशी केली असता आम्हाला पहिल्या दिवशी वही, पेन , पुस्तक व इतर साहित्य द्यावयास पाहिजे होते परंतु ते देण्यात आली नाही चौथ्या दिवशी ते पुस्तक आम्हाला देण्यात आले.

प्रशिक्षणार्थींना ये - जा व भत्ता देण्याची तरतूद आहे परंतु कोणालाही भत्ता किंवा खर्च देण्यात आला नाही तर मागील वर्षीचे देखील भत्ता देण्यात आला नसल्याचे त्यावेळी सांगण्यात आले. या प्रशिक्षण साठी सर्व सुविधा असलेलं हॉल, खुर्ची, पंखे, स्वच्छ बाथरूम असलेल्या ठिकाणी घेण्यास पाहिजे होते परंतु गटशिक्षण अधिकारी यांनी लाईट मोफत, हॉल मोफत, अशा प्रकारच्या जिल्हा परिषदचा हायस्कूलचा हॉल घेऊन सर्वांना अस असुविधेचा त्रास सहन करावा लागला. दिनांक १७ पासून शहरात दुसरे प्रशिक्षण सुरू होणार आहे शहरात सर्व सुविधेचे हॉल असताना देखील स्वतःच्या फायद्यासाठी प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी हदगाव बस स्थानकापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतर दूर, सर्वांसाठी गैरसोयीचे परंतु मोफत मध्ये हॉल, लाईट, पंखे असलेली औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथे हे प्रशिक्षण ठेवण्यात आले. हे केंद्र किती जणांना अडचणीचे ठरणार आहे त्यामुळे येथे प्रशिक्षण न घेता शहरात घेण्यात यावे अशी मागणी शिक्षकाकडून करण्यात येत आहे.

# बेलमंडळ येथील शोळेची इमारत मोडकळीस

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

कळमनुरी तालूक्यातील बेलमंडळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दुरावस्था झाली असुन इमारत मोडकळीस आली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापुर्वी या शोळेची दुरूस्ती करावी अशी मागणी दिनेश मुधोळकर यांनी केली आहे.

कळमनुरी तालूक्यातील बेलमंडळ येथे जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असुन या शाळेत गावातील चिमुकले मुले शिक्षण घेतात. परंतू सध्या स्थितीत ही इमारत मोडकळीस आली असून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. शाळेची इमारत मोडकळी आली असताना देखील, ग्राम पंचायतचे याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यातच शाळेतील शौचालय देखील बंद पडले असल्यामुळे विद्यार्थांसह शिक्षकांना अडचण निर्माण होत असुन ग्राम पंचायतने शाळेची दुरूस्ती करावी, शाळेतील शौचालय दुरूस्त करावे अशी मागणी दिनेश मुधोळकर यांनी केली आहे.



आली असून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. शाळैची इमारत मोडकळी आली असताना देखील, ग्राम पंचायतचे याकडे दुर्लक्ष होत आह तयातच शाळेतील शौचालय देखील बंद पडले असल्यामुळे विद्यार्थांसह शिक्षकांना अडचण निर्माण होत असून ग्राम पंचायत३ने शाळे.ची दुरूस्ती करावी, शाळेतील शौचालय दुरूस्त करावे अशी मागणी दिनेश मूधोळकर यांनी केली आहे.

# कंधार येथील उप जिल्हा रुग्णालयातील ६९ पदांना मान्यता : आ.चिखलीकर यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

लोहा विधानसभेचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्याने कंधार शहरात नव्याने १०० खाटांचे बांधण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालय येथील ६९ पदांना मान्यता मिळाली आहे. पद मान्यतेसाठी आ. चिखलीकर यांनी शासन दरबारी यशस्वी पाठपुरावा केला आहे.



कंधार तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता. यामुळे कंधार येथे नव्याने उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले. रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आल्याने याठिकाणी पद स्थापना करण्याची विनंती आ. चिखलीकर यांनी शासनाकडे केली होती. या मागणीला यश आले असून ६९ पदांना मान्यता मिळाली आहे. झालेल्या पदांमध्ये वैद्यकीय अधिकारी शस्त्रक्रिया, वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र), बधिरीकरण तज्ञ, वैद्यकीय अधिकारी (भीषक), वैद्यकीय अधिकारी बालरोग तज्ञ, वैद्यकीय अधिकारी अस्थिव्यंग, वैद्यकीय अधिकारी नेत्र शल्यचिकित्सा, वैद्यकीय अधिकारी अपघात कक्ष, वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक सेविका, परिसेविका, प्रशासकीय अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, अधिपरिचारिका, दंत सहाय्यक आदींची 'अ' मध्ये तर आधीपरिचारिका, भौतिकोपचारक, आहार तज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष- किरण तंत्रज्ञ, ई.सी.जी. तंत्रज्ञ, औषध निर्माता, प्रयोगशाळा सहाय्यक, बाह्यरुग्ण लिपिक आदी पदेही बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात येणार आहेत.

# शेतकरी किसान कार्ड नोंदणीत राज्य सरकारचा नवा नियम ठरला त्रासदायक

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १४ फेब्रुवारी**

धर्माबाद तालुक्यातील शेतकरी बांधवांनी शेतामधील काम सोडून सीएससी सेंटरवर जाऊन शेतकरी किसान कार्ड नोंदणीसाठी असंख्य शेतकऱ्यांची नोंदणीमध्ये ऑनलाइन गाव, तालुका, फोटो,पुर्ण रित्या नोंदणी यशस्वी होत नसल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. शेतकरी घरच, शेतातील सर्व कामे सोडुन तरी पण ऑनलाईन किसान कार्ड नोंदणी अपुर्ण राहत असल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहे

**शेतकऱ्यांची धावाधाव**

केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत राज्य शासनाने नुकताच सर्व शेतकऱ्यांना युनिक फार्मर आयडी तयार करण्याचे आदेश दिले आहे. शेतकऱ्यांसाठी नोंदणी क्रमांक आणि पूर्वीचा ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. ज्यामध्ये शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार लिंक करावे लागणार आहे. धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि ओळखपत्र तयार करण्यासाठी धावाधाव सुरु झाली आहे. नोंदणीसाठी शेतकरी सीएससी केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी उसळलेली दिसून येत आहे.

**नोंदणीसाठी मनस्ताप**

शासनाच्या आदेशामुळे मागील काही दिवसांपासून शेतकरी फार्मर आयडी तयार करण्यासाठी सीएससी केंद्रावर धाव घेताना दिसून येत आहेत. ग्रामीण भागात सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकरी धर्माबाद शहरात येऊन ओळखपत्र तयार करीत आहेत. यात त्यांना शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

# गोदावरी अर्बन राष्ट्रीय बँकीग एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करत शहरी व ग्रामीण भागातील ग्राहकांना अत्यंत सुलभ सेवा प्रदान करण्याचे उल्लेखनीय कार्य करीत असल्याची दखल केंद्रीय स्तरावर घेत गोदावरी अर्बनला राष्ट्रीय बँकिंग एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिपक वर्मा यांच्या हस्ते गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कारबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील व अध्यक्ष राजश्री पाटील यांनी केंद्रीय लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे आभार मानले.

# घरकुल लाभधारकांनी विकास कर भरावा उर्वरित रकमेचा लाभ घ्या : लाळगे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १४ फेब्रुवारी**

पंतप्रधान घरकुल आवास योजनेतील लाभधारकांनी विकास कराचा भरणा करावा उर्वरित बाकी रक्कमेच्या हाप्तत्याचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी केले आहे.

लोहा शहरात केंद्र शासन व राज्यशासनाकडुन शहरी भागात पंतप्रधान आवास घरकुल योजना राबवली जात आहे. ज्या कुटुंबाला पक्के घर नाही, अशा बेघर कुटुंबाला त्यांच्याच जागेत पक्के घर बांधुन देण्याचा केंद्र व राज्य सरकारचा संकल्प आहे. ज्या लाभधारकांनी घरकुलाचा लाभ घेतला आहे. अशा घरकुल लाभधारकांनी नगर परिषद कार्यालयातील पंतप्रधान आवास योजना विभाग प्रमुख यांना भेटुन जियो ट्याग करु घ्यावे व कराचा भरणा करावा असे आवाहन नगर परिषद कार्यालया पंतप्रधान आवास योजना विभाग प्रमुख यांनी केले.शहरात सहा वर्षात तीन डीपीअर मंजुर होऊन १ हजार ९९२ घरकुल मंजुर झाले या मध्ये स.न १९९७ -९८ या वर्षात ७४६ घरकुल मंजुर झाले,स.न. १९२१-२२ या वर्षात ९५० घरकुल मंजूर झाले ,स.न १९२३-२४ या वर्षात २९६ घरकुल मंजुर झाले आहेत या पैकी ५० टक्के लाभधारकांनी बांधकाम केले आहे. बाकीच्या लाभधारकाना अनेक अडचणी येत आहेत अशांनी घरकुलाचे सुरु करावे हप्त्यासाठी कोणतीच अडचण येणार नाही शासन स्थरावरुन कोणतीच अडचण नाही. नगर परिषद लोहा या कार्यालयाला निधी उपलब्ध झाला आहे. कोणाच्याही घराचे हाप्ते बाकी राहाणार नाहीत, ज्यांनी जिओट्याग व विकास कराचा भरणा केला आशा लाभधारकाचे हाप्ते टाकण्याचे काम सुरू केले असल्याचे योवळी सांगण्यात आले.

# किनवट मतदार संघातील विजेसंबंधी निधी एनएससी योजनेतून द्यावा : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १४ फेब्रुवारी**

किनवट माहूर तालुक्यातील विजेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विजेसंबंधी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने एनएससी ( न्यू सर्व्हिस कनेक्शन ) योजनेअंतर्गत ५०० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी किनवट माहूर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र देऊन केली आहे.



आमदार केराम यांनी पत्रात नमूद केले की किनवट विधानसभा मतदारसंघातील किनवट व माहूर हे तालुके भौगोलिक दृष्ट्या विस्ताराने मोठे आहेत. येथील बहुतांश जनता ही खेड्यापाड्यात व डोंगराळ भागात वास्तव्यास आहे. वाढती लोकसंख्या आणि विजेचा वापर लक्षात घेता दोन्ही तालुक्यात अपुऱ्या विद्युत सोयी-सुविधेमुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे तर बहुतांश ठिकाणी कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्यामुळे तांत्रिक बिघाडी निर्माण होऊन तासंतास विज गुल होत आहे. सद्यस्थितीत बहुतेक गावामध्ये उपलब्ध रोहित्रावरीलभार शिल्लक नसल्यामुळे नवीन वीजजोडणी देणे करिता देखील अडचणी येत आहेत शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना मुबलक प्रमाणात व सुरळीत वीजपुरवठा होत नसल्यामुळे रब्बी व उन्हाळी पिके घेणे शेतकऱ्यांना अवघड बनले आहे. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातून वीजपुरवठा संबंधाने सातत्याने वारंवार तक्रारी येत असल्यामुळे माझ्या मतदारसंघातील किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील विजेच्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच अतिरिक्त रोहित उभारणी करणे, वाडीवस्तीमध्ये नवीन रोहित्र लघुदाब वाहिनी उभारणी करणे करिता एनएससी ( नवीन सेवा जोडणी)योजनेअंतर्गत ५०० लक्ष रुपये निधी मंजूर करून तात्काळ निधीचे वितरण करावे अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रातून केली आहे.

# उमरज येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ फेब्रुवारी**

धाकटे पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या कंधार तालूक्यातील उमरज येथे दि. २७ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली.

या धार्मिक कार्यक्रमास भागवताचार्य देवकीनंदन ठाकूर, शंकराचार्य यांची उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या उपस्थितीत कलशारोहण सोहळा होणार आहे. तर दि. २८ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. आठवडाभर चालणाऱ्या या कार्यक्रमात दररोज १ लाख भावीक उपस्थित राहणार असल्याचेही आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले. यावेळी संत एकनाथ महाराज उमरजकर यांची उपस्थिती होती.

CMYK

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## येडोळा शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१४ फेब्रुवारी -**

जि.प.प्रा. शाळा येडोळा, (ता. तुळजापूर) येथे बाल आनंद बाजार मेळावा आयोजित करण्यात आला होता.

प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व फीत कापून या बाजार मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

त्यानंतर बाजार मेळाव्यास सुरुवात झाली. मेळाव्यात एकूण २० स्टॉल उभारण्यात आले होते.

त्यामध्ये भाजीपाला, वडापाव, भेळ, पाणीपुरी, पोहे, भजी, मोदक, पुरीभाजी, धपाटे, खारे फुटाणे, ज्यूस, जादूचे व विविध गमती जमतीचे खेळ मांडण्यात आले होते.

हिशोब, नफा-तोटा, बाजारातील देवाणघेवाणीचे व्यवहार ज्ञान, त्याचे प्रत्यक्ष अनुभव मुलांना यावे.

या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर मेळाव्यास ग्रामस्थ, अंगणवाडी ताई व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक भरत महाबोले व प्रतिभा स्वामी, अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती शितल लोंढे, शोभा जाधव यांनी परिश्रम घेतले.



▶▶ परराज्यात वाहून जाणारे पाणी तावरजा प्रकल्पात वळवावे... ▶▶ प्रस्ताव शासनाकडे दाखल करावा...

# बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता द्यावी

▶▶ **आ. अभिमन्यू पवार यांची जलसंपदा मंत्र्यांकडे मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ फेब्रुवारी -**

मंजूर करण्यात आलेल्या निम्न तेरणा प्रकल्पअंतर्गत बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेचे सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रक मार्च २०२५ पूर्वी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करावे. या सुधारित अंदाजपत्रकाला १५ एप्रिल, २०२५ पूर्वी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी. लातूर तालुक्यातील नागझरी व परिसरातील परराज्यात वाहून जाणारे पाणी तावरजा प्रकल्पात आणण्याचा प्रकल्पाचा प्रस्ताव मार्च २०२५ पूर्वी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करावा. तावरजा नदीवरील सेलू येथील कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे नूतनीकरण काम करण्यासाठी १६ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून विशेष बाब म्हणून सदरील प्रस्तावाला मंजुरी देण्यात यावी, अशा मागण्या आमदार अभिमन्यू पवार यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्णजी विखे-पाटील यांच्याकडे केल्या आहेत.

औसा मतदारसंघातील जलसंपदा विषय मार्गी लावण्यासाठी आ. अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि.१३ रोजी मुंबई येथे बैठक पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आ. अभिमन्यू पवार यांनी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात दरवर्षी पुर येतो. या पुराचे पाणी जवळच्या कर्नाटक राज्यात जात असल्याने कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यासाठी हालचाली सुरु केल्या असून महाराष्ट्राला पुराचा धोका वाढतो. हे पुराचे पाणी माढ्यात आणण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली असून मध्यावरून तुळजापूर मार्गे तेरणा नदीपात्रात आणण्यात यावे. जेणेकरून औसा मतदारसंघासह संपूर्ण लातूर जिल्ह्याची पाणीटंचाई कायमची दूर होईल, अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली. तपासणीअंती विशेष बाब म्हणून या प्रकल्पाला मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. तसेच या बैठकीत आ. पवार यांनी माकणी निम्न तेरणा प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर गाळ साठल्याने पाणीसाठ्यात २५ टक्के पेक्षा अधिकची तूट निर्माण झाल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. माकणी निम्न तेरणा प्रकल्पात साठलेल्या गाळामुळे परराज्यात वाहून जाणारे हक्काचे पाणी तेरणा उपखोऱ्यात पुनर्स्थापित करण्यासाठी योग्य जागेची पाहणी करून अहवाल शासनास सादर करावा. अतिरिक्त भूसंपादन करण्याऐवजी प्रकल्पाची उंची वाढवता येईल का याची तपासणी करावी, अशी मागणी केली.

तेरणा नदीवरील किल्लारी-एकोंडी रस्ता, किल्लारी-एकोंडी रस्त्यावरील पूल व कोकळगाव बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील तेरणा नदीवरील कोकळगाव-कमलेवाडी रस्त्यावरील पूल बांधकाम करण्यासाठी प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करावेत. लातूर जिल्ह्यात जलसंपदा विभागाचे ४ कार्यालय आहेत. प्रशासकीय सोयीसाठी चारही कार्यालय लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर या मंडळास जोडण्यासाठी प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी सादर करावा.



प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मंजुरीची कारवाई तातडीने पूर्ण करण्यात यावी. किल्लारी भाग २ येथे स्मशानभूमी उभारण्यासाठी जलसंपदा विभागाची जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

निम्न तेरणा प्रकल्प व तावरजा प्रकल्पासह राज्यातील सर्व कालव्यांच्या बाजूचे सर्व्हिस रोड जिल्हा परिषद कडे वर्ग करण्यासाठी सचिव, ग्रामविकास विभाग यांच्यासोबत पत्रव्यवहार करावा. औसा विधानसभा मतदारसंघ १०० टक्के सिंचनाखाली आणण्यासाठी कृतीआराखडा तयार करावा.

विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना कोयना प्रकल्पातील मराठवाड्याच्या हक्काचे २५ टिएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय झाला होता, त्यानंतर प्रत्यक्षात २३.६६ टिएमसी पाणी मंजूर करण्यात आले आणि आता त्यातील केवळ ७ टिएमसी पाणी देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत असून मराठवाड्याच्या हक्काचे उर्वरित १६.६६ टिएमसी पाणी सुद्धा मराठवाड्याला देण्यात यावे, अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी केली.

कळसुबाई शिखर परिसरातील वाहून जाणारे पाणी गोदावरी खोरा मार्गे मांजरा व तेरणा खोऱ्यात आणता येईल का याची तपासणी करावी, अशी विनंती राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली.

तेरणा प्रकल्पाची व तेरणा प्रकल्पातील कालव्यांची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून मंजुरीसाठी सादर करण्यात आली असून सदरील अंदाजपत्रकांना विशेष बाब म्हणून मंजुरी प्रदान करण्यात यावी, अशी विनंती आ. अभिमन्यू पवार यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली आहे.

## आनंदवाडी (काळेगाव) ग्रामस्थांचे अखंड हरिनाम सप्ताहात रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील आनंदवाडी (काळेगाव) येथे श्री संत शेषेराव महाराज अखंड हरिनाम सप्ताह व हभप. विजयानंद महाराज सुपेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाच्या ७५ वे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन भव्य रक्तदान शिबीर, मोफत मदुमेह (शुगर) बीपी तपासणी उपचार शिबीराचे आयोजन संत भगवान बाबा युवक मंडळ यांच्या वतीने दि.१३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात ४९ रक्त दात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधीलकी दाखवुन दिली.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अहमदपूर तालुक्यातील आनंदवाडी (काळेगाव) येथील ग्रामस्थांनी श्री संत शेषेराव महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.८ फेब्रुवारीपासुन सुरवात झालेल्या सप्ताहाची सांगता दि.१५ फेब्रुवारी होणार आहे. या सप्ताहात काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीपद् भागवत कथा, गाथाभजन, हरिपाठ, किर्तन, हरिजागर असे दैनदिन धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताहाचे यावर्षी ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष तसेच हभप. विजयानंद महाराज सुपेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आपणही समाजाचे काही देणे लागतो. रक्तदान करणे हे एक श्रेष्ठदान आहे. रक्तदान करून अनेकांचे प्राण वाचवता येतात. या भावनेने दि.१३ फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबीर, मोफत मदुमेह (शुगर) बीपी तपासणी उपचार शिबीराचे आयोजन संत भगवान बाबा युवक मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. डॉ. तुकाराम नलवाड यांनी गावातील जळपास २०० ते ३०० महीला तसेच परूष यांची मदुमेह (शुगर) बीपी तपासणी करून उपचार व समुपदेशन केले. या रक्तदान शिबीरात नागरीकांनी सहभाग घेऊन ४९ रक्त दात्यांनी रक्तदान करत आध्यात्माला विज्ञानाची जोड देत सामाजिक बांधीलकी दाखवुन दिली असुन या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

रक्तदान व आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी अहमदपूर बाजार समितीचे संचालक यशवंत केंद्रे मित्रमंडळ व समस्थ आनंदवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले रक्त संकलन इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा लातुर संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर यांच्या वतीने करण्यात आले.

## माधुरी जगताप व मोहन चव्हाण यांची मुंबई पोलीस दलात निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ फेब्रुवारी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत श्री. स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय रूईभर (ता.जि. धाराशिव) महाविद्यालयाच्या दोन माजी विद्यार्थ्यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

विठ्ठलवाडी या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील माधुरी जगताप मुलीने सातत्यपूर्ण प्रयत्न करून मुंबई पोलीस पदावर यश मिळवले. महाविद्यालयातील सन २०२२ मध्ये विज्ञान शाखेची पदवी जगताप यानी प्राप्त केली. सरकारी नोकरी आणि गाव असे समीकरण झालेले चिखली गावचे मोहन चव्हाण या शेतकरी कुटुंबातील मुलांने आपल्या गावाच्या यशाची परंपरा कायम ठेवत मुंबई पोलीस पदी यश मिळवले. मोहन चव्हाण महाविद्यालयाच्या कला शाखेचे विद्यार्थी आहेत. महाविद्यालयाच्या या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अशा यशस्वी विद्यार्थ्यांची प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात यश मिळवावे, असे मत व्यक्त केले.

या सत्कार समारंभास रामदास कोळगे, रामनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, प्रा. शिल्पा चौगुले, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## उदगीरच्या पत्रकारांचा आदर्श इतरांनी घ्यावा : आ. संजय बनसोडे

▶▶ **गेल्या ४० वर्षापासूनची पत्रकारांची मागणी पूर्ण केल्याचे समाधान**

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१४ फेब्रुवारी -**

उदगीर शहरातील पत्रकार हे जागरूक पत्रकार असून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचे काम ते करत असतात. उदगीरच्या विकासात येथील पत्रकारांचेही मोलाचे योगदान असून वास्तववादी लिखाण करणारे आपले पत्रकार बांधव हे आपल्या समाजाला आरसा दाखवण्याचे काम करतात. वेळ प्रसंगी कडक भूमिका घेऊन समाजातील चांगल्या वाईट घटना प्रशासनासमोर मांडून ते सर्वसामान्यांना न्याय मिळवून देतात. एखाद्या प्रश्नासंबंधी जिद्द व चिकाटीने काम करण्याची हातोटी येथील पत्रकारांमध्ये असल्यानेच आज गेल्या ४० वर्षापासूनची असलेली पत्रकार भवनाची मागणी पूर्ण होत आहे म्हणून उदगीरच्या पत्रकारांचा आदर्श इतरांनी घ्यावा, असे मत माजी क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर येथील पत्रकार भवनाच्या भूमीपुजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, नायब तहसीलदार राजश्री भोसले, उपविभागीय अभियंता एल.डी. देवकर, श्याम डावळे, युवराज धोतरे, भरत चामले, समीर शेख, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, फय्याज शेख, शंकर रोडगे, अॅड. वर्षा कांबळे, प्रा.शिवाजी देवनाळे, पाशा मिर्झा, पृथ्वीराज पाटील, महेश बिरादार, गिरीश उप्परबावडे, शफी हाशमी, बन्सीलाल कांबळे, मोतीलाल डोईजोडे, मुकेश भालेराव, अॅड. अजिंक्य रेड्डी, अनिरूद्ध गुरुडे, इम्तियाज शेख आदी उपस्थित होते.

यावेळी पत्रकार भवन कृती समिती पदाधिकाऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकारांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून आ. संजय बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना आ. संजय बनसोडे यांनी, मागील ४ दशकापासुन पत्रकार बांधवांना हक्काची जागा उपलब्ध नव्हती म्हणून पत्रकार बांधवांची गैरसोय होत होती. मागील काळात त्यांनी माझ्याकडे मागणी करुन त्याचा सतत पाठपुरावा केला त्यामुळे त्यांना मी मंत्री असताना ४ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देवून महाराष्ट्रात एक नंबरचे पत्रकार भवन आपल्या उदगीरला उभारले जाईल, अशी ग्वाही आ. बनसोडे यांनी दिली.



उदगीरच्या विकासात येथील पत्रकारांचेही योगदान असुन पत्रकार हा समाजाचा आरसा असल्याचे सांगितले.

या ती मजली पत्रकार भवनमध्ये एक कॉन्फरन्स हॉल, गेस्ट हाऊस, आदींचा समावेश असुन पत्रकार बांधवांच्या हक्काची ती जागा असेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन शिवशेट्टे यांनी केले. मनोगत विनायक चाकुरे, सुनिल हावा, प्रभुदास गायकवाड, यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बिभीषण मद्देवाड यांनी केले तर आभार अशोक कांबळे यांनी मानले. यावेळी उदगीर येथील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑबीट-प्रायमरी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

▶▶ **वरिष्ठ पत्रकार म.मुस्लिम कबीर इब्राहिमसाब सरगुरु जीवनगौरव पुरस्कार प्रदान...**



**पुरस्कार प्रदान...**

संस्थेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार म. मुस्लिम कबीर यांना इब्राहिमसाब सरगुरु जीवनगौरव पुरस्कार तर समाज सेवक सय्यद मुज़फ्फर अली ईनामदार यांना राहत खिदमत-ए-खल्क पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ फेब्रुवारी -**

येथील ऑबीट-प्रायमरी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न झाला. शाळेच्या मुख्याध्यापिका शेख अंजमुनेहा इकबाल यांनी प्रास्ताविक करुन संस्थेच्या तथा शाळेच्या उपक्रमाबाबत माहिती दिली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रफीक सिराजी यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोदकुमार धुमाळ, प्रदेशकाँगेसचे सचिव अमर खानापुरे, शहराध्यक्ष अज़हर हाशमी, आरोग्य अधिकारी डॉ. आर.आर. शेख, काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष शेख शकीलभाई शेख, संस्था अध्यक्ष अलहाज शेख, आर.एम.गुरुजी, एमआयएम नेतेमुजफ्फर अली इनामदार, हिमायत पटेल आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा संस्थेच्या वतीने शाल व कुंडी-रोपटे देऊन स्वागत करण्यात आले.त्यानंतर मौलाना रफीक सिराजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, एवढया लहान वयात एवढं चांगलं कलाविष्कार हया लहान लेकरांनी केलं हे खरंच खूप कौतुकास्पद आहे. त्यानंतर अमर खानापुरे, मौलाना रफीकसिराजी, डॉ.आर.आर. शेख यांनीही मनोगत व्यक्त करताना हे स्नेहसंमेलनात सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांवर मूळ संस्कार हे प्राथमिक शिक्षकच करतात. आपल्या मुलांना मोबाईल व बाहय खाद्यपदार्थापासून दूर ठेवण्याचा संदेश ही मान्यवरांनी पालकांना दिला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. नजीर शेख यांनी केले तर आभार डॉ. शोएब शेख यांनी मानले.

# चाकूर नगरपंचायत सभापतीच्या बिनविरोध निवडी जाहीर; सभापती निवडीत राष्ट्रवादीचे वर्चस्व



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ फेब्रुवारी -**

चाकूर नगरपंचायत विषय समिती सभापतीपदांची निवड प्रक्रीया उपविभागीय अधिकारी तथा पीठासन अधिकारी मंजूषा लटपटे तथा नगरपंचायत मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला नगराध्यक्ष कपील माकणे उपस्थित होते. यामध्ये सभापतीच्या निवडीसाठी चाकूर नगरपंचायत सभागृहात विषय समितीच्या निवडीसाठी चार जागासाठी प्रत्येकी एक अर्ज आल्यामुळे पाणी पुरवठा, महिला व बालकल्याण, स्वच्छता व आरोग्य, नियोजन व विकास या समितीच्या निवडी बिनविरोध पार पडल्या. प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी पिठासीन अधिकारी यांनी करुन सर्व नामनिर्देशन पत्र छाननी अंती वैध असल्याचे पिठासीन अधिकारी मंजुषा लटपटे यांनी सांगितले. यानंतर पिठासीन अधिकारी मंजुषा लटपटे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दुपारी १२.३० ते १२.४५ पर्यंत वेळ दिला. मुदतीमध्ये कोणत्याही उमेदवाराने उमेदवारी मागे घेतली नाही.

त्यामुळे आरोग्य व स्वच्छता समिती, पाणी पुरवठा समिती, नियोजन व विकास समिती आणि महिला व बालकल्याण समिती करिता प्रत्येकी एक अर्ज आल्याने सदस्यांची निवड बिनविरोध करण्यात आली. प्रत्येकी एकच वैध नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यामुळे त्या समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याचे पिठसिन अधिकारी व उपविभागीय अधिकारी मंजूषा लटपटे यांनी जाहीर केले. सभापतीच्या निवडी बिनविरोध झाल्या.

विषय समितीच्या सभापतीची निवड पिठासन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मंजूषा लटपटे यांनी घोषित केले. स्थायी समितीच्या सदस्य संख्या ६ आहे. नगर पंचायतीचे अध्यक्ष हे स्थायी

समितीचे पदसिद्ध सभापती असल्याने व ५ विषय समितीचे सभापती हे स्थायी समितीचे सदस्य असल्याने स्थायी समितीचे एकूण सदस्य संख्या ६ होते.

त्याप्रमाणे स्थायी समितीच्या सदस्याचे नावे खालील प्रमाणे असल्याचे सभागृहात जाहीर करण्यात आले.

नियोजन व विकास समिती सभापती बिराजदार अरविंद दिगंबर, सार्वजनिक बांधकाम समिती सभापती सय्यद मुजम्मील मुस्तफा, स्वच्छता व आरोग्य सामिती सय्यद शाहीनबानू महमंद, महिला व बालकल्याण समिती कसबे शुभांगी रामेश्वर, पाणी पुरवठा समिती पाटील गोदावरी राजकुमार याची निवड झाली. नुतन सभापतीचा महाविकास आघाडीचे गटनेते करीम गुळवे यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

सभापती पदाच्या निवडी जाहीर होताच फटाक्यांची अतिषबाजी आणि बड लावून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

▶▶ **नुतन सभापतीचा सत्कार...**

नगरपंचात चाकूरच्या विषय समितीच्या सभापतीच्या निवडी जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यांचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सर्वच नुतन सभापतीचा शाल, हार, श्रीफळ, देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व चाकुर नगरपंचायतीला विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यांचे आश्वासन दिले.

महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक व प्रहार जनशक्ति पार्टी, भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक सभापती निवडीच्या वेळी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष कपील माकणे, उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार, गटनेते करीम गुळवे, नगरसेवक विलास पाटील, मिलिंद महालिंगे, नगरसेवक भागवत फुले, नगरसेवक नितीन रेड्डी, साईप्रसाद हिप्पाळे, हिरकनबाई लाटे, सय्यद शबाना, कांबळे वैशाली, ज्योती स्वामी, गंगुबाई गोलावार, सुजाता रेड्डी, अभिमन्यु धोंडगे, पप्पुभाई शेख, सागर होळदांडगे, पपन कांबळे, बाळु लाटे, सजंय पाटील, राम कसबे, सय्यद महंमद सह अनेक कार्यकर्ते निवडीच्या वेळी उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान सहन करणार नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात परीक्षा व्यवस्थेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे असा आरोप करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर शाखेच्या वतीने महाविद्यालय प्रशासनाला निवेदन देण्यात आले.



१२ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संलग्नित महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या संगणक शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग विषयाचा पेपर झाला. मात्र, नवीन अभ्यासक्रमाऐवजी जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका देण्यात आली. हा प्रकार परीक्षा संपल्यानंतर उघडकीस आला, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली.

या संदर्भात अभाविपचे प्रदेश सहमंत्री सुशांत एकोर्गे यांनी सांगितले की, महाविद्यालय आणि विद्यापीठ प्रशासनाच्या तांत्रिक चुकांमुळे ७९ विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून, विद्यापीठ प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा. अन्यथा, विद्यार्थ्यांचा रोष महाविद्यालय प्रशासनाला सहन करावा लागेल.



## संक्षिप्त वृत्त...

### रहदारीस अडथळा; चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** विवेकानंद चौक परिसरात रहदारीच्या ठिकाणी ऑटो उभा करून स्वतः च्या व इतरांच्या जीविताला थोका निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण केल्याची घटना घडली. याबाबत ऑटोचालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार मुजवरखा पठाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पठाण करीत आहेत. रस्त्यात ऑटो उभा केल्याने रहदारीला अडथळा निर्माण झाला होता.

### मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेला मुदतवाढ द्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** सत्तेत येण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजना जाहीर करणे आणि पुन्हा सत्तेत आल्यानंतर ही योजना संपुष्टात आणण्याचा निर्णय घेणे म्हणजे राज्यातील लाखो बेरोजगार युवकांची चेष्टा करण्यासारखे आहे. त्यांच्या भविष्याशी, त्यांच्या स्वप्नांशी खेळण्याचाच हा प्रकार होईल. त्यामुळे तात्काळ मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य कौशल्य विकास प्रशिक्षण योजना संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचे पत्र संबंधित विभागाकडून जाहीर झाले आहे. एकाच वेळी राज्यातील लाखो तरुण पुन्हा बेरोजगार होणार असल्याने तरुणांमध्ये नाराजी पसरली आहे. याची दखल घेऊन लातूर ग्रामीणचे माजी आमदार देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे योजनेला मुदतवाढ मिळण्याची मागणी केली आहे.

### राजर्षी शाहू महाविद्यालयाची जेईई मेन्स परीक्षेत यशाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेच्या पहिल्या सत्राचा निकाल जाहीर झाला असून, राजर्षी शाहू कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

महाविद्यालयातील ४२५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. पैकी ३५४ विद्यार्थ्यांचा निकाल आतापर्यंत प्राप्त झाला आहे. त्यामध्ये ९९ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे १६ विद्यार्थी, ९८ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे ४८ विद्यार्थी, ९७ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण घेणारे ६३ विद्यार्थी, ९५ पर्सटाइल पेक्षा अधिक गुण घेणारे १०७ विद्यार्थी, ९० पेक्षा अधिक गुण घेणारे १८६, ८० पर्सेंटाइल पेक्षा अधिक गुण घेणारे २२९ विद्यार्थी आहेत. शिवोहम् प्रतापसिंह शिंदे हा विद्यार्थी ९९.९० पर्सेंटाइल गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम आला आहे. सुशांत सुधाकर होळकर ९९.९०३ द्वितीय, रोनक निरंजन अग्रवाल ९९.८८ पर्सेंटाइल गुण घेऊन तृतीय आला आहे. सायली किरण पाटील ९९.१७ पर्सेंटाइल घेऊन मुलींत प्रथम आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

### कॉपी केल्यास गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत बारावीची लेखी परीक्षा जिल्ह्यातील १०० केंद्रांवर घेण्यात येत आहे. तसेच २१ फेब्रुवारीपासून १५२ केंद्रांवर दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षा कालावधीत कॉपीकेसमध्ये विद्यार्थी आढळल्यास कॉपी करणारा, कॉपीला सहकार्य करणाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचा इशारा शिक्षण मंडळाने दिला आहे.

यंदा दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होणार आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यात दहावीसाठी ६८२ शाळांमधील ३९ हजार ९४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. १५२ केंद्रांवर परीक्षा होणार असून, दहावीसाठी २० आणि बारावीसाठी १७ परीरक्षक विभागीय मंडळाने नियुक्त केले आहेत अशी माहिती शिक्षण मंडळाने दिली आहे.

## अर्थसंकल्पामुळे नागरिक होतील देशविकासाचे भागीदार :भाजपचे प्रदेश प्रवक्ते शितोळे

### प्रत्येक घटकाच्या बळकटीकरणासाठी ठोस तरतुदी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला देशाचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत वाढणारा असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल हे १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास भाजपचे प्रदेश प्रवक्ते किशोर शितोळे यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

नागरिकांची बचत वाढून तेच देशविकासाचे भागीदार कसे बनतील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस रवी सुडे, ॲड. प्रदीप मोरे, ॲड. दिग्विजय काथवटे, मीनाताई भोसले, रागिणी यादव, आबा चौगुले, प्रमोद गुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

किशोर शितोळे म्हणाले, शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून या चारही घटकांच्या सशक्तीकरणासाठी अर्थसंकल्पाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. प्रत्येक क्षेत्राला गती देणाऱ्या तरतुदी अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत. गरीब आणि माध्यमावर्गीयांना सशक्त करणारा तरुणांना रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करणारा आहे. असा विश्वासही शितोळे यांनी यावेळी व्यक्त केला.




ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र, उद्योजकता वाढ, रोजगारनिर्मिती, एमएसएमई क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि नाविन्यासाठी गुंतवणूक तसेच जागतिक स्तरावर आर्थिक स्पर्धात्मकतेसाठी निर्यात क्षेत्र या चार प्रमुख आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

करप्रणाली, शहरी विकास, खाणकाम, वित्तीय सुधारणा, ऊर्जा आणि नियामक सुधारणा या सहा क्षेत्रांतील सुधारणांना प्राधान्य देण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. शितोळे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. प्रारंभी जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रदीप मोरे यांनी किशोर शितोळे यांचा परिचय करून दिला. केले. तर जिल्हा सरचिटणीस रवी सुडे यांनी उपस्थित असलेल्या सर्व पत्रकारांचे आभार मानले.

## घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर थांबवावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** घरगुती गॅस सिलिंडरचा वापर व्यावसायिक प्रतिष्ठाने, वाहनांसाठी करण्यात येत आहे. तो थांबविण्यात यावा, अशी मागणी ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे प्रशासकीय अधिकारी प्रशांत जामगडे यांनी गुरुवारी पत्रपरिषदेत केली.

यावेळी जामगडे म्हणाले, घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर होत आहे. त्यामुळे दुर्घटना घडत आहेत. घरगुती गॅसचा योग्य वापर व्हावा म्हणून संस्थेच्या माध्यमातून प्रशासनाला वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, घरगुती गॅस सिलिंडरवर ५ टक्के जीएसटी आकारण्यात येते. तसेच व्यावसायिक सिलिंडरवर व ऑटो एलपीजीवर १८ टक्के जीएसटी आकारली जाते. घरगुती गॅस सिलिंडर व्यावसायिक प्रतिष्ठाने, वाहनांसाठी वापरण्यात येत असल्यामुळे महसूल विभागाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी केली.

## कर वसूलीसाठी मनपाची धडक जप्ती मोहिम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध सुट योजना देऊनही काही थकबाकीदार टॅक्स भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर मनपा मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे . त्यानुसार दि.१३/०२/२०२५ रोजी क्षेत्रीय कार्यलय ए,बी,सी,डी,च्या कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ताकर व पाणी पट्टी कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

क्षेत्र क्रं.एः- थकीत मालमत्ताकर रू,३७२४३७/- ०३ नळ जोडणी बंद करण्यात आले. तसेच रू,८१८३७/- थकीत कर वसूलीसाठी एक दुकान सिल करण्यात आले. क्षेत्र क्रं.बीः- थकीत मालमत्ताकर रू,२४४७१९/- दोन गोडाऊन सीलची कार्यवाही करण्यात आले. क्षेत्र क्रं.सीः- थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कर रू,७३१२९९/- वसूलीसाठी एकूण १३ नळ जोडणी बंद करण्यात आले.

क्षेत्रक्रं.डीः-थकीतमालमत्ताकर व पाणी पट्टी कर रू,२७४२७२/- वसूलीसाठी एकूण ०३ नळ जोडणी बंद करण्यात आले. तरी या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी नियुक्त



पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सिल करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव /विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

तरी व्याज/शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा. व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आवाहन महानगर पालिकेचे उपायुक्त (महसुल) डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## दीड वर्षापासून फरार आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** एका डॉक्टरची फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपीला लातुरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

२६ जून २०२३ रोजी शहरातील एका खासगी रुग्णालयातील डॉक्टरने १० लाख ४४ हजारांची उपकरणे दुरुस्तीसाठी संतोष मुरादे (रा. ओमकार हाईटस, बीड) याला दिली होती. मात्र, त्याने ती उपकरणे परत न करता त्याची परस्पर विल्हेवाट लावली. याबाबत विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात १७ जानेवारी २०२४ रोजी डॉक्टरांनी तक्रार दिली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच आरोपी राहत्या ठिकाणाहून निघून गेला. तेव्हापासून तो सतत राहण्याची ठिकाणे बदलत



पोलिसांना गुंगारा देत होता. याबाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने चकवा देणाऱ्या आरोपीचा शोध घेतला.

गांधी चौक ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पोलीस पथकाला गुन्ह्यातील फरार आरोपी हा अहिल्यादेवीनगर जिल्ह्यात वास्तव्याला असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून गांधी चौक ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक आक्रम मोमीन यांच्यासह राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, शिवा पाटील, संतोष गिरी, शैलेश सुडे यांनी आरोपीचा शोध घेऊन त्याला अहिल्यादेवीनगर येथील पवननगर येथून ताब्यात घेतले. अधिक तपासासाठी विवेकानंद चौक ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपीच्या मागावर विशेष पथके होती. सातत्याने वास्तव्य बदलत असल्याने पोलिसांच्या तो हाती लागत नव्हता. गुन्हा दाखल झाल्यापासून बीडमधील राहत्या घरी आढळून आला नाही. त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलीस अधीक्षक मुंडे यांनी आदेश दिले होते. आदेशानुसार आरोपीचा पोलिसांकडून शोध घेतला जात होता. दरम्यान, गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पथकाला तो अहिल्यानगर येथे असल्याची माहिती मिळाली. तेथून त्याला अटक केली आहे.

## अनधिकृत अटक; छळ प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दोषी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** नागरिकांच्या सुरक्षेसाठी असलेल्या पोलिसांनीच अत्याचार केल्यास कायद्याचा कठोर बडगा उगारला जाईल, हे सिद्ध करणारा निकाल मुख्य न्यायिक दंडाधिकारी (सीजेएम) लातूर न्यायालयाने दिला आहे.

पोलिस कॉन्स्टेबल नामदेव गंगाराम सूरवसे याने एका नागरिकाला विनाकारण अटक करुन अमानुष मारहाण केल्याप्रकरणी त्याला एका वर्षाची शिक्षा आणि दंड ठोठावण्यात आला आहे. हा निकाल मुख्य न्यायिक दंडाधिकारी सौ. एम. एन. चव्हाण यांनी दिला आहे.

या प्रकरणात फिर्यादी पक्षाचे वकील व्ही. के. चिखलीकर यांनी युक्तीवाद करत आरोपी पोलिसाच्या कृत्याला कठोर शिक्षा व्हावी, अशी न्यायालयासमोर मागणी केली होती. यावेळी न्यायालयात सादर केलेल्या पुरव्यांच्या आधारे फिर्यादीचे वकील चिखलीकर यांनी स्पष्ट केले की, तक्रारदार विजयकुमार देशपांडे यांना कोणतेही अधिकृत कारण नसताना अटक करण्यात आली. त्यांना कायदेशीर अधिकार न देता पोलिस कोठडीत ठेवण्यात आले. जे कलम ३४२ (अनधिकृत नजरकैद) अंतर्गत गुन्हा आहे.

साक्षीदारांच्या जबाबांनूसार, आरोपी पालिसाने तक्रारदाराला अमानुष मारहाण केली. फिर्यादीच्या वकिलांनी आपल्या युक्तीवादात असेही सांगीतले की, पोलिसांनी कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे अपेक्षित असते. मात्र, आरोपी कॉन्स्टेबलने आपल्या पदाचा गैरवापर करुन नागरिकावर अन्याय केला. त्यामुळे त्याला कठोर शिक्षा देऊन कायदा आणि न्याय व्यवस्थेचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे.

## सुसंस्कृत लातूरच्या परंपरेला साजेशी शिवजयंती साजरी करावी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** शिवजयंतीच्या अनुषंगाने शिवभक्तांकडून जय्यत तयारी सुरू आहे. दुचाकी रॅली, मिरवणूक तसेच सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी होणार असली तरी सध्या इयत्ता १२ वीच्या परीक्षा सुरू आहेत. आयोजित कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही, याची जाणीव ठेऊन जयंती उत्साहात साजरी करा, पण शांततामय, सुसंस्कृत लातूरला साजेशी परंपरा कायम ठेवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालयात शांतता कमिटीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस उपाधीक्षक (गृह) गजानन भातलवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर तसेच शहरातील पाचही पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, दिलीप सागर, साहेब नरवाडे, अरविंद पवार तसेच जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष, सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक मुंडे म्हणाले, सध्या इयत्ता १२ वीची परीक्षा सुरू असून कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही याची जाणीव ठेवा. उत्सवदरम्यान अचानक एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची माहिती प्रशासनास द्यावी. दुचाकी रॅलीमध्ये वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. पारंपरिक वाद्याचा वापर करून दिलेल्या मार्गानेच मिरवणुका वेळेत पूर्ण करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जयंती उत्सव अनुषंगाने आयोजित कार्यक्रम व येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिवजयंती मंडळाच्या अध्यक्षांनीही मिरवणूक मार्ग व वाहतुकीतील बदलाबाबत सूचना केल्या.

## वृक्षतोडीच्या निषेधार्थ अर्धनग्न आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१४ फेब्रुवारी -** वृक्षतोडीस बंदी आहे. तरीही महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात वृक्षांची तोड सुरू आहे. या संदर्भात महापालिका प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. गुरुवारी पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या समोरचे पिंपळाचे मोठे झाड तोडण्यात आले. याच्या निषेधार्थ 'ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन'च्या सदस्यांनी कपडे काढून अर्धनग्न आंदोलन केले.



लातूर जिल्ह्यात सर्वात कमी वनक्षेत्र आहे. तरीही मागील अनेक दिवसांपासून जिल्ह्यात अनियंत्रित अशी वृक्षतोड सुरू आहे. झाड छाटणीच्या नावाखाली सबंध झाडे मुळापासून तोडली जात आहेत. महावितरणाकडूनही झाडांच्या छाटण्या सुरू आहेत. महापालिकेने मागील पाच वर्षांत सबंध महाराष्ट्रात सर्वात कमी वृक्ष लागवड केली आहे. वृक्ष संगोपनाची कोणतीही जबाबदारी महापालिका पार पाडत नाही. सामाजिक संस्थांनी झाडांना लावलेले ट्री गार्ड चोरून नेली जात आहेत. झाडे तोडली जात आहेत.

वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार घेणाऱ्या सामाजिक संस्थांनाही महापालिकेचे कुठलेही सहकार्य मिळत नाही. उलट वृक्षतोडीला परवानगी दिल्या जात आहेत. काही सामाजिक संस्थांनी याचा निषेध केला. तरीही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. झाड तोडणाऱ्यांवर कुठलीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे वृक्षप्रेमींकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

गुरुवारी सकाळी औसा रोडवरील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या समोरील हे पिंपळाचे वृक्ष तोडण्यात आले. या संदर्भात महापालिकेने गुन्हा दाखल करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी वृक्षप्रेमींकडून करण्यात येत आहे. ट्री गार्डसह वृक्ष तोडण्याचे काम सुरूच राहिले तर लातूरची वृक्ष चळवळ कशी वाढणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, वृक्षप्रेमींनी क्रीडा संकुल परिसरात कपडे काढून अर्धनग्न आंदोलन करून वृक्षतोडीचा निषेध नोंदवला.

यावेळी डॉ. भास्कर बोरगावकर, पद्माकर बागल, डॉ. पवन लड्डा, डॉ. नागरगोजे, बालाजी उमरदंड, नागसेन कांबळे, सीताराम कनजे आदी उपस्थित होते.